साप्ताहिक

माणूस

४ जानेवारी ८६ / २ रुपये

भारतीय कामगार चले जाव!

स्वतःला कसे छळावे?

—मानसिक आरोग्यावरील लेख

साप्ताहिक

माणूस

¤

वर्ष : पंचविसावे

अंक : बत्तिसावा

¤

४ जानेवारी १९८६

किंमत : दोन रुपये

¤

संपादक

श्री. ग. माजगावकर

¤

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

¤

वार्षिक वर्गणी

साठ रुपये

¤

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

¤

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

¤

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ४११०३०

दूरध्वनी : ४४३४५९

¤

मुखपृष्ठ– सुरेश नावडकर

सप्रेम नमस्कार..

¤ १४ डिसें. आणि २१ डिसें. १९८५ च्या अकात प्रसिद्ध झालेला श्री. चद्रकात बर्वे याचा लेख वाचला. कै. अनिल बर्वे यांच्या विविध पातळ्यांवरील अनेक अकी शोकातिकेचे त्यानी केलेले विश्लेषण अप्रतिम आहे. ते सर्वांनाच अतिशय उद्बोधक वाटावे. पहिला हप्ता वाचल्यावर अत्यंत अस्वस्थ मनाने दुसऱ्या हप्त्याची वाट पाहात होतो. संपूर्ण लेख वाचून अधिकच अस्वस्थ झालो. अनेक लेखक–कलावंताना मिळालेल्या या शापाचा उगम फक्त दारूतच नसून त्यांच्या व्यक्तिमत्त्वातच असलेल्या अनेक बीजात कसा असतो याचे दर्शन श्री. चंद्रकात बर्वे यानी अत्यत परखडपणे आणि वस्तुनिष्ठपणे घडवले आहे. हा लेख प्रसिद्ध केल्याबद्दल आपले अभिनदन केलेच पाहिजे आणि तो लिहिल्याबद्दल श्री. चद्रकांत बर्वे याचे विशेष अभिनदन केले पाहिजे.

२२ डिसेंबर ८५ — नरेश कवडी, मडगाव, गोवा

¤ 'माणूस' च्या १४ डिसेंबरच्या अंकात 'पुणे वार्ता' या सदरात 'ओ भोपाळ!' या शीर्षकाखाली वस्तुस्थितीची नीट चौकशी न करिता 'भोपाळ स्मृतिदिन' कार्यक्रमाविषयी एक वार्ता प्रसिद्ध करण्यात आली आहे. वस्तुस्थिती पुढीलप्रमाणे :

१) भोपाळ दुर्घटनेविषयी लोकशिक्षण करण्याकरिता लोक विज्ञान संघटनेच्या कार्यकर्त्यांनी गेल्या सबंध वर्षात लेख लिहिले, जागोजागी प्रदर्शने उभारली, सभा घेतल्या, पत्रके काढली आणि इतर विविध सघटनाच्या सहकार्याने मिरवणूक काढून, भोपाळ वायूग्रस्तासाठी निधी जमा करून, भोपाळ येथील स्वयसेवी संघटनेच्यावतीने त्याचा विनियोग केला.

२) दुर्घटनेला एक वर्ष झाल्यानतर लोकजागृती करण्याच्या कार्याची व्याप्ती वाढावी याकरिता सर्व राजकीय पक्ष व विविध सघटना याना एका व्यासपीठावर आणून, एकमुखी मागणी करिता यावी याकरिता पुढाकार घेतला. काँग्रेस (आय) पक्षाने आवाहनाकडे दुर्लक्ष केले, परतु बाकी सर्व प्रमुख पक्षानी व सघटनानी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. प्रत्यक्षात मात्र बहुसख्य पक्षाना आपापल्या सहकाऱ्याना अथवा अनुयायाना नियोजित मिरवणुकीला व सभेला आणण्यात अपयश आले. असे असूनही २ डिसेंबरच्या रात्रीच्या मिरवणुकीला सुमारे दोनशे नागरिक उपस्थित होते. पथनाट्यातून निर्माण झालेले गामीर्य मिरवणुकीतील ढोलाच्या शोकपूर्ण गभीर निनादाने वाढतच गेले. पुण्यातील ख्रिस्ती बाधवांनी त्याच दिवशी आपल्या प्रार्थनालयात (चर्चेसमध्ये) भोपाळमधील मृताच्या स्मृत्यर्थ प्रार्थना म्हटल्या आणि गंभीर घटा–नाद केला.

३) ३ डिसेंबर १९८५ रोजी सभेच्या ठिकाणी प्रदर्शन माडले. तसेच भोपाळ वायूग्रस्ताच्या व भोपाळ दुर्घटनेसंदर्भातील व्यापक मागण्या पतप्रधान राजीव गांधी याना सादर करणाऱ्या पत्रावर नागरिकाच्या सह्या घेतल्या. त्याआधी ही मोहीम आठवडाभर चालू होती.

४) पुण्यातील प्रदूषणाचे धोके व अन्य समस्या याविषयी एक टिपण तयार करून पुण्याच्या महापौराशी त्याबाबत एक चर्चा जागतिक पर्यावरणदिनी लोकविज्ञान सघटना व इतर समविचारी सघटना यांनी घडवून आणली.

५) तीन डिसेंबरला सकाळी दहाचा भोगा झाल्यावर जागच्या जागी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून पुण्याच्या नागरिकांनी भोपाळ दुर्घटनेचे स्मरण करावे असे आवाहन करणारे एक पत्रक महापौरानी प्रसिद्धीसाठी पाठविले होते. या पत्रकाकडे पुण्यातील वृत्तपत्रानी दुर्लक्ष केले.

लोकजागृतीचे काम हे नेहमी अवघड असते. त्यासाठी हाती घेतलेल्या कार्यक्रमासबधी नीट चौकशी न करता, तळमळीने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची चेष्टा करणे हे 'माणूस' साप्ताहिकाकडून अपेक्षित नव्हते.

२५ डिसेंबर ८५ — सुलभा ब्रह्मे, कुमुद पोरे

पुणे वार्ता

☐ मध्यमवर्ग आणि परिवर्तन

कै. श्री. म. माटे याच्या स्मृतिप्रित्यर्थ महाराष्ट्र साहित्य परिषदेने दोन व्याख्याने आयोजित केली होती, २५ आणि २६ डिसेंबरला. विषय होता 'समाजपरिवर्तनाची वाटचाल' आणि वक्ते होते प्रसिद्ध समाजवादी नेते नानासाहेब गोरे! नानासाहेबांनी भारताच्या आजपर्यंतच्या समाजपरिवर्तन चळवळीचा मागोवा घेताना तिच्या पुढील भवितव्याच्या संदर्भात काही प्रश्न उपस्थित केले.

नानासाहेबांनी आपले विचार दोन भागात मांडले. पहिल्या भागात वर्ण व्यवस्थेविषयी ते बोलले आणि दुसऱ्या भागात वर्ग व्यवस्थेसंबंधी विवेचन त्यानी केले. ऐतिहासिक कालापासून आजपर्यंत वर्णव्यवस्थेची चौकट जाणिवपूर्वक सांभाळली गेली असल्याचे ते म्हणतात. सतानी देखील ही चौकट मोडण्याचा प्रयत्न केला नाही असा आरोप ते करतात. ब्रिटिशाच्या कालखंडात भारतात सामाजिक सुधारणांना आवाज मिळाला. म. फुले आणि डॉ. आंबेडकर यानी या चळवळीचे नेतृत्व केले आणि पुढे स्वतंत्र भारताच्या संविधानात त्याचे प्रतिबिंब उमटले. मात्र त्याच्या कार्यवाहीत आपण हयगय करतो आहोत असे त्याना वाटते.

दुसऱ्या भागात वर्ग व्यवस्थेविषयी बोलताना, मार्क्सप्रणित आणि म. गांधी व डॉ. आंबेडकराना अभिप्रेत असलेला समाजवाद फसला असल्याची जाणीव ते व्यक्त करतात. मार्क्सच्या मते भारतात औद्योगिकरण झाल्यानंतर कामगाराच्या माध्यमातून समाजपरिवर्तन घडेल ही अपेक्षा आजचे चित्र पहाता सफल झालेली दिसत नाही. गांधी आणि आंबेडकरांना अभिप्रेत असलेली मूल्येही कमी होतानाच आढळत आहेत.

याची कारणमीमांसा करताना नानासाहेब म्हणतात की, देशात औद्योगिकरणाच्या प्रक्रियेत मध्यमवर्गाचा लोप न होता उलट त्याचा विस्तारच झाला. नव्या औद्योगिक रचनेत वर्णव्यवस्था मोडली गेली; पण प्रत्येकाच्या घरी वर्णव्यवस्था कायम राहिली. म्हणजे वर्ग आणि वर्ण या दोन्ही समस्या कायम राहिल्या. त्याच्या मते वरच्या वर्गाला क्रांतीची गरजच भासत नाही तर कनिष्ठ वर्गाला क्रांतीची कुवतही नाही. मध्यमवर्ग हा बहुताशाने उच्चवर्गाच्या सहाय्याने वाढत असल्याने त्यातही क्रांतीची भावना आढळत नाही. म्हणूनच समाजपरिवर्तनाचा गाडा आजमितीस अडला आहे. हा गाडा पुढे ओढायचा असेल तर मध्यमवर्गातील जाणीव असणाऱ्या युवकानी पुढे येऊन कनिष्ठ वर्गाला बरोबर घेऊन आवाज उठवला पाहिजे असे त्याना वाटते

नानासाहेब हे विवेचन करताना काही मुद्दे मांडतात ते महत्त्वाचे वाटतात. समान नागरी कायद्याविषयी बोलताना स्वातंत्र्यानतर लगेचच या कायद्याचा विचार पुढे यायला हवा होता, असे ते म्हणतात समान नागरी कायदा हा आता नाजूक विषय बनला आहे. राजकीय आणि सामाजिक हितसबंधामुळे या कायद्याचा विचार दूर पडत चालला आहे या बाबतीत प्रचलित कॉंग्रेसपक्षालाच दोष देण्याचे कारण नाही कारण जनता राजवटीत देखील हा विषय बाजूलाच राहिला होता. खरा प्रश्न ह्या कायद्याद्वारे काही सामाजिक परिवर्तन घडू शकेल का, हाच आहे.

दुसरा मुद्दा म्हणजे आपण खरोखरच समाजवादाकडे चाललो आहोत का? सध्याची औद्योगिक नीती पहाता भांडवलदाराच्या बहुतेक मागण्या मान्य झालेल्या आहेत. मोठ्या प्रमाणात उद्योगधद्यावरील निर्बंध शिथिल करण्यात येत आहेत. त्यामुळेच आपण समाजवादाकडे पाठ फिरवून भांडवलवादाच्या दिशेने जात आहोत असे त्याना वाटते

अशा प्रकारे विवेचन करून आपण हाच समाज एकविसाव्या शतकात नेणार आहोत का असा मार्मिक प्रश्न ते विचारतात. एकूणच नानासाहेबासारख्या समाजवादी नेत्याचे आजच्या रखडलेल्या समाजपरिवर्तनाच्या सदर्भातील विचार उद्बोधक आहेत. परतु या चळवळीचे नेतृत्व बोथट का झाले याचा विचार त्यानी केला नाही. नेतृत्वाची कमतरता आणि त्याची कारणमीमांसा या संदर्भात आवश्यक होती असे वाटते. त्याचबरोबर सामाजिक परिवर्तनाचे अनुषगाने विचार करताना गोरे वर्ण आणि वर्ग व्यवस्थेचा विचार करतात; पण स्त्री–मुक्तीचा विचार त्यानी केला नाही याही समस्येवर त्यानी भाष्य करावयास हवे होते असे वाटते.

☐ पी. एम्. टी.....भाडेवाढ नाही

पी. एम् टी. ने पुणेकराना दिलासा द्यावा अशा घटना क्वचितच घडतात. नित्यनियमित भाडेवाढ आणि तितकाच वेळापत्रकातील अनियमितपणा, सेवकांचे अचानक सप आणि प्रवाशाशी अरेरावी, नादुरुस्त गाड्या आणि गाड्यांची कमतरता या आणि अनेक कारणानी पी एम्. टी. ने पुणेकरांना हवालदिल केलेले आहे म्हणूनच पी. एम्. टी. च्या या वर्षाच्या अदाजपत्रकात कोणतीही नवी भाडेवाढ केलेली नाही, हा पुणेकरांना दिलासाच!

कोणतीही नवी भाडेवाढ न करता १८ कोटीचे उत्पन्न मिळवण्याचे उद्दिष्ट पी. एम्. टी. ने ठरवले आहे आणि जवळपास तेवढाच खर्च अपेक्षित धरून हिशोबाची तोंडमिळवणी केली आहे. अतर्गत कार्यक्षमता वाढविल्याने उत्पन्नात भर पडते. त्यामुळे प्रत्यक्ष भाडेवाढ न करता कार्यक्षमता वाढवण्यावर भर आढळतो हा देखील एक दिलासाच!

जुन्या बसेस काढून नव्या बसेस मार्गावर आणणे, देखभालीवर विशेष लक्ष पुरवणे, ब्रेकडाऊनचे प्रमाण कमी करणे अशा काही चागल्या योजना वहातूक आयुक्तानी मांडल्या आहेत, त्या स्वागतार्ह निश्चितच आहेत, पण त्याचबरोबर त्यांची अमलबजावणीही काटेकोर व्हावी ही अपेक्षा आहे. या योजना कागदोपत्री राहून वर्षअखेरीस काही भलतेच चित्र पहाण्याचे दुर्भाग्य पुणेकरांच्या वाट्याला न येवो हीच इच्छा!

नव्या बसेस आल्या तरीही त्या जुन्या बसेसच्या बदली वापरणार असल्याने नवे मार्ग सुरू होणार नाहीत आणि गर्दीच्या मार्गावर बसेस्ची सख्याही वाढणार नाही असे वाटते. त्यामुळे बस वेळेवर न मिळणे, मार्ग गाठण्यासाठी लाबवर चालत जावे लागणे ही पुणेकराची डोकेदुखी कायम रहाणार आहे. खरं तर आहे त्या मर्यादेतसुद्धा चांगली सेवा मिळत नसल्याची पी. एम्. टी. बद्दल तक्रार आहे. ह्या तक्रारीचे काही प्रमाणात निवारण झाले तरी पुणेकराना खरा दिलासा मिळणार आहे.

—मनोहर सोनवणे

वेशीबाहेरचे एक पान

परवा बावा आमटेंना पुरस्कार मिळाला. मी सहज माधव काबळेना त्याचा पत्ता सागितला आणि म्हणालो, 'तुझे आई-बाबा कदाचित तेथे असतील' वेशीबाहेरच्या घरात मी बसलो होतो. ते घर माधव काबळेचे खूप वर्षांनी या माझ्या मित्राला भेटत होतो तो मी एकाच हायस्कूलमध्ये शिकलो. तो डी एड् होऊन गावातच मास्तर झाला

साज पिकत होती आणि माधव म्हणत होता, 'माझ आई-बाप एक दिवस परत येणार.' त्याचा कठ दाटला होता. दाटलेल्या कठानं तो सागत होता...शब्द त्याचेच होते.

'माझे आई-बाप राबत होत. त्याना चार पोर. प्रपच्याची सारी हौस भागली. दावणीला हत्तीसारखी दोन बैल झाली. जानकी म्हस झाली. गावात नदीच पोट फाडून पाईप लाईन आली. म्हारकीच्या पट्टीत पाणी आल तसं आमच जीवन बदलल.

'दोघाच्या हाताला बाध-बाधूरा खरडून घट्ट पडल होत डोस्कीला कवा त्याला मिळाल नाही. आईची चारी बाळंतपण बावानं केली. आमच्या मामाकड कायमचा दुक्काळ तिथ खडीभर पोर. बाबा म्हणायचा, 'तकडं कुठं दाद लागतीया, इथच बाळत हो.' शेवटच्या बाळतपणात आपरशन बी झाल. पोर बद झाली तसं दोघाचबी हात राबायला रिकाम झालं. पोट भरायला वाट झाली.

'म्हारकीत आई-बाबान ऊस लावला. रातीचा दिस केला. कटाळ केला नाही, आला नाही. आम्ही बी मोठ व्हायला लागलो थोरला भाऊ म्हसराकड राहिला. मी आणि धाकटा शाळेत जाऊ लागलो. एकट्याला बैलाकड ठेवल.

'आम्ही म्हाराच पण चोरी केली नाही. आडव-तिडवं वागलो नाही. आई-बाबाला व्यसन नव्हतं. आम्ही बामणावाणी व्हाव ही त्याची मनापासन इच्छा. त्याचं वागणबी तसच होतं आई-बाबान किडूक-मिडूक गोळा केल. आम्हालाबी वळणात ठेवलं. सिनिमा-तमाशाला आमाला बदी होती. मारूतीच्या देवळातल भजन ऐकायला आम्हासनी आई-बाबा घेऊन जायच. म्हशीच्या दुधावर आमचं किरकोळ चालायच. गाडी भाडं शिल्लक राहायच. आई-बाबा काम लागल तिथ जात

'तस आमच बस्तान झकास बसलं आम्ही त्याच्या हाताखाली आलो तसं त्याना आशा वाटली. थोरला भाऊ लग्नाला आला. आई-बाबाच इरादा पक्का झाला. पावणं-पै बघून झाल. लगीन ठरल आणि एक दिवस झाल बी. वहिनीबी बडद्याडचातली सापडली. घरात रमली. आईच्या हातावर हात मारला गेल्या दहा बरसात माह्यारचं नाव काढल नाही. तिला बी दोन पोरं झाली. चागली हाय बिचारी

'मी डी. एड्. झालो सुदैवानं गावातल्या शाळेतच लागलो. ज्या दिवशी हजर झालो त्या दिवशी आई रडली, बाबा रडला, भाऊ रडला, सारेजण रडले. आमच्या म्हारकीत मीच पहिला मास्तर. आई म्हणाली, 'माधू पाग फिटला बघ, चागलं वाग, आपून किती केल तर म्हार' काय काय लई सागितलं. आमी सारजण कामाला लागलो. जो तो कामाला लागला. आमी पोरानी आई-बाबाला 'काम करू नका' अस सागितल, पण त्याच हातपाय गप बसत नव्हतं. त्याच आपल काम चालूच राहिल आणि आमच घर भलतच सुधारलं.

'आई-बाबा जुन्या वळणाचं, पण आमच्या इचाराआड ते आलं नाहीत. म्हारवाडाच काय पण सारा गाव 'म्हारवाड्यातल एक सुधारल्याल घर' म्हणून बोट दाखवतोय.

रोज साजच्याला आम्ही सारी आई बाबा भोवती जमायचो. आई-बाबा आम्हाला कष्ट सागायचं. आमच डोळ भरून यायच. बाबा म्हणायचा 'परपंच्या म्हणत्यात याला, या वाटवर लई काट. जपून चालाय लागतय, एकदा पायात काटा मोडला तर घर केल्या बिगर त्यो राहात नाही. लई जपून चालाय लागतय, तवा कुठं वाट वसरतीया. पोरान् जपून चाला, पाय घसरला तर वाट सापडायची नाय.'

'बाबा सागताना आई गप बसायची. आई सागताना बाबा गप बसायचा आई म्हणायची, 'राबाय लाजू नकासा, राबला त्यो पुढ सरकला. प्वाट इतभरच असतय, पण ते राबल्याशिवाय भरत नाही. चोरी केल्याली पुरत नाही. खोटं बोलल्याल कवातरी पाण्यावर घाण यावी तस तरगतय.' आई-बाप आम्हाला देवासारख वाटत. त्याच हात-पाय धुन पाणी प्यावं अस वाटायच

'माझ लगीन केल घर बाधल साऱ्यासाठी सार केल. आता आमच सुख आलं होतं. नातवडांनी गोतावळा उभा केला होता. घरात कुणाच मरण नव्हत. नुकसान नव्हत. देवाला ते सललं.

'८२ साल उजाडल. आई बावाच्या तब्येतीला बरं वाटना आमी मिरजला दावल. औषध सुरू झाल. आराम वाटल. औषध बद झालं. दोनचार महिन गेल, बोटास्नी सूज यायला लागली दोघास्नीबी

'श्रावणातला त्यो सोमवार होता. आई-बाबा म्हणाले, 'आमी दावून येतो मिरजला' त्या दिवशी दुपारन दोघच मिरजला गेले. डॉक्टरन सागितल म्हण, 'तुम्हा दोघास्नीबी महारोग झालाय.'

आम्ही त्या रात्री वाट पाहिली, माझी बायको मिरजेची. वाटलं, राहिल असतील पावण्याकड

दुसऱ्या दिवशी आमाला समजल, डॉक्टरनं सागितलं होतं, 'तुम्ही आता पोराबाळात राहू नका.'

शेजाऱ्यानी सागितल,

'तुमच आई-बाप काल रातीला तुमच्या दारातच उभी होती. त्यानी दारातील चिमटभर माती कपाळाला लावली. दोघं एकमेकाच्या गळघाला पडून रडली. पायात मोळं मारल्यासारख चालाय लागली. तुम्हास्नी निरोप दिलाय सुखान राहावा, एकीन राहा. आमची वाट बघू नगा.'

माधवचा गळा भरून आला होता, त्याचे शब्द मनाल चिरत होते.

एक दिलासा म्हणून बाबा आमटयाच्या आनदवनाचा पत्ता सागत होतो. साजतली रात बाळत होत होती.

—बापू जाधव
किर्लोस्करवाडी

अरब देश, पश्चिमी देश भारतीय कामगार-तंत्रज्ञांना परत पाठवीत आहेत . . . .

अनिल शिंदे

भारतातून एके काळी म्हणे सोन्याचा धूर निघत असे. त्याला भुलून अनेक परदेशी येथे आले नि भारतातील ते सोने त्यानी पार धुवून नेले. अनेक राज्याच्या होळ्या झाल्या आणि मग त्या राज्यातील घराच्या आगीचे लोट भारताच्या अवकाशात दिसले. असाच धूर खूप दिवसानंतर दिसू लागला तो अरब देशात. आखाती देशातील तेलरूपी सोन्याचा धूर. पण हे अरब लोक पक्के व्यवहारी होते. त्यानी या धुराचे रूपातर देशाना आगी लावण्यात केले नाही. तर जगात सर्वत्र सहज धूर काढत धावणाऱ्या यंत्रावर, वाहनावर लगाम लावण्यासाठी केले.

इंधन ही एक अत्यंत महत्त्वाची वस्तू आहे हे या आखाती देशाच्या लक्षात येताच त्यानी १९७३ साली अचानक तेलाचे भाव चौपट वाढवले. त्याचा परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवरही झाला. १ रु. २० पैसे लिटर मिळणारे पेट्रोल एकदम साडेतीन रु. वर गेले. हा फटका भारतालाच नव्हे तर जगातल्या बहुतेक सर्व देशांना बसला. आणि मग तेलरूपी सोने विकून जगाचा पैसा या आखाती देशात ओतला जाऊ लागला.

पण या तेल-विहिरी केव्हातरी सपणार आहेत याच भान या देशाना लवकरच आलं. मग त्यानी आपल्याच देशात उद्योगव्यवसाय वाढावेत यासाठी प्रयत्न सुरू केले. आपले 'सोने' त्यानी अधिक भावाने विकून भाडवल गोळा केले नि मग बाहेरच्या देशातून तत्रज्ञ, शास्त्रज्ञ, कामगार याना आपल्या देशात येण्याचे आवाहन केले. साध्या हेल्परलाही पाच हजार रु च्या घरात पगार देऊ केला. परिणामी या देशाकडे काम करण्यास जाणाऱ्याचा एकच ओघ सुरू झाला. विशेषत: आशियाई देशातील कामगारांनी याचा लाभ उठविला. बोटी भरभरून कामगार परदेशी-गल्फ देशात जाऊ लागले. साधा सफाई कामगारही भारावला. हजारो रुपये महिना घेऊ लागला. या देशातली प्रगती, विशेषत: बाधकाम व्यवसायातली प्रगती वेग घेऊ लागली. ही कामगार मडळी आपापल्या देशांकडे परकीय चलन पाठवू लागली. भारतासह अनेक श्रम निर्यातदार देश या परकीय चलनाच्या ओघाने सुखावून गेले.

१९७५ ते १९८५ दहा वर्षे हा पेट्रोडॉलरचा ओघ श्रम निर्यातदार देशाकडे अखडपणे येत होता. पण आखाती देशातली काम केव्हा ना केव्हा तरी सपणार होती. विशेषत: बाधकाम क्षेत्रातली कामं तर खात्रीने सपणार होती. पण भारतासारख्या देशानी या गोष्टीकडे दुर्लक्ष केले होते. अन् मग प्रथम परिणामाची चाहूल १९८० पासून लागण्यास सुरुवात झाली आणि १९८५ मध्ये या श्रमिक परतीच्या प्रश्नाने आपला फणा पुरता उभारला.

सौदी अरेबिया, बाहरीन, सयुक्त अरब अमिराती, कुवेत सर्व देशानी 'गरज सरो नि वैद्य मरो'ची भूमिका घेण्यास सुरुवात केली. त्याच्या दृष्टीने आता एकतर काम सपलेले होते. दुसरी गोष्ट म्हणजे तेल उत्पादन अतिरिक्त झाले होते, काही प्रमाणात त्यानाही मदीची झळ पोहोचत होती. बाहेरच्या देशातील मजुराचा भरणा जास्त होता. तेव्हा स्थानिक पातळीवर बेरोजगारीचा प्रश्न त्याना भेडसावू लागला. परिणामी त्यानी आपले प्रश्न सोडविण्यासाठी परदेशी श्रमिकाना 'चले जाव' म्हणण्यास प्रारभ केला.

आखाती देशातली बाधकामाची टेंडरे मिळविण्यात द. कोरिया फारच पटाईत होता त्याचे १ लाख ७० हजार कामगार या देशात ठाण माडून बसले होते. पण अरब देशाच्या चले जाव धोरणाचा तडाखा त्या देशाला बसला नि द. कोरियाच्या कामगारामध्ये घट होत गेली. ७० हजार कामगार परत गेले. द. कोरियाच्या ५४ कपन्या बंद पडल्या-परतल्या. १९८३ मध्ये या देशाने १० अब्ज डॉलर या देशातून आणले होते. पण चालू वर्षी हा आकडा केवळ ५ अब्जावर येऊन ठेपला आहे.

पाकिस्तानलाही ही झळ पोहोचली आहे. त्याचे २५ लाख कामगार या देशात काम करीत आहेत. दरवर्षी यात वेगाने वाढ होत होती पण गेल्या वर्षी ही वाढ कमी झाली. गेल्या वर्षी केवळ १ लाखच लोक या देशात काम मिळवू शकले. १९८३ मध्ये हाच आकडा १ लाख २८ हजार होता.

भारताचेही तेच हाल

भारतात मुळातच बेरोजगारीची समस्या मोठी. त्यामुळे आखाती देशात नोकऱ्याचा महापूर आलाय म्हटल्यावर आमचे बरेच कामगार तिकडे धावले. हे लोण इतके पसरले की तिकडे नोकऱ्या देतो सागून अनेक चारसोबीसानी आपले उखळ पाढरे करून घेतले. पण अनेक कामगार त्या देशांना पोहोचलेच १९८३-८४ च्या अधिकृत आकडेवारीनुसार हा आकडा अडीच लाखांपर्यंत गेला.

या आखाती देशांतली तेजी सपताच इतराप्रमाणे भारतालाही त्याची झळ पोहचू लागली आहे. त्याचे आखाती देशातले कामगार परतू लागले आहेत. १९८५ च्या पूर्वार्धात त्या देशातील कामगाराचा आकडा दोन लाखाखाली आला होता. वर्ष सपता सपताच बाहरीनने आपल्या येथील परकीय कामगाराकडे वक्र दृष्टी वळविली. सुमारे ५० हजारजणाना सागण्यात आल की, बाबाहो आता आम्ही मदीच्या अवस्थेतून जात आहोत. तेव्हा येथे राहायचे असेल तर एकतर वेतन दरात घट स्वीकारा अन्यथा आपापल्या माय देशी परत जा आणि त्यातही मायदेशी परत गेलात तर बरे, म्हणजे आम्हाला आमच्या माणसाना रोजगार देता येईल झालं. आणखी अनेकानी आपला गाशा गुडाळण्यास सुरुवात केली.

सयुक्त अरब अमिरातीनीही बँक व्यवसायतल्याना माघारी पाठविण्यास सुरुवात केली. एका झटक्यात ११५ जणांना तेथून

मायदेशी परत पाठविण्यात आले मध्यतरी बँक ऑफ बडोदाच्या कर्मचाऱ्यांनाही असाच फटका बसला. स्थानिक कर्मचाऱ्यांसाठी त्यांची हकालपट्टी झाली. यामुळे बँक कर्मचाऱ्यानी घाबरून केंद्र सरकारची गाठ घेतली. यात हस्तक्षेप करा अशी विनंती केली. कुवेतनेही आपल्या येथील ५० हजार लोक परत पाठविले. (एकटया भारताचे नव्हेत.)

भारताचे जे कामगार परतत आहेत त्यातले बहुताश कामगार हे अकुशल स्वरूपाचे आहेत. त्यामुळे तर गल्फ देशातून परतणाऱ्याना पुनर्रोजगार पुरविणे ही आणखी एक समस्या लवकरच गभीर स्वरूप धारण करणार आहे. या ना त्या कारणाने आखातातील अनेकजण परतणार आहेत. त्यामुळे भारतातील नियोजनावर त्याचा परिणाम होणार आहेच.

नुकतीच सातवी योजना जाहीर झाली आहे. त्यात बेरोजगारी सपविण्याच्यादृष्टीने जोरदार पावले टाकण्याचा दावा करण्यात आला आहे. श्रमिकाच्या सख्येत जेवढी वाढ होईल त्या सर्वांना नोकऱ्या मिळतील असे आश्वासन देण्यात आले आहे. पण हे आश्वासन देताना सरकारने या 'अरबी' फटक्याचा विचार केलेला दिसत नाही. त्यामुळे बेरोजगाराच्या सेनेत अशीच वाढ होणार.

पश्चिमी देशातूनही

ज्याप्रमाणे आखाती देशातून आता भारतीय कामगार परतत आहेत त्याप्रमाणे सध्या पश्चिमी देशातूनही भारतीय कामगारावर बेकारीची कुऱ्हाड कोसळणे शक्य आहे. इग्लड, अमेरिकेसारख्या देशात सध्या आशियायी कामगारांविरुद्ध, व्यावसायिकाविरुद्ध स्थानिक लोकांनी ओरड सुरू केली आहे. अद्याप या देशानी भारतीयांना (आशियायीना) प्रत्यक्ष हाकलण्यास सुरुवात केलेली नसली तरी तसे वातावरण तापू लागले आहे.

मध्यतरी तर भारताच्या विद्यार्थ्यांवरही आफत आली होती. न्यूयॉर्क विद्यापिठात एका विषयाच्या अभ्यासक्रमासाठी केवळ कृष्णवर्णीयच होते. एकही गोरा विद्यार्थी नव्हता. त्यामुळे तेथील वृत्तपत्रानी यावर प्रकाश टाकला, ओरड केली. तेव्हा मग आता आशियायी विद्यार्थ्यांवर अनेक बंधने घालण्याचा विचार सध्या चालू आहे.

सारांश काय तर परदेशातले भारतीय कामगार परतत आहेत. आज आखाती देशातले तर उद्या पश्चिमी देशातले. त्यात आमचे पंतप्रधान या परदेशात दौरे करताना तेथेच भाषणे ठोकतात की 'या अनुभवाच्या बँकांत अनुभव घेऊन भारतीयानी परत यावे.' म्हणजे या देशाना वाटणारा अविश्वास वाढावा! म्हणजेच भारत आता ब्रेन ड्रेन नि परदेशी कामगाराचे परतणे या कात्रीत सापडला आहे. एकीकडे येथील 'क्रीम' परदेशात जाते म्हणून रडावे की आपले तज्ज्ञ, कर्मचारी, मजूर आता बेरोजगार होऊन परतत आहेत म्हणून हातपाय आपटावेत, या कात्रीत भारत सापडत आहे. या दोन्ही प्रश्नातला महत्त्वाचा प्रश्न कोणता हे ठरवणे कठीण. भारताचे आणि अनेक आशियायी देशाचे सध्या सँडविच होत आहे हेच खरे! □

लंडन येथील डेव्हिड ग्रीव्हज् यांचे कृतिशील नाट्यशिक्षण शिबिर

वि. भा. देशपांडे

रंगभूमीच्या क्षेत्रात नाट्यशिक्षण असावे किंवा नाही, घेतले तर त्याचा किती उपयोग होऊ शकतो यावर अनेकदा बोलले जात असते. तरीही अधूनमधून शिबिरे झडतच असतात. पुण्यापुरते बोलावयाचे तर बाल आणि प्रौढ अशा दोघासाठी निरनिराळी शिबिरे सतत चालू असतात पुण्याची नाट्यपरिषद गेली तीन वर्षे नामवत व्यक्तीला बोलावून विशिष्ट विषयावर शिबिर केन्द्रित करीत असते. ह्या सगळ्या पार्श्वभूमीवर पुण्यात नुकतेच वेगळ्या प्रकारचे शिबिर घेतले गेले. ते घेणारे प्रशिक्षक होते श्री. डेव्हिड ग्रीव्हज् आणि त्याचे सहकारी.

डेव्हिड ग्रीव्हज् हे लडनमधील प्रॉयर थिएटर या सस्थेत असतात. त्यानी स्वतः तिथे नाट्याचे उत्तम शिक्षण घेतले आहे. त्याच्या मदतीला कु. हेलेन ही नृत्यविशारद मुलगी प्रशिक्षणाचे काम करते. आणखी एक सहकारी म्हणजे सदीप देशपाडे. हा मूळचा मुबईचा. डेव्हिड मागे एकदा भारतात आले होते तेव्हा त्यांच्याबरोबर राहून त्यानेही विविध गोष्टीचे शिक्षण घेतले. त्याच्यावतीने तोही लडनला जाऊन तिथे नाट्यविषयक गोष्टीचे शिक्षण घेऊन आला. तो आता प्रत्येक शिबिरात प्रत्यक्ष सहभागी असतो. अनेक पद्धतीची मदत करतो.

ह्या तीन मंडळीनी (डेव्हिड – हेलेन – सदीप) पुण्यामध्ये १८ ते २० डिसेंबर असे तीन दिवस शिबिर घेतले. शिबिरात मुख्यतः मूकाभिनय आणि मुखवटे तयार करणे याचे मूलभूत असे सूत्ररूपाने शिक्षण देण्यात आले. मूकाभिनयाच्या सदर्भात सर्वात महत्त्वाच्या गोष्टीवर भर देण्यात आला तो शारीरिक वापराच्या गोष्टीवर. आपले शरीर अभिनयासाठी किती आणि कसे लवचिकपणे वापरता येऊ शकते ते अनेकदा आपल्या ध्यानी येत नाही. शरीरातील महत्त्वाचा अवयव स्वतंत्रपणे आणि एकत्रितपणे वापरणे कसे शक्य आहे यासबधी अनेक तत्त्वे प्रत्यक्षरूपाने सागितली गेली. ही तत्त्वे सागत असताना ज्या प्रकारचे खेळ किंवा हालचाली-व्यायाम करून घेतले गेले ते महत्त्वाचे होते. आपले शरीर पूर्णतः सैल सोडून हलके करणे, विशिष्ट गोष्टींवर लक्ष केन्द्रित करणे यासाठी योगाच्या पद्धतीने व्यायाम झाले. एक–दोन खेळ दिसायला साधे पण परीक्षा पाहणारे असे होते. त्याचा स्मरणाशी अधिक सबंध होता दोन व्यक्ती समोराममोर बसून काही मिनिटे आपली स्वत ची माहिती परस्पराना सागत. अशी सर्वांची माहिती सागून झाली की त्यातल्या एकेकाला उठवून डेव्हिड दुसऱ्याबद्दलची माहिती विचारीत असे. त्यामध्ये अपेक्षित असे होते की, नुकतीच आपण ऐकलेली माहिती कोणताही विलंब न लावता सलगपणे, सहजतेने लगेच सांगता आली पाहिजे काहीना जमले तर काहीचा काही प्रमाणात गोधळ झाला. दुसरा एक खेळ होता तो म्हणजे समूहात वावरताना जशी आज्ञा होईल त्याप्रमाणे प्रसंग उभा करणे, त्यातली एखादी भूमिका वठवणे. या गोष्टी तशा दिसायला साध्या आहेत पण करायला लागल्यावर अनेक प्रश्न उभे राहतात. या सर्वांचा अभिनयाशी येणारा संबंध महत्त्वाचा आहे.

मूकाभिनयाच्या सदर्भात शरीराची भाषा जशी डेव्हिडने शिकवली तसेच मुखवटे तयार करण्याचे प्राथमिक शिक्षणही दिले. प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या साह्याने

पृष्ठ ३२ वर

उसाकडून आता निलगिरीकडे

संजय संगवई

जुलै–ऑगस्ट १९८३ च्या दरम्यान नाशिक जिल्ह्यात निलगिरीची लागवड सुरू केली होती. त्यावेळी माझा मित्र सतीश कामत याच्यासह तिथे होतो. त्यासबधी 'माणूस' च्या १ ऑक्टोबर १९८३ च्या अंकात आढावा घेतला होता आता अडीच वर्षं झालीत. या प्रयोगाविषयी उलट–सुलट प्रतिक्रियाना खुद्द प्रयोगातूनच उत्तर मिळणार आहे. मात्र पर्यावरण, शेती यापेक्षा महाराष्ट्राच्या राजकारणावर या प्रयोगाचा काय प्रभाव पडू शकतो हे नुकत्याच पुन्हा दिलेल्या भेटीतून घेतलेला धाडोळा.

जवळ जवळ अडीच वर्षानतरच निलगिरीचं ते शेत पुन्हा पाहताना त्याच्या शक्तीचा प्रत्यय येत होता. चागली तीस फुटावर निलगिरी वाढली होती. केवळ याच शेतात नव्हे तर नाशिक जिल्ह्यातल्या दहा हजार एकरावर कमी–अधिक प्रमाणात अशीच निलगिरी फोफावत आहे. दररोज नवनवे लोक येतात निलगिरी उत्पादक सहकारी सोसायटीचे सदस्य होतात. कोणी अनाहूत कृषी–पदवीधर येतात. आपल्या गावात कशी निलगिरी लावली ते सागतात. एकवीसशे सभासदाच्या १० हजार एकरावर १ कोटी दहा लाख निलगिरी लावून तयार आहे. या निलगिरीच काय करायच या सदर्भात काहीतरी घाटत असतानाच नांदगावचे वसंतराव मुसळे व त्याचे सहकारी भल्या सकाळी नाशकात येतात आणि विनायकराव पाटलाच हार घालून आभार मानतात. कशासाठी, 'निलगिरीपासून मिळणाऱ्या लगद्यापासून कागद तयार करण्याचा कारखाना आमच्या जमिनीत घालणार आहात.' म्हणून.

१९८३ च्या जुलैपासून सशय, उपेक्षा, टीका याच्या पहाऱ्यात वाढू लागलेल्या निलगिरीचा अडीच वर्षाचा प्रवास इथपर्यंत आला आहे. काँग्रेस (आय) चे विधानपरिषदेचे आमदार विनायक पाटील यांच्या पुढाकारान त्यावर्षी दोन हजार एकरावर रोपं लावली गेली. शेतकऱ्याला पैसा देणार, बाजूनं पर्यावरणवाल्याच वृक्षारोपण करणारं हे पीक आता 'वृक्षशेती'च्या अखत्यारीत आल होतं निलगिरीवद्दलच्या प्रवादानी उलट–सुलट बाजूनी मजकूर वृत्तपत्रं, नियतकालिकं देत होती. त्यावेळी 'दादां' च्या म्हणण्याखातर अनेकानी आपल्या जमिनीवर हे नव पीक घ्यायची तयारी दर्शवली. सामाजिक वनीकरण व वनखात्याच्या सहकार्यान निलगिरीची रोपं आणली गेली. या खात्याच्या अधिकाऱ्यानी चागल सहकार्य केल. आता माणस आपणहून नाव नोंदवतात, जिल्ह्यातल्या तेरा तालुक्यात ३५ ठिकाणी सहकारी संघाच्या निलगिरी रोपवाटिका आहेत. येत्या दोन वर्षापर्यंत पचवीस हजार एकरांवर निलगिरी दिसेल असं सागितलं जातं.

आधी केवळ प्रयोग वाटणारं काम दुसऱ्या वर्षी जोम धरू लागल. १९८४ च्या ५ जून ते २० जून दरम्यान दोन हजार एकरांवर निलगिरी लागली. त्र्यंबक रोडवरच्या ऑफिसवर सकाळपासून रांगा होत्या. शेवटी रोपं सपल्याची जाहिरात द्यावी लागली.

आणि यावर्षी तीस टनी कागद कारखाना टाकायची पूर्वतयारी होत आहे. प्रकल्प अहवाल तयार आहे. नादगावजवळ दारणा धरणाचं रोजचं २५ लाख गॅलन पाणी देण्याची मजुरी मिळाली. जमीन मिळाली. इतरांना ३५ हजार रुपये एकरानं जमीन मिळते, ती हा मालक स्वत: होऊन देतो वर कारखान्यासाठी माझी जमीन घेतली म्हणून विनायक पाटलाना हार! त्याच्या संपर्क–विश्वासाहंता या बळावरोबरच, येऊ पाहणाऱ्या समृद्धीचा आपल्याला लाभ व्हावा ही इच्छा यामागे आहे. जिल्ह्यात दहा ठिकाणाहून कारखान्यासाठी आवतणं आली होती!

दहा हजारात निलगिरी आहे म्हटल्यावर अनेक कागद कारखान्याची बोलावणी येऊ लागली; पण कच्चाहून तयार होणाऱ्या लगद्यापेक्षा कितीतरी कमी भाव निलगिरीला देऊ केला. मात्र सोसायटी स्वत.च कारखाना काढणार म्हटल्यावर तो भाव आता टनाला बाराशेच्या आसपास गेला! एकरी किमान पस्तीस टन निलगिरीचं उत्पादन काढणारा शेतकरी एका कटाईत किमान तीस हजार काही चुकत नाही असा हिशेब लागत आहे. कारखान्यासाठी बँकांच कर्जही मिळायची शक्यता आहे.

निलगिरी आता स्थिरावू पाहत आहे. लिफ्टच्या कालव्याच्या पाण्याबरोबरच अंशत: पाणी मिळणाऱ्या किंवा अगदीच जिराइत असलेल्या जमिनीतही कमी–अधिक फरकानं ते पीक येऊ लागलं. निलगिरीविरुद्ध सशय, वाद असा प्रकार महाराष्ट्रात तरी अजून आहे अनेक संस्था, सघटना, वृत्तपत्रे यांनी त्याविरुद्ध किंवा त्याच्या बाजूने भूमिका घेतली आहे. मात्र त्याला आजपर्यंत केवळ पुस्तकी ज्ञानाचा, दुसऱ्या देशातील जमिनीतील संशोधनाचा आधार होता. आता नाशिक जिल्ह्यातील निलगिरीच्या वाढीच्या स्वरूपावर आपल्याला अंदाज आणि भूमिका बेतता येईल. त्यासाठी प्रत्यक्ष पुरावाच वाढत आहे.

पीक स्थिरावत्येय

निलगिरीमुळं जमिनीच्या पाण्याच्या प्रकृतीचं काय होईल ही चिंता सर्वजण व्यक्त करतात. जमिनीचा मगदूर कमी व्हायची अजून या भागात चिन्हे नाहीत. पहिली दोन वर्षं, सावली फारशी नसताना, गव्हासारखं आंतरपीकही इथं घेतलं आहे. सनातन प्रश्न आहे निलगिरी आणि भूगर्भातर्गत पाणी याचा? आतापर्यंत इथं 'तसा' काही अनुभव आला नाही. इतर कोणत्याही झाडाप्रमाणेच

निलगिरीला ठराविक काही काळ पाणी आवश्यक असते. जमिनीखालील पाण्याची पातळी कमी होण्याचा प्रश्न कुठे आहे असं विचारताना श्री. पाटील म्हणतात, 'निलगिरीचं मूळ जास्तीत जास्त तेरा फूट जमिनीखाली जातं. महाराष्ट्रात water-table तर वीस फुटाच्या खालीच येतं दुसरं असं की, पाऊस आला तर याची मुळं जमिनीत ओल धरून ठेवतात. खरं तर हे एक प्रकारचं वनीकरणच आहे.' असे सांगून ते आपल्या आवडत्या मुद्द्यावर येतात. 'तुम्ही (शासनाने) वनीकरणासाठी जी झाडं सांगितली, त्या यादीत निलगिरीचा समावेश आहे. मात्र मी एकदम दहा हजार एकरांवर निलगिरी लावतो, तीही खाजगी जमिनीवर, असं म्हटल्यावर तिच्यातले दोष तुम्हाला दिसायला लागले. सामाजिक वनीकरणाचे मी दोन भाग करतो. खाजगी आणि सरकारी. ही निलगिरी खाजगी जमिनीतच येणार...'

निलगिरीविषयी जे प्रवाद उठवले जात आहेत त्यात काहीच तथ्य निघाले नाही असेही ते म्हणाले. कर्नाटकात शेतकरी निलगिरी उपटून फेकून देत आहेत या वृत्ताची चौकशी करण्यासाठी सुमारे दोन वर्षापूर्वी समिती नेमली होती. त्यातून असं काही झालं हे सिद्ध झालं नाही.

भारतात निलगिरी लागते, ती नुकसानकारक ठरत नाही हे खरं पटायला पाहिजे. पण प्रयोगांती सिद्ध होण्याअगोदरच निलगिरीचं मोठ्या प्रमाणावर पीक काढण्यावर टीकेची झोड सुरू झाली. इथल्या शेतकऱ्यांना संपन्नता मिळू नये, इथल्या कागद-रेयॉन वगैरे कारखान्यांची परदेशातून पल्पची आयात चालू राहावी, यातून ही टीका उद्भवते— अशासारख्या संशयांना पुष्टी मिळते. म्हटलं तर विनोदानं, म्हटलं तर गंभीरतेनं श्री. पाटील म्हणतात की, 'या क्षेत्रात, इथल्या शेतकऱ्यानं, भारतानं स्वयंपूर्ण होऊ नये ऐसी इनकी, Multi-nationals की यह साजिश है।

ही साजिश (कट) खरी असो की नसो. ही निलगिरीची दहा हजार एकरातली लागवड आता Fait acompli आहे. कितीही टीका झाली तरी हा प्रयोग आता सुरू झालेला आहे. लागवड होत राहणारच. शेतकऱ्यांना स्वतःला येणाऱ्या अनुभवातनं या नव्या पिकाचं डावं उजवं ठरवलं जाणार आहे हा प्रयोग यशस्वी झाला तर संपन्नतेचं आणखी एक क्षेत्र शेतकऱ्यांना खुलं होणार आहे. कागद कारखान्याबद्दलच्या प्रकल्प अहवालात तर शेती आधारित उद्योगासंबंधी योग्य दिशा देणारा भारतात हा एकमेव प्रकल्प असल्याचे म्हटलं आहे.

पर्यावरण, सामाजिक संबंध, अर्थकारण याबाबत ग्रामीण क्षेत्रात निलगिरी हा भविष्यात कदाचित मोठा (किंवा प्रमुख) घटक असू शकेल. मात्र त्याची क्षमता एवढ्यापुरतीच मर्यादित आहे का ?

□

असं सांगतात की, वसंतदादा पाटील राजस्थानला जायला निघाले असताना विनायकराव पाटील त्यांना भेटायला गेले. इतरही बरेच लोक होते. त्यावेळी दादा म्हणाले, 'हा तुमचा नवा विखे-पाटील आहे.'...

कै. विखे-पाटलांनी डॉ. धनंजयराव गाडगीळांच्या सोबतीनं,



विनायकराव पाटील – स्वतःच्या निलगिरी-शेतीत

□

ऊसाचं अर्थकारण महाराष्ट्रात रुजवलं, त्याचं फलित म्हणजे साखर कारखान्याच्या क्षेत्रात खेळत असलेला पैसा-आणि त्याचा महाराष्ट्राच्या राजकारणाशी असलेला संबंध. विनायकराव पाटलांची निलगिरी पैसा तर आणू शकेलच. त्याची पूर्वतयारीही चालूच आहे. येत्या दोन-तीन वर्षात पहिला कागद कारखाना नांदगावजवळ उभा राहणार आहेच. मात्र निलगिरीचं सहकारी राजकारण ते आणू शकतील का ? तसं पाहता राजकारणाला भरपूर वेळ देता यावा म्हणून त्यांनी निलगिरी लावायची ठरवली. पण त्या निलगिरीनंच आता Long-term politics ची दिशा देण्यासाठी सध्या त्यांना खोळंबून ठेवलेलं आहे. तरी ते आपले म्हणत असतात– '१९८८ वर्ष येऊ दे. त्यावेळी १९८३ मध्ये लावलेल्या निलगिरीची पहिली कापणी होईल...मग ..' अडीच वर्षापूर्वी त्यांनी निलगिरीच्या शक्तीबद्दल म्हटलं होतं की– भारतात सहकाराच्या सध्या दोन शक्ती आहेत. एक आनंदच्या दूध सहकारी संस्थेची, दुसरी विखे-पाटलांच्या साखर कारखान्याची, आमची निलगिरी ही सहकाराची तिसरी दिशा असेल. ('माणूस' १ ऑक्टोबर १९८३).

आज त्यांचं निलगिरीचं कार्यक्षेत्र वाढत जात आहे. केवळ नवं पीक– शेतीतले नवे प्रयोग, सामाजिक कार्य एवढं साधं हे उद्दिष्ट नव्हतंच. खासगी शेतीवर आधारित सहकारी उद्योग हे अखेर सत्तेचं स्थान असतं या जाणवेतूनच महाराष्ट्रातलं राजकारणी मन घडत

असतं. विनायकराव १९८८ ची वाट पाहत आहेत. निलगिरीमुळे नाशिक जिल्ह्यातले अनेक भाग, आपल्याबरोबर नसलेले अनेकजण आता साथीला आहेत. सध्या दहा हजार एकरावरच्या भाणसांना त्याचा शब्द प्रमाण आहे. निलगिरीतून उभे राहणारे कारखाने, त्यांची फायदेशीर-ता, त्या उद्योगांचं, सहकारी सोसायटयाचं, अर्थकारण ही राजकीय शक्तीची सुप्त केंद्रे आहेत. मात्र हे नाशिक जिल्ह्यातल्या नेत्यांना त्यावेळी लक्षात आलं नव्हतं. विनायक पाटलानी धडाक्यात पुढाकार घेतला. आता इतरानी फक्त पाठपुरावा करणं हाती उरल आहे. यशवतराव चव्हाणानी विनायक पाटलांना अशी दूरगामी दृष्टी ठेऊन आशीर्वाद दिला होता– वसंतदादाच्या बुजुर्ग नाकाला हा वास लगेच कळला इतरजण ?

'They were caught napping'–इति विनायकराव.

'कसं.'

'मी निलगिरी लावतोय हे प्रत्येकजण पाहत होता; पण त्याची परिणती काय होईल ते त्याना लगेच आकळलं नाही. त्याना वाटलं हा वनमहोत्सवासारख काही तरी करतोय आणि ज्यावेळी निलगिरी भराभरा पसरू लागली तेव्हा कळून आलं... पण तोपर्यंत खूपच उशीर झाला !'

एक विनायक पाटील या आमदाराची कथा गृहीत धरली, तरी त्यामागे व्यक्तिगत प्रभाव, विश्वासार्हता याचा वाटा फार मोठा आहे; पण ऊसाप्रमाणेच निलगिरीही स्वयंभूपणे राजकारणातला एक घटक होऊ शकेल का ? त्याची कुवत कितपत आहे ?

अर्थकारणातून राजकारणाकडे

निलगिरीच्या फायदेशीरपणात, त्याच्या सभाव्य अर्थकारणातच हे राजकारण लपलं आहे. निलगिरीसारखं कोडगं पीक नाही 'सर्व' प्रकारच्या वाया जाणाऱ्या जमिनीवर ते येऊ शकते. प्रथम, निलगिरीला बारमाही पाण्याचा सोस नाही. असल तर आनदच आहे. सहामाही, आठमाही कालव्याच्या, लिफ्टच्या पाण्याचा ऊसाला उपयोग नसतो. तो जळून जाईल. निलगिरीला पहिले दोन–तीन महिने पाणी मिळालं, त्यानंतर महिन्यातनं एक वेळा पाणी मिळालं तर त्यावर ती उत्तम येऊ शकते. नसलं पाणी तरी चालते. सहामाही–आठमाही पाण्यावरची निलगिरीही उत्तम फोफावते. ती मालकाला एकरी किमान वर्षाला ३५-४० टन लाकूड देतेच. जिरायती जमिनीत केवळ पावसाच्या पाण्यावर निलगिरी तगते. तिचा बुंधा बागायतीएवढा भरलेला नसेल ! त्यामुळे हे बारमाही पीक आहे हे निश्चित. पुन्हा ती ऊसासारखी Perishable वस्तू नाही. ती केव्हाही बाजारात आणता येईल.

या पिकाच्या मशागतीसाठी फार कष्ट घ्यावे लागत नाही. वर्षाकाठी एकरी पाचशे रुपये म्हणजे फार कौतुक झालं. याला गुरं तोंड लावत नाहीत पाखराचा जोजार नाही की कीडीचा आजार नाही. त्यामुळं निवृत्त अधिकारी, राजकारणी याबरोबरच मुबईतला पट्टेवालाही थोडयातरी निर्धास्तपणे अनुपस्थितीत राहू शकतात. एकदा जमिनीत निलगिरी लावली की इतर पिकाच्या मानान फार कमी खर्च आणि लक्ष लागतं (अर्थात् हा absentee landlordism चा प्रकार पुन्हा उफाळून येईल तर ती चिंतेचीच बाब आहे !) एक खरं की दुलक्ष, अक्षमता यामुळं पडीक जमिनी लागवडीला येतील. आदिवासीच्या महाराच्या वतनी जमिनी आहेत. मात्र त्यांना पीक घेणं परवडत नाही. दरसाल मशागत, सणंग, परवडत नाही. अशा जमिनी नुसत्या पडून आहेत. त्या लागवडीला येतील.

जमिनीचा पोत कसाही असो. निलगिरी तिथे येतेच. खार जमिनीत ती येते. नाशिक जिल्ह्यात मीठसागरे गावी तीस एकरात काही पिकतच नव्हतं. तिथं आता निलगिरी उभी आहे. या अतिरिक्त पाण्यामुळं पाणथळ (water-logged) जमिनीचा आपल्याकडं प्रश्न आहे. अशा ठिकाणी कोणतंच पीक येऊ शकत नाही. इथं फक्त निलगिरी येते. मात्र याबाबत एक सूचना विनायक पाटील देतात. या पाणथळ जमिनीतलं पाणी निलगिरी 'शोषून' घेते असं नाही. निलगिरी लावल्याने पाणथळ जमिनी पूर्वीसारख्या होतील असं नाही. इतर कोणतेही पीक येत नसताना, निलगिरी तिथं येते, एवढेच.

आज नाशिक जिल्हा निलगिरी उत्पादक सहकारी सघाकडे असलेल्या निलगिरीखालच्या जमिनीपैकी अदाजे ६०–७० टक्के जमीन अशा 'वाया जाणाऱ्या' प्रकारांपैकी आहे.

'अर्थात वाया जाणाऱ्या जमिनीवर मी निलगिरी लावत आहे, असा अपराधी सूर मी का लावावा ?' असं विनायकराव उसळून विचारतात !

'माझी उत्कृष्ट, पाण्याखालची काही जमीनही मी निलगिरीला देतो. त्यात माझा फायदा आहे. उसापेक्षा पाचपट फायदा, कमी कष्टात, कमी खर्चात मला दिसतो.'

सर्व प्रकारच्या जमीनमालकाचे हितसबध कमी–अधिक प्रमाणात पोसणार हे नवं पीक आहे. त्यान wasteland प्रमाणेच बागायती जमिनीचाही समावेश होतो. आज महाराष्ट्रात जलसिंचनाची जास्तीत जास्त क्षमता २५ टक्क्यांच्यावर नाही. सध्या १२ टक्के जमीन कोणत्या–ना–कोणत्या पाण्याखाली असते. त्यातही उसाचं क्षेत्र अगदीच कमी आहे. निलगिरीचे व्यापारी गुण हे उसासारखेच आहेत, मात्र त्यात बागायत–जिरायत हा भेद नाही बरोबरीला अनेक प्रकारची वेस्टलँड आहेच. पाण्याचा प्रश्नच नाही. (अगदी समुद्राचं पाणी घातल तरी ते पीक उत्तम येतं.) अशा वेळी संख्यात्मकदृष्ट्या आणि गुणात्मकतेने निलगिरी उत्पादकांचा गट हा जास्त व्यापक होणार आहे शेतकऱ्यातले 'आहेरे व नाहीरे' हे दोन्ही वर्ग त्यात सामील होऊ शकतात या गटांत केवळ बागायतदारच, मोठे जमीनदारच किंवा अन्य कोणत्या वर्णनाचे जमीनदारच, असा एकरंगी कारभार नसेल त्यामुळे ऊस उत्पादकाच्या गटापेक्षा निलगिरीची लॉबी अधिक वैविध्यपूर्ण, सामाजिक– आर्थिकदृष्ट्या विखुरलेली व्यापक, अभिसरणशील अशी असेल. अशा व्यापक, बहुरंगी सदस्यतेमुळे या गटाच्या दृढतेला वेगळे परिमाण येईल हे अलाहिदा.

निलगिरी नुसती बाढवून उपयोग नाही. त्याच्यावर आधारित व्यवसाय व उद्योग तरी कितपत टिकाऊ आहेत ? लागवड केल्यानतर पहिली दोन वर्षं गव्हासारखं आतरपीकही त्यात घेता येतं. याखेरीज नाशिकच्या शेतकऱ्यानी पाले–फळभाज्या लावल्या होत्या. कारण प्रत्येक रोपात ३ फूट व प्रत्येक ओळीत दहा फूट अंतर सोडलेलं असतं. याखेरीज बांबू, घायपात, मेस्टा वगैरेसारख्या उपयोगी आंतरपिकांचा प्रयोग करण्याचा प्रयत्न आहे निलगिरीचे निवळ खोड सोडल्यास त्याच्या फाद्या, शेंडा, इतर गठाळा यांचा इंधन म्हणून

उपयोग होतो. झाडाचा तीस टक्के भाग अशा तऱ्हेनं उपयोगात आणला जातो. कागद कारखान्याचा प्रकल्प अहवालानुसार सात हजार एकरातील निलगिरी पासून ३५ हजार टन लाकूड कागदाच्या लगद्यासाठी तर २७६० टन लाकूड विक्रीसाठी मिळते. सत्तर-ऐंशी फुटाचा भरीव एक बुधाच नुसता विकला तर त्याचे उत्पन्न भरपूर असते.

लाकूडफाटा-पाने वगैरेंच्या विक्रीपेक्षा मुख्य उत्पन्न लगद्यासाठी लागणाऱ्या लाकडाच्या विक्रीतून मिळते. या लाकडासाठी टनाला बाराशेपर्यंत भाव इतर कागद कारखाने देतात. एका एकरात ३५ टन किमान उत्पादन धरले तर मोठाच नफा होतो. कागद कारखान्यांची गरज साखर कारखान्याइतकी असते का ? हा प्रश्न इथे महत्त्वाचा आहे. साखर जीवनावश्यक वस्तूमध्ये मोडते म्हणून तिच्यातील अर्थकारणातून प्रभावी राजकारण साधता येते मात्र कागदाचं तसं आहे का ? मागे उल्लेखलेल्या प्रकल्प अहवालानुसार कागदाची देशातील मागणी साक्षरतेशी निगडीत आहे गेल्या काही वर्षांत कागदाची मागणी ९० टक्क्यापेक्षा अधिक प्रमाणात वाढली. गेल्या पधरा वर्षात ती आणखी ९७ टक्क्यानी वाढणार आहे त्यामानाने देशातल्या २४९ कागद कारखान्याचे उत्पादन अपुरे पडते. त्यांची एकदर क्षमता २३ लाख ४९९० टन आहे. (प्रत्यक्ष उत्पादन याहून कमी) तर या वर्षीची मागणी २८ लाख ३६ हजाराची होती. यातून वृत्तपत्रीय कागदाला वगळलेच आहे. सध्या भारताच्या दर माणसागणिक वर्षाला २ ग्रॅम कागद वापरला जातो. ते वाढत जाणार आहे. कागद उद्योगाला यापुढे बरे दिवस आहेत. त्यामुळे त्याला मार्केट तयार आहे तात्पर्य निलगिरीचा उत्पादक हा महत्त्वाचाच राहणार आहे. (अर्थात् निलगिरीच्या सामूहिक उत्पादनाचा काही भाग बाधकाम उद्योगास लावला तर निलगिरीला अधिक Strategic महत्त्व येईल.)

निलगिरीचे मर्यादित काळातल भवितव्य असं चमकदार व सुरक्षित आहे, त्याचा उत्पादक वर्ग जास्त व्यापक आहे. त्याचबरोबर ऊसाच्या क्षेत्रात येत्या दहा-पधरा वर्षात घसरणीला सुरुवात होणार आहे अस साखर कारखान्याचे तज्ज्ञ डॉ. गो. स. कामत म्हणतात. (माणूस १० / १७ ऑगस्ट ८५) साखर उद्योग ज्यावेळी उतरणीला लागेल, त्याची जागा घेण्यासाठी दुसरा कोणताच शेतीवर अवलबित, सघटित व सहकारी तत्त्वावरचा कृषि-उद्योग (Agro-based Industry) नसेल. तबाकू-कापूस याच्यात ती क्षमता नाही. अशावेळी ऐश्वर्याची, संपन्नतेची आस दाखवणारी निलगिरीच त्याची जागा घेऊ शकते. व्यापारी, औद्योगिक उपयुक्ततेच आणि अर्थकारण घडवून आणण्याची क्षमता अललेल हे पीक ऊसाची जागा तर घेऊ शकेलच पण त्यापूर्वीच त्याला शहदेखील देऊ शकेल. निलगिरी उत्पादक व त्यावर आधारित उद्योगाचा गट वैविध्यपूर्ण (Diversified) असेल. त्याचा मतदारसघ, लाभधारक हा ऊसापेक्षाही व्यापक असेल. अल्पभूधारकही नव्या रोजगार हमीनुसार आपल्या जमिनीवर निलगिरीचे वृक्षारोपण करू शकतात त्यामुळे साखर उत्पादनाइतके सामाजिक संघर्ष यात फारसे उद्भवण्याची शक्यता नाही. खासगी जमिनीवरच निलगीरी वाढणार आहे. मालकीची भावनाच हे पीक यशस्वी करेल. सरकारी, सहकारी वृक्षारोपण यामुळे काही होणार नाही अस श्री. पाटील पुन्हा-पुन्हा सागतात हे लक्षणीय आहे. याचे अनेक अर्थ व परिणाम सभवतात.

निलगिरीचा प्रतीक्षा काल किमान पाच वर्षाचा आहे. तीच एक मोठी 'त्रुटी' त्यात आहे. त्यामुळे पाच वर्ष जे स्व-बळावर वाट पाहू शकतात असेच सधन शेतकरी याच्यामुळे सपन्न होतील असा आक्षेप येण्याची शक्यता आहे. याला दोन उत्तर सभवतात. शेतकऱ्यानं आपली सर्व जमीन काही निलगिरीखाली आणायची गरज नाही. पाच एकरातली दोन-एक एकर निलगिरी लावायची ! त्याहीपेक्षा ऊस उत्पादन व साखर कारखान्याची-ज्याप्रमाण शासनाच्या पाठिब्यान भरभराट झाली, त्याचप्रमाण निलगिरीसाठीही सरकारनं ऊसाप्रमाणेच साहाय्य वाढवाव. बँका, नाबार्ड इत्यादी मार्गांनी जिरायती, लहान शेतकऱ्यालाही निलगिरी वाढवता येईल.

नवे हितसंबंध

सध्याची सत्ताधारी शुगर-लॉबी आहे म्हणून त्याची या सभाव्य नव्या शक्तीला विरोध राहील अस सरळ गणित मांडणं घाईच होईल. साखर उद्योग हा दहा-पधरा वर्षांनतर अस्ताला लागेल, त्यावेळी ग्रामीण भागात स्वत ची अर्थकारण-राजकारणाची विकास-चौकट प्रस्थापित करू शकणारा दुसरा एखादा शेतीवर आधारित उद्योग हा राज्यकर्त्यांना पाहिजेच. फक्त ज्याचे हितसबध साखरेत प्रत्यक्ष गुतलेले आहेत, त्याचाच काही वर्ष विरोध राहील. आपला राज्यकर्ता वर्ग तसा दूरदृष्टीचा आहे. कै यशवतराव व वसतदादासारख्या मुरलेल्या मुत्सद्यानी निलगिरीच महत्त्व ओळखल आहेच. भर म्हणून महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस (आय)तर्फे विनायक पाटलाची निलगिरीविषयक पुस्तिकाही अलिकडेच प्रसिद्ध झाली ! त्यामुळे प्रस्थापित सत्ताधारी गटाकडून उदयोन्मुख सत्ताकेंद्राला विरोध होण्याऐवजी त्याला (हिंदूधर्माप्रमाणे) स्वत तच सामावून घेण्याची धडपडच अपेक्षित आहे. एक खरं की, ही नवी सत्ताकेंद्रे साखर गटापेक्षा अधिक उदार असतील. त्याच्यामुळे इथल्या शेती-जगलसंबधी अनेक सघर्षांना वेगळे परिमाण मिळेल. अर्थात या वाजारातल्या तुरी.

आज नाशिकखेरीज पुणे, यवतमाळ, उस्मानाबाद, धुळे, कोल्हापूर- कोकणातला काही भाग इथे निलगिरी उत्पादक शेतकऱ्याचे सघ स्थापन झाले आहेत. अनेक संस्था, व्यक्ती विनायक पाटलाकडून रोपं, माहिती, मार्गदर्शन, नेतृत्व अशापैकी लागेल ती गोष्ट घेत आहेत येत्या दहा वर्षात निलगिरीचा 'प्रयोग' प्रस्थापित होईल. त्यावेळी या पिकाचा इथल्या जमिनीशी, पाण्याशी कसा सबध राहील, ते टिकेल का, ते वाजवी आहे का, याचा निकाल लागेल. ऊसाला पर्यायी शेती आधारित उद्योगासाठी लागणाऱ्या घटकाचा हा शोध असतो. या दहा-वर्षांत निलगिरीचा कारखान्यांपर्यंतचा, बाजारातला प्रवास व फीडबॅक पूर्ण होईल. त्यानतरच ही नवी लॉबी होणार की काय ते ठरेल. मात्र नव्या अर्थकारण-राजकारणाच्या सर्व क्षमता त्यात आहेत हे खरे ते महाराष्ट्रात नीट लागले तर ठीक नाही तर- विनायक पाटील म्हणतात- 'हे पहा साहेब, शेतकरी हुशार असतो. मी काही निलगिरीचा वकील नाही. हे फायदेशीर वाटल म्हणून घेतल. नसलं तर टाकून देऊ, दुसरं लाऊ !' □

लागा तयारीला : हॅलीचा धूमकेतू

डॉ. शरद अभ्यंकर

१०८० साली फ्रान्सचा सम्राट विल्यम द कॉंकरर याने इग्लडवर स्वारी केली आणि इग्लंडचा राजा हॅरीन्ड पराभूत झाला. त्या वर्षी आकाशात धूमकेतू दिसला होता. नवरा कामावर गेला की हल्लीच्या बायका घरी विणकाम करत बसतात त्याप्रमाणे विल्यमची राणी मातिल्डे हिनेसुद्धा (अर्थात आपल्या दासीच्या सहाय्याने) एक मोठे भरतकाम तयार केले. हे भरतकाम ५० सें मी. उच आणि ७० मीटर लाब आहे. या भरतकामात तिने विल्यमच्या स्वारीची निरनिराळी दृष्ये चितारली आहेत. त्यात आकाशात दिसणारा धूमकेतू लोक एकमेकाना आश्चर्याने दाखवत आहेत असे एक दृश्य आहे.

धूमकेतूला इग्रजीत कॉमेट म्हणतात. ग्रीक शब्द Kometes याचा अर्थ लाब केसाचा. त्यावरून कॉमेट हा शब्द आला आहे. (म्हणजे आपले शेंडे नक्षत्रच !)

या नक्षत्राला पूर्वी लोक फार घाबरत असत आणि ते साहजिकच आहे. इतर आकाशस्थ गोलक कसे शातपणे चमकत असत, गोलाकार किंवा चादणीसारखे दिसत असत आणि अवकाशात नियमितपणे, निदान गणित करता येण्याइतक्या नियमितपणे भ्रमण करत असत. पण या धूमकेतू मडळीचा सगळाच खाक्या निराळा. ते अचानक कोठून तरी उगवतात, कसेही संचार करतात आणि नाहीसे होतात. नेहमीच्या ग्रहगोलापेक्षा याचे स्वरूपही विचित्र असते. आपला लाबलचक केशसभार मोकळा सोडून आकाशात संचार करणाऱ्या एकाद्या स्त्रीच्या डोक्यासारखे !

आकाशातील ग्रहगोलाचा मानवी जीवनावर परिणाम होतो असे अनेकजण पूर्वी मानत असत. आपल्याकडे अजूनही अनेक भोळसट लोक असे मानतात. अशा लोकाना धूमकेतूसारखी चित्रविचित्र गोष्ट म्हणजे काहीतरी भयकर घडण्याची सूचना वाटणे साहजिक होते. काहीना त्याची शेपटी म्हणजे महाकाय तलवार वाटे तर इतर काहीजण आपापल्या मगदुरानुसार विविध कल्पना लढवीत असत. त्यामुळेच धूमकेतू दिसू लागताच आता युद्ध होणार, दुष्काळ पडणार, रोगराई माजणार, अनेक लोकाचा मृत्यू ओढवणार वा यातील अनेक गोष्टी एकत्रितपणे होणार असे भाकित अनेकजण वर्तवू लागत. लोकही त्या अपेक्षेत रहात आणि त्याची निराशा कधीच होत नसे. कारण धूमकेतू दिसण्याच्या वर्षात काहीतरी भयानक घडलेले असेच किंवा थोडे पूर्वी घडून गेलेले असे किंवा थोडे नतर घडत असे. अर्थात त्या वर्षी धूमकेतू दिसत नसे, त्या वर्षीसुद्धा असे काही ना काही उत्पात घडतच, पण तिकडे कोणी लक्ष देत नसे.

अवकाशस्थ ग्रह गोलाच्या गति ज्या शास्त्रीय तत्त्वानुसार घडतात ती तत्त्वे १६८७ मध्ये न्यूटनने गणिताच्या सहाय्याने माडून सिद्ध केली. हॅली हा न्यूटनचा खास मित्र होता न्यूटनच्या सिद्धांतानुसार धूमकेतूच्या आगमननिर्गमनाचे स्पष्टीकरण देता येईल असे हॅलीला वाटले. १६८२ मध्ये दिसलेल्या एका धूमकेतूचा त्याने मागोवा घेतला आणि त्याच्या मार्गाचा बारकाईने अभ्यास केला. त्यापूर्वी १६६७, १५३१, १४५६ या वर्षात दिसलेल्या धूमकेतूची नोद तपासून पहाता या सर्वांचे मार्ग सारखेच असल्याचे त्याच्या लक्षात आले. त्यावरून हा एकच धूमकेतू दर ७५ वर्षांनी पुन. पुन· येत असावा असा त्याने तर्क केला. १७०५ मध्ये त्याने धाडस करून आपले निष्कर्ष प्रसिद्ध केले आणि १७५८ मध्ये हाच धूमकेतू पुनः प्रगट होईल असा अंदाज व्यक्त केला. त्या काळच्या शास्त्रज्ञापैकी फार कोणी ही उपपत्ती मान्य केली नाही.

हॅली काही १७५८ पर्यंत जगला नाही. १७४२ मध्ये वयाच्या ८५ व्या वर्षी त्याचे निधन झाले. १७५८ साली खगोल शास्त्रज्ञानी फारसा उत्साह न दाखवता आकाश निरीक्षणाला सुरुवात केली, कारण हॅलीच्या हा भलताच निष्कर्ष म्हणजे काहीतरी खुळेपणा असावा असे त्याना वाटत होते. पण योहान पालिट्झ नावाचा एक जर्मन शेतकरी आणि नवशिका खगोल अभ्यासक होता. त्याचा हॅलीच्या उपपत्तीवर विश्वास होता. हा धूमकेतू दिसण्याच्या मार्गावर आपली दुर्बीण रोखून तो रोज आकाशाचे वेध घेत असे अखेर २५ डिसेंबर १७५८ च्या रात्री त्याला 'तो' धूमकेतू दिसला. तेव्हापासून या धूमकेतूला 'हॅलीचा धूमकेतू' हे नाव मिळाले; आणि प्रत्येक धूमकेतू हा त्याच्या प्रदीर्घ मार्गाचा प्रवास करून ठराविक कालावधीनंतर पुन दिसतो हेही शास्त्रज्ञाना पटले.

एकदा हॅलीचा धूमकेतू दिसल्यावर धूमकेतूचा अभ्यास करण्याची खगोल निरीक्षकात लाटच उसळली. आणि एका तरी धूमकेतूला आपले नाव मिळवून द्यायचेच अशी महत्त्वाकाक्षा प्रत्येकजण बाळगू लागला. फ्रेंच खगोल शास्त्रज्ञ शार्ल मेसिए हा या धूमकेतू सशोधकापैकी अजिक्यवीर मानला पाहिजे. आयुष्यातील ५० वर्षे त्याने तारागणाचे निरीक्षण करून थोडेथोडके नव्हे २१ धूमकेतू शोधले दुसऱ्या कोणी त्याच्या आधी एकादा धूमकेतू शोधला की त्याला फार चुटपुट लागे. त्याच्या प्रिय पत्नीच्या निधनाने त्याला तीव्र दुख झाले, तरी एका मित्राजवळ तो म्हणालाच की, पत्नीच्या शुश्रुषेकरता खर्च झालेल्या वेळात आणखी एखादा धूमकेतू सहज सापडला असता !

सुप्रसिद्ध अमेरिकन विनोदी लेखक मार्क ट्वेन याचा जन्म हॅली धूमकेतू वर्षातला. पुन्हा धूमकेतू आला त्यावेळी मार्क ट्वेन ७५ वर्षाचा आणि मृत्युशय्येवर होता. त्याला

दिलासा देऊ पहाणाऱ्या मित्रांना तो म्हणे ' मी धूमकेतूबरोबर आलो, धूमकेतू बरोबरच जाणार ' त्याप्रमाणे तो गेलाही !

आधुनिक खगोलशास्त्रज्ञांचे असे मत आहे की ग्रहगोलांचे पलिकडे दूर अंतरावर धूमकेतूंचा महाप्रचंड पट्टा आहे. यात अब्जावधी धूमकेतू बर्फासारखे थंडगार, केवळ काही किलोमीटर परिघाचे–संथपणे सूर्याभोवती भ्रमण करत असतात. सूर्याभोवती एक प्रदक्षिणा करण्यास यांना दशलक्ष वर्षेही लागतात. या प्रदक्षिणांचा मार्ग अतिशय लांबट अशा वर्तुळाचा असतो. धूमकेतू ज्यावेळी सूर्याच्या जवळ येतो त्यावेळी त्याचा काही भाग पूर्णपणे नष्ट होतो. असे होत होत कालांतराने काही धूमकेतू पूर्णपणे नाहीसे होतात.

एकोणिसाव्या शतकात असे नव्यानेच सूर्यमालेत प्रवेश करणारे पाच धूमकेतू आढळले होते. हे धूमकेतू प्रचंड आकाराचे आणि लांबलचक चमकदार शेपूट असणारे होते. पण हे पुन्हा काही दशलक्ष वर्षे तरी इकडे फिरकणार नाहीत. गेल्या शंभर वर्षात मात्र असा नवा धूमकेतू एकही आलेला नाही. पण आपला 'पुराणा विश्वासू' हॅली धूमकेतू मात्र केवळ ७५ वर्षात आपली प्रदक्षिणा संपवून पुन्हा पुन्हा येत रहाणार आहे.

१९८६ मध्ये मात्र हॅली धूमकेतू फारसा चमकदार व प्रेक्षणीय दिसणार नाही. कारण यावेळी तो नेहमीपेक्षा जास्त अंतरावरून जात आहे. पृथ्वीच्या जवळ असण्याच्या स्थितीत त्याची शेपटी आपल्या दिशेने असणार आहे. त्यामुळे त्याचे बाजूने दिसणारे भव्य चित्र आपणास दिसणार नाही. मात्र पृथ्वीच्या दक्षिण गोलार्धामधून तो जास्त चमकदार आणि स्पष्ट दिसेल.

अमेरिकेतील अनेक शास्त्रसंस्था आणि पर्यटन संस्था यांनी खास हॅली धूमकेतू दर्शन आणि अभ्यास यासाठी दक्षिण गोलार्धातील सहली आखल्या आहेत. युरोप, अमेरिकेपेक्षा आपला प्रदेश विषुववृत्ताला बराच जवळ असल्यामुळे आणि आपल्याकडे आकाश निरभ्र असल्यामुळे धूमकेतू जास्त चांगला दिसेल अशी आशा करायला हरकत नाही.

अमेरिकेत कोणत्याही नव्या गोष्टीचे वेड (क्रेझ) लगेच फैलावत. त्यानुसार हॅली धूमकेतू चित्रित करणारे बिल्ले, टी शर्ट, स्वेटर्स, पोस्ट कार्डे, कॉफी पात्रे आणि अशा अनेक वस्तू बाजारात दाखल झाल्या आहेत.

या धूमकेतूचा सखोल अभ्यास करण्याची संधी जगभरचे शास्त्रज्ञ साधणार आहेतच, पण अनेक राष्ट्रांनी या धूमकेतूच्या अधिक माहितीसाठी त्याच्या भेटीला उपग्रह पाठवले आहेत, त्याद्वारे या वेळी धूमकेतूबद्दल खूप अचूक आणि नवी माहिती मिळणार आहे.

राष्ट्र	अवकाश यान	धूमकेतूशी भेट
जपान	प्लॅनेट ए	७ मार्च १९८६
,,	एम्.एस्/टी–५	८ मार्च १९८६
रशिया	व्हेगा-१	६ मार्च १९८६
फ्रान्स	व्हेगा–२	९ मार्च १९८६
युरोपिअन स्पेस एजन्सी	जिओट्टो	१३ मार्च १९८६

यापैकी काही उपग्रह धूमकेतूपासून १ लाख ९३ हजार किलोमीटरवरून जातील तर जिओट्टो हा उपग्रह धूमकेतूच्या केंद्रापासून केवळ ४८२.७ कि. मी. वरून जाईल यातील दूरदर्शन कॅमेरे आपणास मानवी इतिहासात प्रथमच इतक्या जवळून धूमकेतूचे दर्शन घडवतील.

१९१० मध्ये हॅलीचा धूमकेतू पृथ्वीपासून केवळ २४ दहलक्ष किलोमीटर अंतरावरून गेला होता. यावेळी तो जाणार आहे ६२ दशलक्ष कि. मी. वरून. सूर्यापासून धूमकेतू जवळ असेल त्यावेळी तो स्पष्ट दिसतो. पण यावेळी तो सूर्यापलिकडे असताना सूर्यापासून सर्वात जवळ असणार आहे. मोठ्या शहरातील प्रचंड झगमगाटामुळे एरवीसुद्धा आकाशातले अशक्त तारे दिसत नाहीत. त्यामुळे शहरापेक्षा खेड्यातून धूमकेतू चांगला दिसेल.

आकाश निरीक्षण करायचे म्हटले की लगेच आपल्या डोळ्यापुढे लांबलचक एकनेत्री दुर्बीण येते. पण धूमकेतू पहाण्याकरता या दुर्बिणीपेक्षा द्विनेत्रिका (बायनॉक्युलर) जास्त चांगली. ७×३५ किंवा ७×५० एवढे विस्तारीकरण देऊ शकणारी द्विनेत्रिकादेखील धूमकेतूचे चांगले दर्शन घडवू शकेल. चांदण्यारात्रीपेक्षा अंधाऱ्या रात्री हे दर्शन जास्त स्पष्ट होईल. फेब्रुवारीतील काही दिवस धूमकेतू सूर्याचे मागे जाईल, पण पुन्हा एप्रिलपर्यंत दिसू शकेल. चला तर लागा तयारीला ! □

(सुप्रसिद्ध वैज्ञानिक लेखक आयझॅक असिमॉव्ह याच्या एका लेखाचे आधारे)

अधिक वाचन :

1) Comets : The Swords of Heaven by David Ritchie. (New American Library)

2) Observer's Guide to Halley's Comet : by James Muriden (Arco publishing)

3) The Comet Book : John C. Braner, & Robert Chapman.

4) Halley's Comet : Memories of 1910. John Tullus (Avon)

विविधता आणि सहज शैलीमुळे वाचनीय – बाहुल्या

सध्याच्या स्त्रीलेखिकांमधे आपल्या वैशिष्ट्यपूर्ण लिखाणानं स्वतःचं खास स्थिर स्थान निर्माण केलंय आशा बगे यांच्याप्रमाणेच सुनीती आफळे यांनी. लिखाणाची शैली अतिशय साधी, सहज आणि अकृत्रिम अशी. तिरकस भाषा, आशय आणि वळणं, सूचकता या प्रकारांचा जराही अवलंब न करता अमोघ, अबोध असं काहीही न लिहिता त्यांची कथा सत्यकथेत प्रसिद्ध होत राहिली. याचं कारण आणि पर्यायानं त्या कथांची गुणसंपन्नता, वाचल्यावर जी जाणवते ती ही की, पात्रं त्यांच्या मनातून बाहेर पडल्यावर आफळे त्या पात्रांच्या मनात शिरतात आणि त्यामुळे सूक्ष्म मनोविश्लेषण हा त्यांच्या कथांचा गाभा बनतो.

या संग्रहातली पहिलीच कथा 'बाहुल्या' ही सर्व गुणवैशिष्ट्यांनी परिपूर्ण आहे. अगदी शीर्षकापासून तर सजीव पात्रांपर्यंत. वातावरण गुजराथमधलं. तऱ्हेतऱ्हेच्या सुंदर बाहुल्या तयार करणारी शकुन. चाळिशी गाठली तरी अविवाहीत. स्वतःचा संसार ती उभा करू शकली नाही पण संबंधितांचे संसार उभे करण्यात तिचा जन्म चाललाय. लग्न या घटनेनं तिला दोनदा हुलकावणी दिलेली. पण ज्या दोन व्यक्तींशी तिचं लग्न होऊ शकलं नाही, त्यांचे आजारी, पांगळे संसार मात्र तिच्या गळ्यात पडले. निरुपमा कांता, रमणिक, किशोरभाई, रसिक या सर्वांसाठी ती झिजते आहे. ते सर्व तिच्यावर हक्कच असल्यासारखं वागतात. शकुनही त्यांना आर्थिक, मानसिक, टेकू देत राहते. प्रथम किंवा मध्येच काही वेळा तिला आपल्या आयुष्याची चीड येते. तिला वाटतं, या सर्वांशी संबंध तोडून टाकावेत आणि फक्त स्वतःसाठी जगावं. पण खरं तर तिला या अशाच जगण्याची सवय झालेली आहे. कुणी तरी आपल्यावर विसंबून आहे, आपल्यावर हक्क सांगतंय यात तिला सुखाची नशा सापडू लागली. शेवटी माणसाला जगायला कशाची तरी नशा हवी असते आणि ती कोणाला कशात सापडेल याचा नेम नाही. कुणी तरी आपल्या आधारानं आयुष्य उभं करतंय ही शकुनला जगण्याची प्रेरणा देणारी नशा आहे. जिवंत आणि खोटचा कापडी अशा दोन्ही प्रकारच्या बाहुल्यांना उभं करण्यानंच तिचं आयुष्यही उभं राहिलं आहे ! त्यांना नाकारल्यानं ते कोलमडेल की काय असं तिला वाटतं.

जीवनात शकुनसारख्या अनेक व्यक्ती आपल्या पाहण्यात येतात. पण त्या सामान्यांपेक्षा वेगळ्या असतात. शकुनही तशीच वेगळी. म्हणूनच कथा वाचून संपली तरी आपली सहानुभूती जिंकत ती मनात रेंगाळतच राहते. आपली कला, आपली अस्तित्वच इतरांसाठी राबवलं जातंय या वास्तवाची एकीकडे चीड येत असतानाच ती त्या वास्तवाच्या पूर्ण आहारी जाते. इतकी, की तिला नकोशी वाटणारी माणसंच तिच्याही आयुष्याचा तंबू उभा करतात. या कथेचं बाहुल्या हे रूपकात्मक शीर्षक फारच उचित आहे. शेवटी जीवनाच्या रंगमंचावर सगळ्याच तर बाहुल्या आहेत. कोणी तरी उभं करणारं, कोणी तरी नाचवणारं आहे म्हणून सर्व ठीक चाललंय. असा एक व्यापक आशय या कथेतून ध्वनित होतो.

वेधक, सहज शैली

सुनीती आफळे यांच्या सर्वच कथांचा प्रारंभ हा वेधक आणि सहज असतो. अगदी साधी कुठली तरी कृती कथेच्या आरंभी असते. पाच सहा ओळीतच पात्राच्या तोंडी एखादं वाक्य येतं. हा प्रारंभ रेंगाळणारा नसतो. गाडीनं भराभरा मांघे बदलावेत किंवा पोहोणाऱ्यानं चार–पाच हात मारताच किनाऱ्यापासून दूर जावं, तसं लेखिका झटकन् वाचकाला मूळ आशयाच्या खोलीत आणि प्रारंभापासून दूर घेऊन जाते. पुढचे धागे इतके भराभर विणले जातात की कथेच्या विणीत आपल्यालाही मनाचा धागा अलगद येऊन मिसळतो.

काही कथांमध्ये जुनं, एका विशिष्ट काळचं वातावरण आहे. मोठमोठाले वाडे, त्यात वावरणारी एकत्र कुटुंब, ते काहीसं दडपलेलं वातावरण, वाड्यांमधली विशिष्ट जीवनपद्धती मागे पडून आज काही फार काळ लोटला नाही. आजही ते चिरेबंदी वाडे सरत्या श्रावणाच्या, मिटल्या कळ्यांच्या अनेक गोष्टी सांगतात. जुनी परंपरा, रीतीरिवाज जपणारे अजूनही काही वाडे आहेत. विकीर्ण झालेल्या शहरी फ्लॅटस्मधूनही त्यांच्या खाणाखुणा आढळतात. 'तळघर', 'महिरप', 'वाळवण' या कथांमधून हे वातावरण फार प्रभावी रीतीनं प्रत्ययाला येतं. तेव्हाची जमीनदारी, तो रुबाब आता संपलेला असतो. पण मनाच्या तळघरात आठवणींची रास लागलेली असते. जुन्या, नको असलेल्या, टाकून दिलेल्या अडगळीतल्या वस्तूंसारख्याच आठवणी. 'तळघर' ही अशीच प्रतिमा होऊन येते. वैभव लयाला गेलेल्या वाड्यात अद्यापही नातीगोती आणि नातलगांचा पसारा सांभाळत वावरणाऱ्या माणसापैकीच आत्याआजी एक. मन मोकळं करायला त्या संबंध वाड्यात तिला तेवढी एकच जागा होती – वाड्यातलं तळघर. वाड्यात खंडीभर नोकरांचा राबता. अश्रू गाळायची चोरी. लहानपणीच लग्न होऊन सासरच्या चौकटीत अडकलेल्या, सारा छळ, सासुरवास मुकाट्यानं सहन करणाऱ्या, नवऱ्याच्या ठेवलेल्या प्रेमपात्रामुळं अपमानित, दुर्लक्षित जीवन वाट्याला आलेल्या जुन्या स्त्रियांचं प्रतिनिधित्व ही आत्याआजी करते. काळ बदलला तसं सर्वच बदललं. वाड्यापासून फ्लॅट आणि स्वतंत्र बंगल्यापर्यंतचा भावनिक प्रवास लेखिका नकळत रेखाटते. नव्या घरबांधणीत आता अडगळीच्या खोलीची किंवा तळघराची गरज नाही कारण स्त्रीचा इतका कोंडमारा आता होत

नाही. मागच्या पिढीन भोगलेल्या भयानक दु खाची कल्पना आता नव्या पिढीला येणार नाही. जुन्या घरामध्ये मोठ ऐसपैस देवघर असायचं. पितळी गजाच छोटस दार, महिरप यानं देवघर सुशोभित झालेलं असायच. या देवघराचं आणि देवाचं अस्तित्वच नाकारणारे पडितराव 'महिरप' या कथेत भेटतात. त्याची मत फारशी न पटणारी पण त्यांच्या मुलाशीच विवाहबद्ध झालेली नलिनी हळूहळू त्याच्या साहित्यिक प्रभावान दिपून जाते. देवाला नाकारणारे पडितराव मात्र स्वत: देव बनून इतरांची आयुष्यं त्यांच्या मनाप्रमाणे घडवीत होते. तो मोठेपणाचा हव्यास होता त्याचा मुलगा दामोदर त्याच्यापुढे अगदीच दुबळा वाटत होता. पण असं कणाहीन वागण त्याला स्वीकारावं लागलं होत. अशी लीनता स्वीकारताना त्याला केवढी मानसिक शक्ती एकवटावी लागली असेल ! नलिनीला पडितरावाच्या मृत्यूनंतर दामोदरच्या या मोठेपणाचा एकदम साक्षात्कार होतो आणि तिला जाणवत, की मोठेपणाच्या धडपडीपेक्षा अस लीन होऊन जगण्यालाच खरं तर फार थोरपण लागत ! 'वाळवण' या कथेतल्या सुषमा आणि तानुबाई या दोघीही घरातल्या अशाच अगतिक परिस्थितीपुढे लाचार आणि शरणागत झालेल्या. नागपूरमधल ते प्रशस्त घर. माडीच. घरात नोकराची वर्दळ. वर अडगळीची खोली. घरातली माणस मात्र विचित्र स्वभावाची. भोसल्याचे एके काळचे सरदार आबासाहेब. आता तो रुबाब उगाचच मिरवताहेत. जाडजूड मिशाचे धिप्पाड आबासाहेब. माणसापेक्षा रीतीभातीनाच जास्त मानणारे. स्वभाव आकाशपाताळ एक करणारा. तोलामोलाचच स्थळ पाहिजे या हट्टापायी मुलगी, बेबीताई, तिशीला आली तरी तशीच आहे. झुरणीला लागलेली. त्याच्यापुढे शशाक देखील दबून वागणारा. माईसाहेब तर शशांक आणि सुषमा याना शक्यतो जवळच येऊ देत नाहीत. वातावरण कसं नासलेलं. सुषमाला हा कोडमारा सहन होत नाही पण आपण परत गेलो माहेरी, तर आपल्या बहिणीची लग्नं होणार नाहीत या भीतीनं ती स्वाभिमान बाजूला ठेवून, अपमान गिळून या घराला शरण जाते. सगळ्या आयुष्याचंच वाळवण झालेलं. सुशिक्षित सुषमाची तऱ्हा नवऱ्याच्या लाथा खाणाऱ्या अशिक्षित तानुबाईपेक्षा वेगळी नाही.

स्त्री व्यक्तीप्रधान कथा

'लेन्सिस' ही वेगळ्या धर्तीची कथा' विषय अगदी साधा. किंबहुना श्रीमती आफळे यांच्या कथेचे विषय वेगळे आणि नवीन वाटतील असे नाहीतच. अनेकाकडून हाताळून झालेले. पण मग त्यांच्या कथाचं आकर्षण कोणत ? तर त्या विषयाची मांडणी त्यांची स्वत:ची, हृदयाला सहज भिडणारी आणि त्यातही पुन्हा कलात्मकतेची जाण असलेली पुरेशी अलिप्तता. 'लेन्सिस' या कथेची मध्यवर्ती कल्पना अगदी सुटसुटीत. एक सुरेख तरुणी. तिच्या मनात यौवनसुलभ प्रेमभावना. तीही प्रीती तिला लेन्सिस बसवणाऱ्या डॉक्टराबद्दल. त्याच तिच्याशी वागण मधुर आणि सलगीच. ती त्याला प्रेम समजते. नतर तिच्या लक्षात येत की ते प्रत्येक तरुण मुलीशी तसच वागतात ! अशी ही मूळ कल्पना. मग या कथेत ती वेगळी का वाटते ? तर 'लेन्सिस' या सुंदर माध्यमामुळे प्रेम ही दृष्टी असते. बघणाऱ्याची आणि बघवून घेणाऱ्याची मीनाचे डोळे तरुण वयात अधू झालेले लेन्सिस लावण्यापूर्वी आणि नंतर तिला कसं दिसायचं त्याचं सुरेख वर्णन लेखिका करते. डॉक्टरानी डोळ्यात लेन्सिस बसवल्याबरोबर तिला भपकन् सगळ दिसलं. इतक स्पष्ट की जणू सगळ नव्यानच दिसतय गेल्या कित्येक वर्षात तिला इतकं स्वच्छ, स्पष्ट दिसत नव्हत. तिन आरशात पाहिलं. गोऱ्या गालावरचे दोन पिंपल्स, भुवयीमधला केसन्केस, हनुवटीवरचा तीळ, सगळ कस लख्ख ! आतापर्यंत रस्त्यावरच्या माणसांची फक्त डोकीच दिसायची सगळं अंधुक. आता डोळे, त्यातले भावही स्पष्ट दिसू लागले ! ज्या डॉक्टराची ओळख तिला स्पर्श गधान पूर्ण झाली होती, तिला आता दृष्टीला दिसलेल्या वारकाव्याचीही जोड मिळाली. मीनाची दृष्टी बदलली होती ! खरी आणि डोळ्यातलीही ! जरा वेळात तिथ दुसरी स्मार्ट युवती आली. डॉक्टर मीनाला सोडून तिच्याकडे वळले ! चष्म्याची काच तडकून सगळ अस्पष्ट दिसावं तस झालं. पूर्वीच्या आणि नव्या दृष्टीची गल्लत झाली होती हा मीनाच्या भावविश्वाला गेलेला तडा होता. लेन्सिस लावल्यावर तिला जे दिसलं, ते फारच स्पष्ट होतं, इतक्या स्पष्टतेची तिला सवय नव्हती ! तिन लेन्सिस काढून टाकल्या. तेव्हा तिला जे बाहेरच अंधुक जग दिसल, तेच तिच्या ओळखीचं होतं. 'इतक्या स्पष्टतेची सवय नको का व्हायला ?' हे द्वर्थी सूचक वाक्य कथेचं मर्म सागून जात. कोवळ्या भावनाच मोल देऊन सत्य स्वीकारण्याची दृष्टी जीवनात केव्हा ना केव्हा मिळवावीच लागते.

सुनीती आफळे याच्या कथा स्त्री–व्यक्तिरेखा– प्रधान अशा आहेत त्यात पुरुष अनुषंगानं येतात. कधी स्त्रीची प्रतिमा उजळ करायला तर कधी स्त्रीमनाचे कगोरे अधिक तासून स्पष्ट करायला. स्त्रीला सहानुभूती मिळावीच अशा हेतून काही कथा लिहिल्या आहेत की काय असा काही वेळा भास होतो आणि पुरुष पात्रावर अन्याय होतोय असही वाटतं किंवा त्यांच्या वागण्याचं पुरेस स्पष्टीकरण किंवा पार्श्वभूमी नाही म्हणून की काय, 'तिढा' सारखी कथा विशेष काही न साधता केवळ नवराबायकोचं भाडण याच पातळीवर थाबते.

तथापि स्त्रीमनाची आगळी उकल 'घरट' आणि ''ओळख' या दोन कथामधून हळूवार रीतीन होते. 'घरट' या कथेत आहे महिन्यातून पधरा वीस दिवस दूरवर जाणारा सतीश आणि तो एकलेपणाचा काळ सबंधियाच्या सोबतीनं रेटणारी चित्रा. तो नसताना तिला शेजाऱ्यांची, मैत्रिणीची सतत गरज पडते. एकेक माणूस ती जीव लावून जपून ठेवते. सतीश घरी परत येतो तेव्हा त्याला या सगळ्याचा उपद्रव होतो. त्याला फक्त चित्रा हवी असते. आपल्या पश्चात ती याच माणसाच्या आधारे दिवस कठते याची त्याला जाणीवच नसते. तो येतो आणि सगळ्याचे बध तटातटा तोडून टाकतो चिमणीचं घरटं कोणीतरी उसकटून टाकाव तसं. ती बिचारी पुन्हा काडी काडी करून जमवते. सतीश परत दूरवर गेला की चित्राही असंच दुरावलेल एकेक माणूस पुन्हा जोडते. घरटं तिला रचायला हवच पुरुष भरारी मारून दूर उडणार आणि पुन्हा याच घरटयात येणार ! तोवरचा काळ तिला इथच प्रतीक्षा करायची आहे. घरटयाला मायेची

ऊबहीं हवी आहे या कथेची कल्पना छान आहे पण कथा किंचित कृत्रिमतेकडे झुकली आहे. सतीशने माणसं कशी कशी तोडली त्यासाठी घटनाची एक उतरंड रचल्यासारखं वाटत.

मातृत्वभावनेचा पहिला वहिला आविष्कार 'ओळख' या कथेन समर्थपणे पेलला आहे. लाकूड, दगड, विटा, सिमेंट याच्या रचनेतून घर तयार होतं, तर पोटातला इवलासा जीव एका कणापासून कणाकणानं घडत असतो. मातृत्वाची चाहूल उशिरा लागल्यामुळे आपल्याला बाळ होणार या कल्पनेनं हरखून न जाता निमा तो आता कसा दिसत असेल याचाच विचार करते. अरूणबरोबर ती त्याच्या बाधकामाच्या साइटवर जाते. तिथं सगळं अर्धवट बांधकाम ओबडधोबड. सुबक आकार नाहीच. ते चित्र तिच्या मनावर ठसतं. घर बाधून पूर्ण व्हायच्या आतच वेदनानी तिची कूस फोडून बाळ बाहेर येतो ते पूर्ण घडलेलं अर्भक आणि निमाच्या मनावर तर अर्धवट घराचं चित्र कोरलेल. तिची ओळख कुठेच जुळत नाही. आपणच आपल्या रक्ताने बाळाचा रोम रोम घडवला पण तो आपल्यालाच वेगळा का वाटतो ? ओळखू का येत नाही ? सगळ्या घडामोडी तिच्याच गर्भात पण तिला नकळत घडलेल्या ! मग एक दिवस तिच्या नकळतच पूर्ण झालेल्या घराच्या जिन्याचं तिला दर्शन होतं. घरातल्या इतरानी बाळाचं असंच पूर्ण रूपच कल्पिलेल. या रूपाची तिन मात्र कल्पनाच केली नव्हती. जिना पूर्ण घडलेला पाहून मात्र तिचं वात्सल्य तीव्रतेन जाग होत आणि अनोळखी वाटणारा बाळ तिला फार आपला वाटायला लागतो. प्रथम मातृत्व प्राप्त होणारी कोणतीही स्त्री अशा तऱ्हेचा विचार न करता आधी ते तान्हुलं उराशी कवटाळेल हे सत्य या कथेत डावलल असलं तरी एक हाडामासाचा जीव कसा घडतो या निसर्गाच्या किमयेचं कुतूहल स्त्रीच्या मनात कसं दडल असतं याच मात्र मनोरम दर्शन या कथेत घडतं.

अकृत्रिम सहजतेमुळे सौ. सुनीती आफळे यांच्या कथा वाचनीय आहेत याबद्दल मात्र वाद नाही.

—आशा कर्दळे

बाहुल्या
सुनीती आफळे
प्रतिमा प्रकाशन,
पृष्ठे : १५०, मूल्य : रु. ४०.

काही सोनेरी, काही चंदेरी

लहानानी मोठ्यांना नमस्कार केला. त्याना काही सप्रेम भेट वस्तू म्हणून दिली की ते म्हणत 'केशवं प्रतिगच्छति'. हा अनुभव मला माझ्या वाडवडिलाच्या बाबतीत आला असेच नव्हे तर माझ्या मागच्या पिढीतील वयोवृद्धाच्या बाबतीतही आला. यात मोठा अर्थ भरला आहे.

पार्श्वभूमीत लेखक लिहितात (पृ. ३) 'स्मृतीची पाने चाळताना एकाहून एक प्रसग मला पुन: प्रत्ययाचा आनंद तर देतातच पण पुन्हा पुन्हा बजावून सागतात की राल्फ वाल्डो इमर्सन म्हणतो (त्याप्रमाणे) की 'ऑल क्रेडीट टू अदर्स' तेच खर. यात लेखकाचा विनय व प्रामाणिकपणा दिसतो. म्हणजे लेखकाने जी पंचवीस स्मृतिचित्रे लिहिली त्याचे यश तो पूर्णपणे त्या त्या व्यक्तीच्या पदरात घालतो. माझे काही नाही. एका विशिष्ट मन स्थितीत त्याला लिहावेसे वाटले आणि ते त्यानी लिहिले. चागले अगर वाईट याचा विचार त्याने केला नाही ही त्याची निस्पृहता.

आत्मचरित्र लिखाणाच्या पठडीत जरी हे पुस्तक नाही तरी लेखनाच्या दृष्टीने खालील काही लेख आत्मचरित्रात्मक वाटणे साहजिक आहे 'पितया परित्वा साभाळिले' पित्याबद्दल (आईबद्दल कोणीही लिहील) एवढे कृतज्ञतापूर्वक व प्रेमळपणाने लिहिल्याचे म्हणून उत्तम शब्दचित्र आजोबा (आईचे काका) अकरावा ग्रह– घरच्या कामाकरिता मिळालेले प्रामाणिक गडी व मोलकरणी- त्याच्या सबधीची कृतज्ञता. वझिरानी–जीवलग स्नेही पण जणू काही कुटुबातले. वाटेवरल्या सावल्या, सारच सोनेरी आणि चमकणार चदेरी–वैयक्तिक पातळीवरची या पुस्तकाची पार्श्वभूमी. माणुसकीचा गहीवर ज्यात दिसतो अशी व्यक्तिदर्शने म्हणजे सिमल्याचा फुगेवाला, अकरावा ग्रह, वझिरानी, पठाणकोटचा बस ड्रायव्हर, हियरो एअर पोर्टचा टॅक्सी ड्रायव्हर.

लेखक केंद्र सरकारच्या निरनिराळ्या विभागात मोठ्या हुद्यावर होते, आणि त्या नोकरीच्या पस्तीस वर्षाच्या काळात निरनिराळ्या लहानमोठ्या व्यक्तीचा सहवास जो त्यांना लाभला, त्यानी ते डोळसपणाने पाहून निरनिराळे जे अनुभव घेतले त्या व्यक्तीची ही सजीव व्यक्तिचित्रणे आहेत. लेखकाचा मित्रसग्रह केवढा आहे त्याची कल्पना एक एक व्यक्तिचित्रण वाचताना मनात ठसून जाते.

नोकरीचा शेवटचा दिवस– हा कॅप्टन पायझी (ब्रिटीश नौदलातील एक अधिकारी) या परकीय माणसाचे शब्दचित्र सोडले तर बाकीची व्यक्तिचित्रणं आपली भारतीय आहेत. सर्व स्तरातील व्यक्तिदर्शने हृद्य आहेत. लेखकाने सग्रहाला 'काही सोनेरी काही चदेरी' असे नाव दिले असले तरी त्या व्यक्तीच्या व्यक्तीचित्रणात भेदभाव करता येत नाही, इतके ते लेखन सरस झाले आहे आणि ही व्यक्तिचित्रणे एक ते दीड किंवा दोन ते अडीच पानात झालेली असल्यामुळे लाबट–कंटाळवाणी बिलकूल वाटत नाहीत.

वाटेवरल्या सावल्या या लेखात जोगळेकर, सोमण या व्यक्ती मुबईच्या आहेत हे नक्की कळले पण पुढे त्याच लेखात पान १०९ वर मराठी ग्रथ संग्रहालयाचे अच्युत पाटणकर, सौ. कालिंदी भट, शेजारच्या सोसायटीत राहणारे डॉ. मोहन भाटे व त्यांच्या पत्नी सौ विद्या भाटे या व्यक्ती पुण्याच्याच (?) असाव्यात असे तर्काने जाणावे लागते.

प्रत्येक व्यक्तिचित्रण आणि त्याची प्रतिक्रिया लिहायची म्हणजे फार मोठा लेख होईल. पण थोडक्यात सागायचे म्हणजे सर्वच व्यक्तिचित्रणे इतकी चागली आहेत की वाचताना आपलेपणा वाटतो. कारण लेखकाची लिहिण्याची शैली. जिवत असून प्रासादिक आहे– थोडक्यात पण बरंच काही सागून जाणारी.

एकच खत वाटली आणि ती म्हणजे लेखकाने ज्या काळात लेख लिहिले त्यावेळचे किमान सन आणि कोणकोणत्या मासिकात ते लिहिले याचा उल्लेख लेखाच्या शेवटी आवर्जून हवा होता. त्यामुळे लेखकाच्या आत्मचरित्राच्या दृष्टीने काळाचा ओघही दिसला असता असे म्हणण्याचे कारण त्यानी त्याच्या काही लेखात 'वसंत' मासिकाचा

उल्लेखही केलेला आहे.

एवंच हे एक चांगले संग्राह्य पुस्तक आहे.

—वसंत फाटक

काही सोनेरी काही चंदेरी
श्यामकात गोखले
श्रीविद्या प्रकाशन
पृ ८+११५, किंमत २५/- रु.

प्रिय नीता,

तुझं पत्र मिळाल माझ्या पत्राची वाट पाहून तूच पत्र टाकलंस असं तू लिहिलयस. जाता जाता, शेवटच्या ओळीत तू जोशीबद्दल चौकशी केलीयस नीता, अग मैत्रिणीपासून कशाला काय लपवायच ? मनातल कुणाजवळ तरी बोलून टाकल तर मन तरी हलकं होत, उपाय सापडला नाही तरी. माझ पत्र आल नाही त्यावरूनच तू जोशीची प्रतिक्रिया ओळखली असशील. तरीपण आशेचा एखादा नाजूक तंतू माणसाला अडकवून अधातरी लोंबकळत ठेवतो. तशीच तूही टागणीला लागली असशील. अग, तूच काय, मीसुद्धा डोळ्यात प्राण आणून त्याच्या उत्तराची वाट पाहिली. शेवटी पत्र टाकल, पण त्याच्याकडून उत्तर नाही. आता उगाच आशा करण्यात काय अर्थ आहे ? पत्र टाकणारच होते तुला. पण लिहायच तरी काय, म्हणून चालढकल केली. मलासुद्धा त्या जोशाबद्दल खूप आशा वाटत होती दिसायला चारचौघांसारखा. शिक्षण चारचौघासारखं आणि घरची परिस्थितीही सर्वसामान्य. शिवाय इतक वाढलेलं वय आता याला सुदर आणि गोरी मुलगी कुठली मिळणार ? वाटलं होतं तुम्ही दोघं एकमेकासाठीच इतक्या उशिरापर्यंत लग्नाचे राहिलात.

हं. जाऊ दे. कदाचित याहून तुला चागला नवरा मिळायचा असेल तू म्हणशील, 'माझं हे नेहमीचं वाक्य. ना शेंडा, ना बुडखा असं. चांगलाच काय, नुसता नवरा मिळायचीसुद्धा मारामार.'

'खरच, का अस घडावं ? तसं म्हटलं तर, तू नि मी बरोबरीच्या. माझा मोठाच आता पंधरा वर्षांचा झाला. शाळेत बरोबरच होतो आपण. दिसायला चारचौघीसारख्या. पण आम्ही सामान्य परिस्थितीतले. एस. एस सी. झाले अन् माझं लग्न झाल. तुला मात्र पुढे शिकायच होत. तुझ्या वडलानी तुला मुलासारखं शिकवायच ठरवलं होतं. तू कॉलेजमध्ये गेलीस. तुझ्या बोलण्या-वागण्यात फरक झाला. तू खूप उत्साही, आनंदी बनलीस. तुझ्या बोलण्यात आत्मविश्वास आला. दिसायचीस तरी किती स्मार्ट आणि अजून तरी ओळखीची लोक म्हणतातच की, तू दिसायला स्मार्ट आहेस, हसतमुख आणि वागायला किती छान. पण लग्नाच्या बाबतीतच काय होत कळत नाही मला माहीत आहे, सुरुवातीला तुझ्याही मुलाबाबत काही अपेक्षा होत्या.' आणि का असू नयेत ? सामान्य मुलानासुद्धा गोरी, सुदर, ठराविक पद्धतीचे शिक्षण झालेली किंवा नोकरीसुद्धा असक्याच तऱ्हेची अशी बायको लागते त्याबरोबरच हुडा आणि महागड्या वस्तू लागतात तुझ्या अपेक्षा पूर्ण करणारा तुला कोणी भेटला नाही. मग अचानक तुझे वडील गेले आणि तुझ्या लग्नाची जबाबदारी भावावर आली. भाऊ हा शेवटी वडील होऊ शकत नाही. भावाच्या राज्यात दिवस काढण तुला कठीण होऊ लागल. म्हणूनच नोकरी करून तू पुढे शिक्षण चालू ठेवलस. वास्तविक नोकरी करावी अशीसुद्धा तुझी इच्छा नव्हती. एक छोटस घरट बांधावं आणि त्या छोट्याशा जगात आपण स्वतःला विसरून जाव एवढीच तुझी इच्छा होती. पण घरटं बाधायची अजून वेळच आली नाहीये. तुझ शिक्षण, अजून शिक्षण, आणि उच्च शिक्षण. त्याबरोबरच तुझ्या नोकऱ्या बदलत गेल्या. वरच्या अधिकाराची, वरच्या पगाराची. पण मला माहीत आहे, तुझ्या मनातल्या त्या घरट्याची ओढ कधीच कमी झाली नाही. भाऊ कधीकधी एखादं स्थळ पहात असे. मलाही मनापासून तुझ्या लग्नाची आच लागून राहिलीय. अचानक मला त्या जोशाबद्दल कळल. सगळ कस आवाक्यातलं. पण शेवटी योग नव्हता अस म्हणायच ह. हे नशिबाला शरण जाण आहे, का आपल्या सामाजिक परिस्थितीला ? मला कळत नाही, समाजच पुरुषाला श्रेष्ठ मानतो, त्याला सगळ्या सोयीसवलती पुरवतो आणि लग्न झालं नाही म्हणून मात्र स्त्रीला दोष देतो. असल्या समाजाची आपण तरी कशाला पर्वा करायची ? मला काय म्हणायचग, ते मला नीट सागता येत नाहीये नीता. त विचार करून बघ.

हे बघ, तू पत्रात लिहिलस, तुझ्या बॉसबद्दल. तुला नोकरीला लागून आठवडासुद्धा झाला नाही. त्यानं तुला, त्याच्या गाडीतून सोडण्याची इच्छा दाखवली. तुलाही वावगं वाटलं नाही. एकाच बाजूला तुम्ही जाणार होता. त्यावेळेस इतर सहकाऱ्याच्या नजरा तुझ्यावर रोखल्या होत्या. तुला वाटलं, त्याना तुझा हेवा वाटतोय; पण गाडीत बसल्यावर, काही वेळानतर, त्याच्या चाळ्यानी तू हैराण झालीस आणि मग सहकाऱ्याच्या नजराचा तुला अर्थ कळला. रात्री तुला झोप आली नाही. नोकरी सोडण्याचा निर्णयसुद्धा तू घेतलास मला आश्चर्य वाटत नीता, तू हे सगळ सहन का केलस ? अग, स्पष्ट पण साध्या शब्दात तू का सागितल नाहीस की, 'हे वागणं मला पसंत नाही, कृपया अस वागू नका' अस, बायका मुकाट्यानं सहन करतात म्हणूनच पुरुष अस वागतात तू स्पष्ट शब्दात तुझी नावड व्यक्त केली असतीस तर, मला खात्री आहे, अनपेक्षित घडल्यामुळे, तो माणूस एकदम down झाला असता तुला भीता वाटली ? कसली ? नोकरी जाण्याची ? अग, तुझ्या नोकरीला आठवडा तर झाला होता शिवाय नोकरी सोडावी असं तुला वाटू लागलं होत ना ? का या विषयात पुरुषानी कसही वागल तरी, बायकानी मात्र त्याबद्दल उच्चारसुद्धा करायचा नाही ? पण नीता, हे सगळं केव्हा, जो माणूस तुला आवडत नाहीये त्याच्याबाबतीत. तर आता मी माझ्या मुद्द्यावर येते आहे. हे बघ, लग्न होण न होण हे तुझ्या—माझ्या, कुणाच्याच हातात नाहीये. हा दोष समाजाचा आहे, का तुझ्या नशिबाचा आहे, हेही आपण ठरवू शकत नाही; पण एक गोष्ट मात्र नक्की, या सगळ्यापेक्षा निसर्ग मोठा आहे. निसर्गनियमानुसार आपला जन्म झालेला आहे. त्यानुसारच आपल्यात भावभावना निर्माण झालेल्या आहेत. बाकीच सोड; पण आपल्याला मूल हवं असं स्त्रीला वाटणं हे किती नैसर्गिक आहे ! मुलासाठी तड-

(पृष्ठ २४ वर)

स्वतःला कसे छळावे?

लेखक : कि. मो. फडके, एम. ए., एफ. आय. आर. इ. टी. (न्यूयॉर्क), डायरेक्टर, फडके सेंटर, मुंबई

□

एक : नामी तोडगा

विश्वास : (खोलीत प्रवेश करून) तुम्हीच फडके काय ?

मी : (खुर्चीकडे हात करून) होय. बस.

विश्वास : (खुर्चीवर बसताना) नमस्कार ! मी विश्वास केळकर.

मी : नमस्कार ! तुझे पत्र मला मिळाले आहे बोल मी तुला कोणती मदत करू ते.

विश्वास : स्वतःला पद्धतशीरपणे कसे छळावे हे 'फडके सेंटर' मध्ये अगदी शास्त्रशुद्ध रीतीने शिकविण्यात येते, असे मी ऐकले आहे. म्हणून मी तुमचा शिष्य होऊ इच्छितो.

मी : छान ! यापूर्वी तू याविषयी एखादा अभ्यासक्रम पूर्ण केला आहेस का ?

विश्वास : नाही. तीच तर अडचण आहे. आजपर्यंत मी आपला माझ्या डोक्यानेच स्वतःला छळण्याचे मार्ग शोधून काढून कसाबसा स्वतःचा छळ करीत आलो आहे.

मी : बघू तरी तुझे डोके कसे चालते. आज तू स्वतःला कधी व कसे छळलेस, ते सांग पाहू.

विश्वास : संध्याकाळी पाच वाजता मी तुमच्याकडे येण्यास निघालो, तेव्हापासून मी स्वतःला छळू लागलो. 'आपल्याला फडके सेंटर नीट सापडणार नाही. मग आपल्याला उशीर झाला तर ! बापरे, आपण पहिल्याच वेळी उशिरा गेलो, तर फडक्यांचे आपल्याविषयी किती वाईट मत होईल' ... असे काहीतरी स्वतःला सांगून मी माझा जीव मला अगदी नकोसा करून टाकला.

मी : (छद्मीपणे हसून) एखाद्या विषयाचा पद्धतशीर अभ्यास झालेला नसला की माणसाचे कसे नुकसान होते, ते पाहा. मला सांग आज सकाळी तू किती वाजता उठलास ?

विश्वास : (बावचळून जाऊन) ...आज सकाळी मी सहा वाजता उठलो.

मी : म्हणजे सकाळी सहा वाजता उठल्यापासून संध्याकाळी पाच वाजेपर्यंतचा वेळ तू अगदी फुकट घालविलास तर ! कारण त्या वेळात तू स्वतःला अजिबात छळले नाहीस असे दिसते.

विश्वास : (अपराधी चेहरा करून) तुमचे म्हणणे बरोबर आहे...म्हणजे मी 'फडके सेंटर'मध्ये येऊ लागलो, तर कालांतराने मला अगदी सकाळी उठल्यापासून स्वतःला छळण्याची कला आत्मसात करता येईल, असेच ना ?

मी : (तिरसट चेहऱ्याने) हेच तुझ्या कल्पनाशक्तीचे दारिद्र्य !

विश्वास : (कावराबावरा होऊन) म्हणजे ?

मी : (दिलखुलास हसत) अरे बेटा, फडके सेंटर तुला या कलेत इतका तरबेज करील, की स्वतःला सतत छळून घेत बसल्यामुळे तू मुळी रात्री झोपणारच नाहीस ! मग सकाळी उठल्यापासून स्वतःला छळण्याचे तुझे ध्येय म्हणजे तुझ्या कल्पनाशक्तीचे दारिद्र्यच नाही का ?

विश्वास : (खजील होऊन) तुमचे म्हणणे खरे आहे. मग तुम्ही आज मला पहिलाच धडा असा शिकवा की, माझी झोप उडेल. अशा रीतीने मी स्वतःचा मनसोक्त छळ करू शकेन.

मी : (गंभीर सुरात) थांब ! असा उतावीळ होऊ नकोस. फडके सेंटरमधील या अभिनव अभ्यासक्रमातील शेवटचा धडा पहिल्या दिवशी शिकवून कसे चालेल ?

विश्वास : (ओशाळवाण्या चेहऱ्याने) होय. कोणताही अभ्यास क्रमाक्रमाने, पद्धतशीरपणे करावा, हेच श्रेयस्कर.

मी : शाबास ! तू सकाळी उठल्याबरोबर स्वतःला कसा छळू शकशील, ते मी तुला प्रथम शिकविणार आहे. तेव्हा तू मला सांग की सकाळी उठल्याबरोबर स्वतःला छळण्यासाठी तुला काय करता येईल ?

विश्वास : (विचार करून) मला वाटते मी सकाळी उठल्यावर प्रातर्विधी वगैरे आटोपल्यावर, न्याहरी केल्यानंतर आठ वाजता महाविद्यालयात जाताना जर असा विचार केला की...

मी : वेडा आहेस ! कारण तुझ्या या पद्धतीने तू सकाळी उठल्यापासून आठ वाजेपर्यंतचा वेळ अगदी वाया घालवशील. म्हणजे या वेळात तू स्वतःला छळणार नाहीस.

विवेकनिष्ठ मानसोपचारतज्ज्ञ आपल्याकडे आलेल्या व्यक्तीवर उपचार करताना ज्या शेकडो तंत्रांचा अवलंब करतो त्यापैकी एक म्हणजे विरोधाभास (Paradox). विरोधाभासाचा आश्रय घेऊन सुप्रसिद्ध लेखक श्री. डॅन ग्रीनबर्ग यांनी तर एक पुस्तकच लिहिले आहे. त्या पुस्तकाचे नाव आहे How to make yourself miserable. सामान्य वाचकाला आपल्या मानसिक आरोग्याची काळजी घेण्याच्या दृष्टीने हे पुस्तक उपयुक्त आहे.

'स्वतःला कसे छळावे' ही लेखमाला लिहिताना लेखक श्री. फडके यांना डॅन ग्रीनबर्ग यांच्या पुस्तकाने स्फूर्ती मिळत गेली पण यातील लिखाण मात्र त्यांच्या प्रत्यक्ष अनुभवाचे आहे. या लेखमालेचे मुख्य सूत्र विरोधाभास (Paradox) हे आहे आणि मानसिक आरोग्याविषयी मार्गदर्शन करणे हे याचे उद्दिष्ट आहे.

या अंकात या लेखमालेतील पहिले चार लेखांक दिले आहेत.

विश्वास : खरंच की! म्हणजे मी सकाळी अगदी घड्याळाचा गजर ऐकून जागा झाल्याबरोबर स्वतःला छळावयास लागले पाहिजे ना?

मी : अर्थात! घड्याळाचा गजर ऐकू आल्याबरोबर तू स्वतःला असे सांगितले पाहिजेस की, 'सकाळी सहा वाजता उठण्यासाठी मला वर्षानुवर्षे घड्याळाच्या गजराची आवश्यकता भासते, म्हणजे मी खरोखरच नालायक माणूस आहे. खरे म्हणजे मला सकाळी सहा वाजता आपोआप जाग आली पाहिजे.' एकदा तू स्वतःला असे विचार सांगू लागलास की तू स्वतःचा मनमुराद छळ करण्याच्या मार्गावरून निर्धास्तपणे प्रवास करू लागशील.

विश्वास : (साशंक मुद्रेने) तुमचा पहिलाच धडा अफलातून आहे, यात संशय नाही. परंतु एक अडचण आहे . .

मी : (बिनधास्त सुरात) कोणती अडचण?

विश्वास : (रडवेल्या सुरात) बऱ्याच वेळा घड्याळाचा गजर वाजण्यापूर्वीच मला जाग येते हो...

मी : त्यात कसली अडचण? अशा वेळी तू स्वतःला असे सांगितले पाहिजेस की, 'मला गजराशिवाय जाग येते तरी मी आपले ते घड्याळ वापरतोच! काय म्हणावे माझ्या या कमकुवतपणाला? आत्मविश्वासाचा संपूर्ण अभाव हेच माझ्या आयुष्याचे दुर्दैव आहे.'...

विश्वास : (आनंदाने फुलून जाऊन) काय नामी तोडगा काढलात माझ्या अडचणीवर! आता उद्यापासून मी सकाळी घड्याळाचा गजर ऐकू येण्यापूर्वी अथवा नंतर जागा झाल्याबरोबर स्वतःला छळून घेण्यास सुरुवात करीन.

मी : तुला मी सांगितलेला फक्त तोडगा समजून व पटून तुझा विशेष फायदा होणार नाही. त्या तोडग्यामागचे मुख्य तत्त्व तुला समजले पाहिजे. नाही तर तुझी फजिती होईल.

विश्वास : (गोंधळून जाऊन) माझी फजिती कशी काय होईल?

मी : न जाणो एक वेळ अशी येईल की, तुझा आत्मविश्वास इतका वाढेल की, तू सकाळी सहा वाजता उठण्यासाठी गजराचे घड्याळ वापरणेच बंद करशील. मग तू सकाळी उठल्याबरोबर स्वतःला कसा काय छळू लागशील? म्हणजे तुझी फजितीच होईल की नाही?

विश्वास : (घाबरलेल्या चेहेऱ्याने) अगदी बरोबर! तेव्हा तुम्ही जो तोडगा सुचविला आहे, त्यामागील तत्त्व मी समजावून घ्यावे, हेच उत्तम.

मी : (डोळे मिटून धीर-गंभीर सुरात) सकाळी उठल्याबरोबर स्वतःला छळावयास लागण्याचे कोणतेही तंत्र उपयोगात आणताना त्यामागचे तत्त्व मनावर नीट बिंबविले पाहिजे. ते तत्त्व म्हणजे सकाळी जाग आल्याबरोबर आपण केलेल्या अथवा करू न शकलेल्या गोष्टीबद्दल स्वतःची कठोर शब्दात निर्भर्त्सना करणे!

विश्वास : (मोठ्याने हसून) वाहवा! आता मी गजराच्या घड्याळावर अवलंबून राहण्याचे कारण नाही. आजचा पहिला धडा तर मला छान समजला. मी आता आपला निरोप घेतो.

मी : (डोळे उघडून) तुला पहिला धडा नीट समजला आहे म्हणून तू फारच खूष झालेला दिसतो आहेस. हे चांगले नाही. कोणत्याही प्रकारे खुषीत असणे ही मनःस्थिती स्वतःला कळून घेण्याच्या कलेतील तुझ्या प्रगतीला अपायकारक ठरेल.

विश्वास : (अडखळत अडखळत) मग मी माझी खुषी नाहीशी कशी करू?

मी : आता घरी जाताना तू स्वतःला सांग की, 'स्वतःला छळण्याचे इतके साधे व सोपे मार्ग मला का सुचले नाहीत? मी बेअकलीच आहे! एक साधी गोष्ट शिकण्यासाठी मला फडके सेंटरमध्ये जावे लागले .. मी किती निर्बुद्ध व करटा!'

विश्वास : (दीनवाण्या चेहेऱ्याने) ठीक आहे आता मी तुमचा निरोप घेतो; पण तुम्ही सांगितल्याप्रमाणे घरी जाताना मी स्वतःला तुडवून काढतो. म्हणजे मी घरी पोचेपर्यंत माझ्या मनातील खुषी पार वितळून जाईल आणि माझी या नव्या अभ्यास-

विश्वास : (भीड चेपून) हो, स्वतःच्या मनात चिंता निर्माण करून स्वतःला उच्छाद आणता येतो, हे मला माहीत आहे...पण सदासर्वदा चिंता तरी कसली व किती करणार ?

मी : (छद्मी हास्य करून) तुला हा प्रश्न पडला आहे याचे कारण स्वतःच्या मनात बावनकशी चिंता निर्माण करण्यासाठी माणसाच्या मनात जो एक मूलभूत दृष्टिकोन रुजावा लागतो, तो तुझ्या मनात रुजलेला नाही.

विश्वास . (उत्सुकतेने) कोणता मूलभूत दृष्टिकोन ?

मी : सांगतो. असा उतावीळ होऊ नकोस. समजा तू एखादे गुलाबाचे ताबडे, सुंदर, ताजे व टवटवीत फूल पाहिलेस, तर तुझ्या मनात कोणते विचार येतील ?

विश्वास (ओशाळून जाऊन) हा काय प्रश्न विचारता ? मी वीस वर्षांचा तरुण मुलगा आहे...माझ्या मनात कोणते विचार येतील हे काय तुम्हाला ओळखता येणार नाही ?

मी : (थंड नजरेने) ते सर्व विचार फेकून देण्यास तू शिकले पाहिजेस !

विश्वास : (आवाक होऊन) का बरे ?

मी : (गंभीर चेहऱ्याने) कारण प्रत्येक वेळी तुझ्या पाहण्यात आलेले गुलाबाचे फूलच फेकून देणे तुझ्या आवाक्यात असेलच असे नाही.

विश्वास . (कावराबावरा होऊन) तुम्ही असे काय हो बोलता ?

मी : खुळ्या तरुणा, बावनकशी चिंताचे तुफान आपल्या मनात निर्माण करण्याची तुझी ज्वलंत महत्त्वाकांक्षा असेल, तर प्रथम तू तुझ्या मनात एक कमालीचा विघातक व संशयखोर दृष्टीकोन दृढमूल करावयास शिकले पाहिजेस.

विश्वास : (गोंधळून जाऊन) म्हणजे ...गुलाबाचे ताबडे, सुंदर, ताजे व टवटवीत फूल पाहूनही मी माझ्या मनात शंकाच उत्पन्न केल्या पाहिजेत ?

मी : अर्थात ! ' या मोहक फुलावर कोणी तरी असे द्रव शिंपडून ठेवले नसेल ना, की मी या गुलाबाच्या वासाने बेशुद्ध पडेन ? आणि तांबडा रंग तरी काय सूचित करतो ? धोकाच ना ? हे फूल खरे असेल, की अगदी हुबेहूब खऱ्या फुलासारखे दिसणारे जपानी बनावटीचे कागदी फूल असेल ? या फुलाच्या मोहात पडून मी त्याला वाजवीपेक्षा अधिक किंमत देऊन हे फूल विकत घेतले, तर मी अक्कलशून्य व अव्यवहारी ठरेन... आज या लहानशा फुलाच्या मोहात पडून मी एक प्रकारे माझ्या अधोगतीलाच तर प्रारंभ करणार नाही ना? हा गुलहौशीपणा उद्या अंगाशी तर येणार नाही ना ? फुले, सुवास, अत्तरे मग उन्मादक पेये... मदिराक्षीचा सहवास .. एकदा अशी ऐषआरामाची चटक लागल्यावर मी कोणकोणते चाळे करू लागेन ते कोणी सांगावे ? बापरे ! हे फूल अखेर मला विनाशाच्या खाईत तर ढकलणार नाही ना ? अशा तऱ्हेचे विचार चटकन तुला सुचले, तरच तुझ्या मनात एक विघातक व शंकेखोर दृष्टिकोन रुजला आहे, असे म्हणता येईल. आणि मग स्वतःच्या मनात कोणत्याही वेळी चिंतेचे वादळ उठवून देऊन तू स्वतःला खुशाल छळत बसू लागशील.

विश्वास : (दिव्यदृष्टी लाभल्याच्या समाधानाने) आता समजला मला तुमच्या बोलण्याचा रोख ! मी एकदा माझ्या मनावर असा विघातक व शंकेखोर दृष्टिकोन नीट बिंबविला की मग मला कितीही वेळ मोकळा मिळाला, तरी मी न डगमगता स्वतःला छळण्याच्या माझ्या महान ध्येयाकडे दृष्टी ठेवून माझा मार्ग खंबीरपणे आक्रमत राहीन, असेच ना ?

मी : (निःश्वास टाकून) बरोबर ओळखलास माझ्या बोलण्याचा रोख !

विश्वास : परंतु असा विघातक व शंकेखोर दृष्टिकोन माझ्या मनात पेरून त्याला खतपाणी घालण्यासाठी मी नेमके काय केले पाहिजे ?

मी अगदी योग्य प्रश्न विचारलास ! असा बहुगुणी दृष्टिकोन आपल्या मनात खोल रुजविण्यासाठी तू प्रथम तीन तेजस्वी सूत्रे शिकून ती तुझ्या हाडीमासी बाणविली पाहिजेस.

विश्वास : कोणती तीन तेजस्वी सूत्रे ?

मी : पहिले सूत्र म्हणजे या जगात कशाचीही खात्री देता येत नाही !

विश्वास : हे सूत्र मला काही नवीन नाही मी हे सूत्र केव्हाच कळत नकळत अंगीकारलेले असल्यामुळे मी कशाविषयीही काळजी करू शकेन, अशी मी तुम्हाला ग्वाही देतो.

मी : (तिरसट सुरात) हे सूत्र तू अंगीकारले आहेस असे म्हणतोस अन् ग्वाही देतोस ? या जगात कशाचीही खात्री देता येत नाही, हे सूत्र ज्याने आत्मसात केलेले असते तो माणूस कधी कसली ग्वाही देणे शक्य आहे काय ?

विश्वास : (लाजेने चूर होऊन) हो... म्हणजे मला अजून तुमच्याकडून खूपच शिकायचे आहे.

मी : (तिरसट सुरात) आणि तू ग्वाही कसली दिलीस ? तर म्हणे तू काळजी करू शकशील ! सामान्य, क्षुद्र, तकलुपी काळजी ! पण मी तुला उरलेली दोन सूत्रे सांगितली की तू कोणत्याही सामान्य काळजीचे रुपांतर बावनकशी चिंतेत करू शकशील.

विश्वास : खरं म्हणता ? मग सांगा तरी तुमची उरलेली दोन तेजस्वी सूत्रे

मी : दुसरे सूत्र असे की कोणताही माणूस, कोणतीही वस्तू अथवा कोणतीही परिस्थिती माणसाला कसा व किती दगा देऊ शकेल ते काही सांगता येत नाही.

विश्वास . (भयभीत मुद्रेने) तुमचे हे सूत्र मला शंभर टक्के पटले. शाळकरी मुले खेळताना वापरतात त्या साध्या काचेच्या गोट्या त्या काय ? पण तशी गोटी घशात अडकून एक मुलगा तडकाफडकी मेल्याचे मला माहीत आहे.

मी हे काहीच नाही ! पाणी पिताना ठसका लागून एका बाईचा श्वास कोंडून ती गुदमरून मेल्याची घटना प्रत्यक्ष घडलेली आहे.

विश्वास । बापरे ! तुमचे दुसरे सूत्र म्हणजे खरोखरच या विश्वातील एक मूलभूत सिद्धांत आहे, असे दिसते.

मी : परंतु तू फक्त वरील दोनच सूत्रे तुझ्या रक्तात भिनविशील, तर काही तू एखाद्या क्षुल्लक काळजीचे रुपांतर बावनकशी चिंतेत करू शकणार नाहीस. त्यासाठी तुला तिसरे तेजस्वी सूत्र आत्मसात करावे लागेल !

विश्वास । (अधीर होऊन) लवकर सांगा हो ते तिसरे सूत्र

मी : तिसरे सूत्र असे की, कोणत्याही परिस्थितीला तोंड देणे आपल्या कुवतीच्या बाहेरचे आहे अशी मूलभूत विचारसरणी तू तुझ्या मनात पेरून तिची जोपासना केली पाहिजेस.

मुळी स्वतःवर अजिबात प्रेम करीत नाहीस, नव्हे तुला स्वत.बद्दल पराकोटीचा तिरस्कार वाटतो.

विश्वास : मला वाटते मी तसे सूचित केले कौ, माझ्या आसपासही कोणी फिरकणार नाही...

मी : अगदी बरोबर ! एखादा माणूस स्वतःवरच प्रेम करीत नाही हे उघड उघड दिसत असताना त्याच्यावर प्रेम करण्याच्या भानगडीत कोणी सहसा पडत नाही. तरी पण मी तुला काही सभाव्य धोक्याची कल्पना देऊन ठेवतो.

विश्वास : हो.. म्हणजे ऐनवेळी तोंडघशी पडून इतरांचे प्रेम सपादन करण्याचे पातक माझ्या हातून घडणार नाही.

मी : (अतिशय गभीर सुरात) एक संभाव्य धोका म्हणजे लहान मुले ! विशेषतः काही लहान मुले इतकी गोड व निरागस दिसतात की, त्याना पाहिल्यावरोबर तू तुझ्या जीवनाचे अंतिम ध्येय विसरून त्या मुलांना चटकन उचलून वगैरे घेण्याच्या फदात पडशील व मोठा घोटाळा करून ठेवशील. सांभाळ, अशाने तू तोडघशी पडशील.

विश्वास : (काळजीच्या सुरात) अहो, तुम्हाला काय सागू ? मी तोडघशी पडलोच आहे. म्हणजे असे की, मला माझ्या दोन पुतण्याचा लळा लागला आहे...

मी : (दिलासा देण्याच्या सुरात) हरकत नाही. अजून वेळ गेलेली नाही. आता आणखी एक धोक्याचा कंदील मी तुला दाखवून ठेवतो. या जगात बहुसख्य प्रौढ माणसेही स्वभावतःच प्रेमळ, सज्जन व परहितदक्ष असतात. अशी माणसे इतरांना दुखवत तर नाहीतच; पण उलटपक्षी इतरावर प्रेम करून त्याना मदत करण्यासाठी झटतात आणि अशा माणसाकडून स्वत.चा तिरस्कार करून घेणे थोडे अवघड असते.

विश्वास : (काकुळतीच्या सुरात) बरोबर...कोण माणूस कसा असेल ते काही सागता येत नाही...पण मग मी करावे तरी काय ?

मी : (निगरगट्ट चेहरा करून) यावर एक जालीम उपाय आहे. तो म्हणजे या जगातील यच्चयावत सजीव प्राण्याकडे– लहान मुले, फुलपाखरे, गोगलगायी, काळघा मुग्या कोणी कोणी म्हणून अपवाद नाही– सदैव मारक्या म्हशीच्या नजरेने पाहण्याचे कौशल्य संपादन करणे !

विश्वास : (निःश्वास टाकून) छान ! हाही उपाय सोपा आहे; परंतु त्यामुळे माझ्या जीवनाचे ते महान उद्दिष्ट साध्य होईल ना ? तेवढे जरा नीट समजावून सांगा ..

मी : (तिरसट सुरात) नाही ना समजले अजून तुला ? अरे, तुझ्या त्या दाहक नजरेमुळे तुझा तिरस्कार करण्याशिवाय लोकाना दुसरा पर्यायच उरणार नाही !, आणि एकदा तसे झाले की, तुला स्वतःची कीव करीत बसून, स्वतःला छळून घेण्यास अगदी भरपूर वेळ मिळेल.

विश्वास : (खुर्चीवरून उठून) येतो मी ! वेळ वाया घालवून चालणार नाही !

तीन : बावनकशी चिंतांचे तुफान

मी : काय, मागचा आठवडा कसा काय गेला ?

विश्वास : (उत्तेजित सुरात) चांगला गेला. माझे बहुतेक मित्र आता मला टाळू लागले आहेत आणि इतरही माणसाना माझ्यापासून दूर पळवून लावण्याचे कसब मी थोडयाच दिवसात आत्मसात करीन याची मला खात्री वाटू लागली आहे.

मी : म्हणजे गेल्या आठवड्यात तुला स्वत.ची कीव करीत बसून स्वत.ला छळून काढण्यासाठी भरपूर वेळ मिळाला असेल.

विश्वास : (विषण्ण मुद्रेने) तेथेच तर थोडा घोटाळा झाला !

मी : काय घोटाळा झाला ?

विश्वास : मला वेळ मुबलक मिळाला खरा...पण त्या सर्व वेळाचा सदुपयोग करून घेऊन स्वतःची कीव करीत बसणे काही मला तितकेसे नीट जमले नाही

मी : (आश्चर्यचकित होऊन) काय म्हणतोस ? फक्त तुझे मित्र तुला थोडेसे टाळू लागल्यावर तुला जो मोकळा वेळ मिळाला त्या सर्व वेळाचाही तुला फायदा करून घेता आला नाही ? आणि केवळ एका आठवड्यात तुझी अशी दुर्दशा व्हावी ? मग कालाताराने तुझा इतर सर्वच माणसांशी संपर्क कमीकमी होऊ लागल्यावर तुला जो प्रचंड वेळ मोकळा मिळेल, त्या वेळात तू स्वतःला कसे काय छळून घेणार ?

विश्वास . (अपराधी मुद्रेने) मला तीच तर भीती वाटत आहे . म्हणजे तसा मी थोडा वेळ दूरदर्शनवरील कार्यक्रम पाहण्यात वगैरे घालविला म्हणा...

मी : (रागीट मुद्रेने) तू अविचाराने असे काही करशील याची मला भीती वाटतच होती. म्हणतात ना, रिकामपणासारखा दुसरा शाप नाही !

विश्वास : (गोंधळून जाऊन) ... मी अविचाराने वागलो ? मी तर तुमच्या सागण्याबरहुकूम सर्वांकडे मारक्या म्हशीप्रमाणे पाहण्याचा सतत सराव करीत आहे. आणि मला त्याची फळेही मिळू लागली आहेत.

मी : (धीर देण्याच्या आविर्भावाने) ते ठीक आहे. पण तुला दूरदर्शनवरील कार्यक्रम पाहण्यास काय मी सागितले होते ?

विश्वास : (ओशाळवाण्या चेहऱ्याने) म्हणजे त्याचे असे झाले, की मी रोज संध्याकाळी अगदी एकटाच घरी बसून राहत असे ..तेव्हा थोडा विरंगुळा म्हणून...

मी : रिकामपणाला शाप म्हणतात ते तुझ्यासारख्याच्या या अशा अविचारी वागण्यामुळे. अरे, तू तुझ्या आयुष्याचे अंतिम ध्येय विसरलास की काय ?

विश्वास : छे ! छे ! ते मी अजिबात विसरलेलो नाही. मला आजन्म स्वत.ला छळून घ्यावयाचे आहे. पण काय करणार ? मी एकटा होतो तेव्हा स्वत.ला छळण्याचे नवेनवे मार्गच सुचेनासे झाले.

मी : (खूष होऊन) कसे सुचणार ? जे मी तुला अजून शिकविलेले नाही, ते तुला सुचणे कसे शक्य आहे ? तेव्हा आता मी तुला आज जो तिसरा धडा शिकविणार आहे त्याकडे काळजीपूर्वक लक्ष दे.

विश्वास : (उल्हासित होऊन) आजच्या धडयाचा विषय काय आहे ?

मी : फुरसत मिळेल तेव्हा व प्रसंगी फुरसत काढून, स्वत.च्या मनात अगदी बावनकशी चिंताचे तुफान करून स्वतःला कसे सळो की पळो करून सोडावे, ते मी आज तुला शिकविणार आहे

विश्वास : (भीड चेपून) हो, स्वतःच्या मनात चिंता निर्माण करून स्वत ला उच्छाद आणता येतो, हे मला माहीत आहे...पण सदासर्वदा चिंता तरी कसली व किती करणार ?

मी : (छद्मी हास्य करून) तुला हा प्रश्न पडला आहे याचे कारण स्वत च्या मनात बावनकशी चिंता निर्माण करण्यासाठी माणसाच्या मनात जो एक मूलभूत दृष्टिकोन रुजावा लागतो, तो तुझ्या मनात रुजलेला नाही.

विश्वास : (उत्सुकतेने) कोणता मूलभूत दृष्टिकोन ?

मी : सांगतो. असा उतावीळ होऊ नकोस. समजा तू एखादे गुलाबाचे. ताबडे, सुदर, ताजे व टवटवीत फूल पाहिलेस, तर तुझ्या मनात कोणते विचार येतील ?

विश्वास : (ओशाळून जाऊन) हा काय प्रश्न विचारता ? मी वीस वर्षांचा तरुण मुलगा आहे...माझ्या मनात कोणते विचार येतील हे काय तुम्हाला ओळखता येणार नाही ?

मी : (थड नजरेने) ते सर्व विचार फेकून देण्यास तू शिकले पाहिजेस !

विश्वास : (आवाक होऊन) का बरे ?

मी : (गंभीर चेहऱ्याने) कारण प्रत्येक वेळी तुझ्या पाहण्यात आलेले गुलाबाचे फूलच फेकून देणे तुझ्या आवाक्यात असेलच असे नाही.

विश्वास . (कावराबावरा होऊन) तुम्ही असे काय हो बोलता ?

मी : खुळ्या तरुणा, बावनकशी चिंताचे तुफान आपल्या मनात निर्माण करण्याची तुझी ज्वलंत महत्त्वाकांक्षा असेल, तर प्रथम तू तुझ्या मनात एक कमालीचा विघातक व सशयखोर दृष्टीकोन दृढमूल करावयास शिकले पाहिजेस.

विश्वास : (गोधळून जाऊन) म्हणजे ...गुलाबाचे ताबडे, सुदर, ताजे व टवटवीत फूल पाहूनही मी माझ्या मनात शंकाच उत्पन्न केल्या पाहिजेत ?

मी : अर्थात ! ' या मोहक फुलावर कोणी तरी असे द्रव शिंपडून ठेवले नसेल नां, की मी या गुलाबाच्या वासाने बेशुद्ध पडेन ? आणि तांबडा रंग तरी काय सूचित करतो ? धोकाच ना ? हे फूल खरे असेल, की अगदी हुबेहूब खऱ्या फुलासारखे दिसणारे जपानी बनावटीचे कागदी फूल असेल ? या फुलाच्या मोहात पडून मी त्याला वाजवीपेक्षा अधिक किंमत देऊन हे फूल विकत घेतले, तर मी अक्कलशून्य व अव्यवहारी ठरेन... आज या लहानशा फुलाच्या मोहात पडून मी एक प्रकारे माझ्या अधोगतीलाच तर प्रारंभ करणार नाही ना? हा गुलहौशीपणा उद्या अंगाशी तर येणार नाही ना ? फुले, सुवास, अत्तरे मग उन्मादक पेये... मदिराक्षीचा सहवास .. एकदा अशी ऐषआरामाची चटक लागल्यावर मी कोणकोणते चाळे करू लागेन ते कोणी सागावे ? बापरे ! हे फूल अखेर मला विनाशाच्या खाईत तर ढकलणार नाही ना ? अशा तऱ्हेचे विचार चटकन तुला सुचले, तरच तुझ्या मनात एक विघातक व शकेखोर दृष्टिकोन रुजला आहे, असे म्हणता येईल. आणि मग स्वतःच्या मनात कोणत्याही वेळी चिंतेचे वादळ उठवून देऊन तू स्वत.ला खुशाल छळत बसू लागशील.

विश्वास : (दिव्यदृष्टी लाभल्याच्या समाधानाने) आता समजला मला तुमच्या बोलण्याचा रोख ! मी एकदा माझ्या मनावर असा विघातक व शकेखोर दृष्टिकोन नीट बिंबविला की मग मला कितीही वेळ मोकळा मिळाला, तरी मी न डगमगता स्वतःला छळण्याच्या माझ्या महान ध्येयाकडे दृष्टी ठेवून माझा मार्ग खबीरपणे आक्रमत राहीन, असेच ना ?

मी : (नि श्वास टाकून) बरोबर ओळखलास माझ्या बोलण्याचा रोख !

विश्वास : परतु असा विघातक व शकेखोर दृष्टिकोन माझ्या मनात पेरून त्याला खतपाणी घालण्यासाठी मी नेमके काय केले पाहिजे ?

मी : अगदी योग्य प्रश्न विचारलास ! असा बहुगुणी दृष्टिकोन आपल्या मनात खोल रुजविण्यासाठी तू प्रथम तीन तेजस्वी सूत्रे शिकून ती तुझ्या हाडीमासी बाणविली पाहिजेस.

विश्वास · कोणती तीन तेजस्वी सूत्रे ?

मी : पहिले सूत्र म्हणजे या जगात कशाचीही खात्री देता येत नाही !

विश्वास : हे सूत्र मला काही नवीन नाही. मी हे सूत्र केव्हाच कळत नकळत अंगीकारलेले असल्यामुळे मी कशाविषयीही काळजी करू शकेन, अशी मी तुम्हाला ग्वाही देतो.

मी : (तिरसट सुरात) हे सूत्र तू अगीकारले आहेस असे म्हणतोस अन् ग्वाही देतोस ? या जगात कशाचीही खात्री देता येत नाही, हे सूत्र ज्याने आत्मसात केलेले असते तो माणूस कधी कसली ग्वाही देणे शक्य आहे काय ?

विश्वास : (लाजेने चूर होऊन) हो... म्हणजे मला अजून तुमच्याकडून खूपच शिकायचे आहे.

मी : (तिरसट सुरात) आणि तू ग्वाही कसली दिलीस ? तर म्हणे तू काळजी करू शकशील ! सामान्य, क्षुद्र, तकलुपी काळजी ! पण मी तुला उरलेली दोन सूत्रे सागितली की तू कोणत्याही सामान्य काळजीचे रुपांतर बावनकशी चिंतेत करू शकशील.

विश्वास : खरं म्हणता ? मग सांगा तरी तुमची उरलेली दोन तेजस्वी सूत्रे.

मी : दुसरे सूत्र असे की कोणताही माणूस, कोणतीही वस्तू अथवा कोणतीही परिस्थिती माणसाला कसा व किती दगा देऊ शकेल ते काही सागता येत नाही.

विश्वास . (भयभीत मुद्रेने) तुमचे हे सूत्र मला शंभर टक्के पटले. शाळकरी मुले खेळताना वापरतात त्या साध्या काचेच्या गोट्या त्या काय ? पण तशी गोटी घशात अडकून एक मुलगा तडकाफडकी मेल्याचे मला माहीत आहे.

मी : हे काहीच नाही ! पाणी पिताना ठसका लागून एका बाईचा श्वास कोडून ती गुदमरून मेल्याची घटना प्रत्यक्ष घडलेली आहे.

विश्वास । बापरे ! तुमचे दुसरे सूत्र म्हणजे खरोखरच या विश्वातील एक मूलभूत सिद्धात आहे, असे दिसते.

मी : परतु तू फक्त वरील दोनच सूत्रे तुझ्या रक्तात भिनविशील, तर काही तू एखाद्या क्षुल्लक काळजीचे रुपातर बावनकशी चिंतेत करू शकणार नाहीस. त्यासाठी तुला तिसरे तेजस्वी सूत्र आत्मसात करावे लागेल !

विश्वास । (अधीर होऊन) लवकर सागा हो ते तिसरे सूत्र

मी : तिसरे सूत्र असे की, कोणत्याही परिस्थितीला तोड देणे आपल्या कुवतीच्या बाहेरचे आहे अशी मूलभूत विचारसरणी तू तुझ्या मनात पेरून तिची जोपासना केली पाहिजेस.

विश्वास . त्यामुळे काय होईल ?

मी : त्यामुळे काय होईल ? अरे, त्यामुळे तुला कितीही मोकळा वेळ मिळाला तरी तू तुझ्या मनात बावनकशी चिंतांचे थैमान उत्पन्न करून स्वतःला अगदी दे माय धरणी ठाय करून सोडशील.

विश्वास : (साशंक मुद्रेने) एखादे उदाहरण देऊन सांगाल तर बरे होईल...कारण तुम्ही तांबड्या गुलाबाच्या फुलाचे जे उदाहरण दिलेत, ते मला फार आवडले.

मी : ठीक आहे. समजा तू एकटा बसला आहेस व खिडकीतून वाऱ्याची झुळूक आली, तर तू तुझ्या मनात बावनकशी चिंतांचे वादळ कसे निर्माण करशील ?

विश्वास : (गोंधळून जाऊन)...कसे काय निर्माण करीन बरे ?

मी : मी शिकविलेल्या तिन्ही सूत्रांचा उपयोग करून तू तुझ्या जीवनाच्या अंतिम उद्दिष्टाकडे कशी वाटचाल करशील, ते पाहा.

'या वाऱ्याच्या झुळकेबरोबर किती सहस्रावधी सूक्ष्म पण प्राणघातक जंतू माझ्या पंचेंद्रियांमार्फत माझ्या सर्व शरीरात जातील बरे ? शिवाय त्या हवेतील घाणीचे किती अणुरेणू माझ्या प्रकृतीचा चुथडा करतील... हवेतील प्रदूषणामुळे माझ्या फुप्फुसांचे वाटोळे होण्यासाठी मी एखाद्या रसायनांचे उत्पादन करणाऱ्या कारखान्यात किंवा खाणीत वगैरे काम करावयास हवे असे नाही. या वाऱ्याच्या झुळकेतून आत येणारे सूक्ष्म जंतू म्हणजे यमदूतच नव्हेत काय ? बरे खिडकी लावून घेतली तरी प्रश्न कसा सुटणार ? कारण तरीसुद्धा काही हवा आत येणारच ! जंतूंना काय ? तेवढी मोकळीकही पुष्कळ झाली. बरे सर्व दारे खिडक्या अगदी घट्ट बंद करून बसावे, तर मी गुदमरून मरण्याचा धोका आहेच ! चेष्टा नाही. अशा घटना घडलेल्या आहेत. अरे बापरे ! मी या आपत्तीचे निराकरण करण्यास केवळ असमर्थ आहे. इकडे आड व तिकडे विहीर. खरोखर माझे जीवन अशक्य करून टाकले आहे या वाऱ्याच्या झुळकेने ! माझे होईल तरी काय, संध्याकाळपर्यंत ? पण...पण मी संध्याकाळ तरी पाहीन का ?' असे विचार तुला अगदी सहज स्फुरू लागले की तुला स्वतःला छळून घेण्यास वेळ कधी पुरा पडेल का ?

विश्वास : (शांत सुरात) तुमच्या तिन्ही सूत्रांचे विलक्षण सामर्थ्य माझ्या लक्षात आले आहे. ती तीन शक्तिशाली सूत्रे मी अंगी बाणविली की माझ्या मनात तुम्ही म्हणता तसा एक विघातक व संशयखोर दृष्टिकोन रुजून मी कोणत्याही प्रसंगाला सामोरा जाऊ शकेन.

मी : (साशंक मुद्रेने) म्हणजे ?

विश्वास : म्हणजे कोणत्याही परिस्थितीत मला कितीही रिकामा वेळ मिळाला तरी मी खचून न जाता किंवा माझ्या मनात केवळ एखादी यःकश्चित काळजी निर्माण न करता, लक्षवधी बावनकशी चिंतांचे वादळ उत्पन्न करून स्वतःला छळूनच काय पण अगदी छिनून काढू शकेन.

मी : (आनंदाने) शाबास ! जिते रहो बेटा ! तुझी प्रगती समाधानकारक होत आहे. याचा मला अभिमान वाटतो.

चार : छंदांचे तोटे

विश्वास : गेल्या आठवड्यात मला जेवढा म्हणून वेळ मिळाला, त्या सर्व वेळात मी स्वतःला पुरेपूर छळून घेतले. आणि खरे म्हणजे मला स्वतःला छळून घेण्यासाठी अधिक वेळ हवा होता. पण तो काही मिळाला नाही.

मी : (दटावणीच्या सुरात) हे बघ, तसा वेळ कधी कोणाला मिळत नसतो. एकदा एखादे काम करावयाचे म्हटले, की त्यासाठी मुद्दाम वेळ काढावा लागतो.

विश्वास : (चपापून जाऊन) तुमचे म्हणणे मला मान्य आहे...पण स्वतःला छळण्यासाठी आणखी वेळ कसा काढावा, ते मला कळत नाही.

मी : इच्छा असते तेथे मार्ग हा असतोच. फक्त प्रबळ इच्छा पाहिजे. आता मला सांग तू गेल्या आठवड्यात रोज संध्याकाळी काय करीत होतास ?

विश्वास : काय करीत होतो म्हणजे ? अर्थात स्वतःला छळून घेऊन स्वतःला बेजार करून सोडत होतो. फक्त आठवड्यातून दोन दिवस संध्याकाळी एक तास मी तबला शिकण्यासाठी एका शिक्षकांकडे जातो, तेवढाच काय तो अपवाद.

मी : (गंभीर सुरात) तू या 'फडके

सेटर' मध्ये येऊन जो अभ्यासक्रम शिकत आहेस, तो अभ्यासक्रम यशस्वीरीतीने पूर्ण करावा अशी तीव्र इच्छा तुझ्या मनात आहे की नाही ?

विश्वास : अर्थात ! त्याशिवाय का मी फी भरून तुमच्याकडे येतो ?

मी : पण तू केवळ एकदा माझी फी भरून भागण्यासारखे नाही हा अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी येथून पुढे तुला अनेकदा फार जबरदस्त फी द्यावी लागेल.

विश्वास : (सभ्रमात पडून) अहो पण... मी तुमची सर्व फी एका हप्त्यातच देऊन टाकलेली आहे.

मी : मी त्या फीविषयी बोलत नाही. ती फी मला मिळालेली आहे व मी तुला त्याबद्दल रीतसर पावतीही दिलेली आहे.

विश्वास : (चाचरत चाचरत) मग आणखी कोणती जबरदस्त फी मला वारंवार द्यावी लागणार आहे ?

मी : (हुकमी आवाजात) त्या जबरदस्त फीपैकी पहिला हप्ता म्हणजे तू तबला शिकावयास जाणे तत्काळ बंद करणे !

विश्वास : (आश्चर्यचकित होऊन) काय म्हणता ? अहो माझा तो छंद म्हणजे माझा प्राण आहे.

मी : (निर्वाणीच्या सुरात) मग तुझा तो प्राण मारून टाकल्याशिवाय तू माझा पुढील अभ्यासक्रम शिकू शकणार नाहीस. नक्की काय ते ठरव. वाटल्यास मी तुला तू भरलेली सर्व फी परत देऊन टाकतो.

विश्वास : (भयभीत होऊन) छे ! छे ! तसे नाही...पण तबला वाजविण्यास शिकणे यात वाईट काय आहे तेच मला समजत नाही.

मी : तबला, मृदुग, ढोल, सारगी, सतार, व्हॉयलीन, पिआनो, बॅगपाईप, बाजाची पेटी, चिपळ्या, झांज, बुलबुलतरंग, पखवाज, एकतारी किंवा तंबोरा यासारख्या कोणत्याही वाद्याला तू कधीही स्पर्शसुद्धा करता कामा नयेस.

विश्वास : ...पण .. सगीतावर तुमचा इतका रोष का ?

मी : हा प्रश्न माझा तुझ्या तबला शिकण्यावर किंवा संगीतकलेवर वैयक्तिक रोष असण्यापुरता मर्यादित नाही. मी तुला जी अमृततुल्य विद्या शिकवित आहे तिची अधिदेवता म्हणजे छळभवानी ! आणि ही छळभवानी अतिशय मत्सरी आहे. • •

विश्वास : म्हणजे तिला सगीतकलेचा मत्सर वाटतो, असेच ना ?

मी : केवळ सगीतकलेचाच नाही, तर तिला या विश्वातील सर्व कलाचा, छदाचा व शास्त्राचा मत्सर वाटतो. ग्लायडर उड्डाणापासून ते पोस्टाची तिकिटे जमविण्याच्या सर्व छदाबद्दल तिला जहरी मत्सर वाटतो.

विश्वास : (अडखळत अडखळत) पण... हे बापडे छद तिचे काय वाईट करतात ?

मी . (सतप्त होऊन) बापडे छद ? ते सर्व छंद बाष्कळ व आत्मघातकी आहेत !

विश्वास : (दबलेल्या आवाजात) एकदम असे काय म्हणता...त्या छंदांमुळे तर...

मी : त्या छदामुळे तर माझ्याकडे येणारे तुझ्यासारखे नवशिके आपल्या मुख्य ध्येयापासून विचलित होतात आणि काही काळ आनदात घालवून स्वत.चे अपरिमित नुकसान करून घेतात.

विश्वास : अस्स ! म्हणजे मी तबला शिकण्याचा छद चालू ठेवला, तर स्वत ला नाना प्रकारे छळण्याचे माझे जीवितकर्तव्य काही वेळ तरी दृष्टिआड करीन, असेच ना ?

मी : (इशारा देण्याचा आविर्भाव करून) केवळ काही वेळ तू तुझे जीवितकर्तव्य विसरशील असे नव्हे. मी शिकवित आहे तो अभ्यासक्रम आत्मसात करू इच्छिणारा कोणताही माणूस जर कोणत्याही छदाच्या मोहात पडला, तर त्यामुळे तो स्वत ला छळून घेण्याचा हा शास्त्रशुद्ध अभ्यासक्रम शिकण्याच्या कामात मोठा अडथळा निर्माण करील.

विश्वास : (गोधळून जाऊन) ते कसे काय ?

मी : (ब्रह्मज्ञान सागितल्याच्या आविर्भावाने) तेच मी तुला आता व्यवस्थित समजावून सागणार आहे. या शास्त्रशुद्ध अभ्यासक्रमाची उभारणी एका मूलभूत सिद्धातावर केलेली आहे.

विश्वास : (उत्कठित आवाजात) कोणता मूलभूत सिद्धात ?

मी : तो मूलभूत सिद्धात असा की स्वत.ला छळून घेण्याच्या कलेचे बीज पेरण्यासाठी निष्क्रियतेसारखी सुपीक जमीन नाही आणि कृतिशील मनासारखी बेभरवशाची व नापीक जमीन नाही.

विश्वास . (अस्वस्थ होऊन) तुमचा ह मूलभूत सिद्धात थोडा फोड करून सांगाल तर बरे होईल.

मी : (खूष होऊन) तुला स्वत.ला छळून घ्यावयाचे आहे ना ? मग तू कोणत्याही छंदाच्या आधीन जाऊन क्रियाशील होता कामा नये. कारण अशा प्रकारे तुला चित्तभ्रम होऊन तू काही कृती करण्यात मशगूल होऊ लागलास, तर स्वत ला छळून घेणे तुला जवळ जवळ अशक्य होईल.

विश्वास : (निश्वास टाकून) मी तबल्याचा छद तावडतोब का सोडून दिला पाहिजे, ते आता माझ्या लक्षात आले.

मी : (आज्ञादर्शक सुरात) थाब. अशी घाई करू नकोस. वरील सिद्धाताचा उरलेला अर्धा भाग नीट समजावून घे. तो असा की निष्क्रियतेसारखा दुसरा मित्र नाही. कारण जो माणूस जास्तीत जास्त वेळ पूर्णतः निष्क्रिय राहील, तो आनंदी राहणे कठीण होईल आणि मग त्याला स्वत ला हैराण करून घेणे अजिबात अवघड जाणार नाही.

विश्वास : (सखोल ज्ञान प्राप्त झाल्याचा आविर्भाव करून) खरोखर कोणताही छद माणसाचा असा विध्वस करतो, हे मला आजपर्यंत समजले नव्हते.

मी · (मख्ख चेहऱ्याने) अजूनही तुला ते साकल्याने समजलेले नाही. तेव्हा आता मी तुला छदाचे तोटे विशद करून सागतो. म्हणजे तुला कळेल की छळभवानी सर्व छदाचा आत्यतिक मत्सर का करते.

विश्वास . (आतुरतेने) अवश्य सागा. कारण छदाचे तोटे माझ्या मनावर खोल ठसल्याखेरीज माझे तबल्याचे वेड जाणार नाही

मी : कोणत्याही छदाचा पहिला तोटा म्हणजे त्यामुळे मनुष्याला हातपाय हलवावेसे वाटू लागते. अगदी पोस्टाची तिकिटे जमविण्याचा छद म्हटला तरी माणूस त्यासाठी असख्य खटपटी करू लागतो व नको इतका सक्रिय बनतो.

विश्वास : (उत्तेजित होऊन) माझ्या एका मित्राला नेमका हाच छद आहे आणि पोस्टाची तिकिटे मिळविण्यासाठी तो किती वेळ, पैसा व श्रम खर्च करतो ते मी प्रत्यक्ष पाहत आहे.

मी : (गूढ ज्ञान सांगितल्याचा आविर्भाव करून) एखाद्या छदाचा ध्यास घेऊन माणूस केवळ सक्रिय बनतो असे नव्हे तर तो आपल्या त्या पोरकट उद्योगात इतका काही रंगून जातो, की त्याला कशाचे म्हणून कशाचे भान उरत नाही

विश्वास · (संमतिदर्शक मान हालवून) हो...म्हणजे ती एक धुदीच असते. माझ्या त्या मित्राला पोस्टाची तिकिटे जमविण्याच्या नादापायी कधी कधी जेवणाचीही शुद्ध राहत नाही.

मी · (आनदाने) बरोबर बोललास ! आणि एखाद्या खुळचट छदाचे रूपांतर अशा धुदीत कसे होते, ते तुला माहीत आहे ?

विश्वास : (चाचरत चाचरत) मला वाटते...माणसाला त्या छदाचे वेडच लागते... म्हणून तो अगदी धुद बेधुद होतो.

मी · (खोचक सुरात) पण तो असा पागल का होतो ?

विश्वास : मला वाटते...त्याला दुसरे काही सुचेनासे होते...

मी : (अबट चेहरा करून) होय; पण ह्या अधोगतीचे पहिले कारण म्हणजे त्याला यशाची चटक लागते एखाद्या माणसाला अतोनात धडपड–तडफड करून कोणते तरी दीडदमडीचे जुने–पुराणे पोस्टाचे तिकीट मिळाले, की तो माणूस आपल्या उपद्व्यापाना यश आले या कल्पनेने आणखीनच चेकाळतो आणि त्यामुळे...

विश्वास · त्यामुळे तो धडपड करण्यास अधिकच प्रवृत्त होतो

मी : (सतापून) आणि अशा प्रकारे तो महामूर्ख माणूस प्रयत्नवादाच्या आहारी जाण्याचा भयकर धोका निर्माण होतो.

विश्वास : (घाबरून जाऊन) माझा तबला वाजविण्यास शिकण्याचा अनुभवही असाच आहे. मोठ्या कष्टाने मी एका मर्यादेपर्यंत माझी प्रगती करून घेतल्यावर मला त्या यशाचा इतका आनद वाटला, की मी आणखी भरघोस उत्साहाने तबला वाजविण्याचा सराव करू लागलो. पण मला तेव्हा माहीत नव्हते की माझा अधःपात होत होता.

मी : (नाराजीच्या सुरात) तेव्हाच तुला हे समजले असते तर तू तबल्याचा नाद सोडूनही दिला असतास; पण ते सत्कृत्य तुझ्या हातून व्हावयाचे नव्हते. उलट, यशाच्या उन्मादाने तू जिवाचे रान करून तुझे तबल्याचे वेड वाढवून ठेवलेस.

विश्वास : (अपराधी मुद्रेने) माझ्या हातून ती चूक झाली खरी...

मी : एक गोष्ट लक्षात ठेव. तू तबला शिकण्याचा तुझा तो पोरकट छद असाच चालू ठेवलास, तर तुला नव्या नव्या कल्पना सुचू लागतील व मग एक दिवस तुझ्याकडून काही सर्जनशील निर्मिती होण्याचा धोका उत्पन्न होईल.

विश्वास : (घाबरून जाऊन) आणि मग मात्र माझी अधोगती कोणी रोखू शकणार नाही, असेच ना ?

मी : (निगरगट्टपणे) ते तर झालेच; पण त्याहून आणखी एक मोठा तोटा तुझ्या पदरी येईल. आणि तो म्हणजे तुझ्यासारख्या सर्जनशील छदवेड्या माणसावर काही बेअकली लोक जीव ओवाळून टाकण्यास तयार होतील. ते तुझी सर्वत्र इतकी प्रशंसा करतील की त्यामुळे तू बेभान होशील आणि त्याचा परिणाम काय होईल ते ओळख पाहू.

विश्वास : (चाचरत–चाचरत) त्यामुळे इतराकडून स्वत'चा तिरस्कार करून घेऊन व स्वत'ची कीव करीत कुढत बसून स्वत.ला छळण्याच्या उद्दिष्टाला सुरुंग लागेल.

मी : (खूष होऊन) शाबास ! याला म्हणतात बुद्धिमत्ता ! आता छदाचे आणखी काही तोटे ऐकण्याची तुझी इच्छा आहे काय?

विश्वास : नाही आता काही त्याची गरज नाही आता मी तबला वाजविण्यास शिकण्याचा छद तर सोडून देईनच...पण परत मला दुसऱ्या एखाद्या छदाचे आकर्षण वाटू नये म्हणून मी काय केले पाहिजे ते मला सागून ठेवाल तर बरे होईल.

मी : फार मार्मिक प्रश्न विचारलास. तू केवळ तबल्याला रामराम ठोकून तुझी स्वत ला छळून काढण्याच्या कलेत फारशी प्रगती होणार नाही. तू तुझ्या मनाचे रंजन करणाऱ्या किंवा तुझ्या मनाला विरगुळा देणाऱ्या कोणत्याही उपक्रमांना विषासमान लेखून, त्याच्यापासून सदैव चार हात दूर राहण्यास शिकले पाहिजेस.

विश्वास : (बावचळून जाऊन) परतु ते कसे शक्य आहे ? माझ्या घरी रेडिओ, टेपरेकॉर्डर, दूरदर्शन, रेकॉर्डप्लेअर वगैरे अनेक मनोरंजनाची साधने आहेत आणि मी नको म्हटले तरी घरातील इतर लोक त्याचा वापर करणारच.

मी : (समजावणीच्या सुरात) तुझी शका रास्त आहे आणि तुझ्या घरातील सर्व मंडळीनी माझ्याकडे येऊन हा अभिनव अभ्यासक्रम शिकावा, हे तुझ्या शंकेवर एक उत्तर होऊ शकेल; पण त्यामुळे तुझा मार्ग काही निर्वेध होणार नाही. कारण तुझे शेजारी–पाजारी व या जगातील इतर स्वार्थी आणि विघ्नसतोषी लोक ट्रान्झिस्टर वगैरे लावून गनिमी काव्याने तुझ्या नकळत तुझे मन रिझवू शकतीलच.

विश्वास : (सचिंत मुद्रेने) मग यावर उपाय तरी काय ? मी सन्यास घेऊन हिमालयाचा रस्ता धरावा की काय ?

मी : (विषण्ण मुद्रेने) त्यानेही काम भागण्यासारखे नाही कारण तेथे कोणी इतर संन्यासी असणे शक्य आहे आणि या आधुनिक जगातून गेलेल्या त्या संन्यासमार्गीयांकडे कोणती साधने असतील व त्यामुळे तुझे कसे नकळत मनोरजन होईल ते कोणी सागावे ? शिवाय, वनराजीनी नटलेला तो प्रदेश, किलबिल करणारे चित्रविचित्र पक्षी व असख्य निर्झराचे ते कर्णमधुर संगीत इत्यादी धोकादायक गोष्टीमुळेही तुझ्या मनाला आल्हाददायक भावनाचा स्पर्श होणे अशक्य नाही.

विश्वास : (आश्चर्यचकित होऊन) तुम्ही तुमच्या शिष्याच्या मार्गातील इतके दूरवरचे धोके अचूक हेरता, हे मोठे नवल आहे, पण मग मी करावे तरी काय ?

मी : (आदेश देणाऱ्या आविर्भावाने) माझ्याकडून हा अभ्यासक्रम शिकून तरवेज झालेल्या इतर नवजवान शिष्यानी जे केले तेच तू केले पाहिजेस.

विश्वास : (उत्कठित सुरात) म्हणजे काय करू मी ?

मी : तू या जगात राहूनच पचेंद्रिये असूनही ती नसल्यासारखे वागण्यास शिकले पाहिजेस.

विश्वास : (गोंधळून जाऊन) ते कसे काय शक्य आहे ?

मी : (निर्धारदर्शक सुरात) का नाही ? क्रमाक तीनच्या धडयात शिकलेला विघातक व शकेखोर दृष्टिकोन जर तू काळजीपूर्वक

आत्मसात केला असशील, तर मी आज तुला जे सागत आहे त्यात अवघड असे काहीच नाही.

विश्वास : (जिज्ञासा शमविण्याच्या आतुरतेने) म्हणजे समजा दूरदर्शनवरील एखादा कार्यक्रम चुकून माझ्या दृष्टीस पडला, तर मी स्वत.ला काय बरे सागितले पाहिजे ?

मी : त्या वेळी तू स्वत:ला पुढील विचार तत्काळ पटवून दिले पाहिजेस. 'साले ध्वनिप्रदूषण म्हणतात ते हेच! आमची ही स्थिती तर पुढच्या पिढीतील मुले जन्मजातच बहिरी नाही निपजली तरच नवल ! कालातराने हे सर्व जगच बहिऱ्यांचे होईल. निदान माझ्यावर तरी ही आपत्ती कोसळायला नको बावा ! उद्या भारताचे कोणत्या एखाद्या देशाबरोबर युद्ध सुरू झाले व धोक्याचा इशारा म्हणून भोंगा वाजला तर या खुशालचेंडू मंडळीना तो ऐकू तरी येईल का ? शिवाय, सगळ्यांच्या नाकाडयांवर चष्मे चढतील, ते वेगळेच !'...

विश्वास : (आनदाने टाळी वाजवून) समजले तुमचे म्हणणे ! आता मला कोणत्याही छदाची किंवा मनोरजनाची सूतराम भीती वाटणार नाही.

मी : (खोचक सुरात) पाहू बरे तुला काय समजले ते. तू नेहेमी सावध राहूनही तुझ्या मनात परत तबला वाजविण्याचा मोह निर्माण झाला, तर त्या मोहावर मात कशी करशील ते सांग पाहू.

विश्वास : (आत्मविश्वासाने) त्यात काय कठीण आहे ? 'तबला वाजविताना हातांची इतकी काही चित्रविचित्र हलचाल होते, की कोणत्या क्षणी कोणती व किती हाडे मोडतील, हे सागता येत नाही. शिवाय, तबला वाजवून ध्वनिप्रदूषणात आपण स्वत:च भर घालणे म्हणजे स्वत.ची चिता स्वत:च रचावयास लागण्यासारखेच आहे ! बरे तबल्यावर ताणून बसविलेल्या त्या निर्जीव कातड्याचा काय भरवसा ? ते कातडे जर फाटले तर त्यावेळी काय होईल आणि तबल्याच्या आतील भागातून कोणते स्फोटक व प्राणघातक पदार्थ बाहेर निसटतील कोणी सांगावे ? मागे दिल्लीमध्ये नव्हते ट्रान्झिस्टरसारख्या दिसणाऱ्या वस्तूमधून चक्क बॉम्ब ठेवलेले आढळून आले ? मग तसे बॉम्ब तबल्यामधून का नाही ठेवता येणार ?' असे किती तरी विचार मला अगदी सहज स्फुरू लागतील. मग काय बिशाद आहे माझी तबल्याला हात लावण्याची.

मी : (वेळ सार्थकी लागल्याच्या समाधानाने) यालाच म्हणतात प्रपचात राहून परमार्थाची वाटचाल करणे !

विश्वास : मला तुमचे म्हणणे एकदम पटले !

मी : (साशंक मुद्रेने) काय पटले तुला ? साग पाहू परमार्थाची वाटचाल म्हणजे काय ते ?

विश्वास : (आत्मनिर्भतेने) या श्रेष्ठतम अभ्यासक्रमातील परमार्थ म्हणजे सातत्याने स्वत.ला छळून, पिडून, छिनून व चेचून काढण्याचा मार्ग.

मी : (कृतकृत्य होऊन) ठीक आहे, तुला आजचा धडा नीट समजला आहे, असे म्हणावयास हरकत दिसत नाही.

विश्वास : मला आजचा धडा इतका चागला समजला आहे की, मी यानंतर कधीही कोणत्याही प्रकारे स्वत:चे मनोरंजन करून घेण्याच्या फंदात (किंवा छदात !) गुरफटणार नाही.

(अपूर्ण)

पुस्तके

पृष्ठ १५ वरून

फडणाऱ्या किती तरी बायका मी पाहिल्यात. बस्स. लग्न होण न होण हा भाग वेगळा आणि मूल असणं हा भाग वेगळा. तुला सागते, एखादा पुरुष तुला आवडला, तर तू कशाचाही विचार करू नकोस. समाज-बिमाज सगळी आपण निर्माण केलेली भकसगिरी आहे. त्याचा उपयोग असेलही; पण त्या समाजालासुद्धा मर्यादा आहेत. त्याच्याशी कशाला देणं-घेण ठेवायचं, साग ना ? तर एखादा पुरुष तुला आवडला, तर त्याची जात, धर्म, तो लग्नाचा आहे की विनलग्नाचा आहे, याचा विचार करण्याची गरज नाही. फक्त पाहिजे तो प्रामाणिकपणा, दोघातही. तुला एखाद मूल झालं तर मला तरी खूप आवडेल. बघ विचार कर. शेवटी निर्णय तूच घ्यायचा आहेस; पण वेळ फार थोडा उरलाय. तुला वाटेल नीता, सुखी घरकुल माडल्यावर, मी तुला बेजबाबदारपणे वागायला शिकवतेय. तसं नाहीये. अगं घरकुल असलं, तरी त्या घरकुतला पुरुष त्रास देत नाही असं वाटतं का तुला ? उलट कायद्यानं, समाजानं तो अधिकार त्याला दिलेला असतो. बायकोला गुलामगिरीत ठेवण्याचा. तिला छळण्याचा. तिच्यावर सत्ता गाजवण्याचा आणि हे सगळ कायद्यान, हक्कानं. मग काय बिशाद स्त्री त्याच्याविरुद्ध बड करून उठू शकेल. निदान तू स्वतत्र आहेस, नाही जमल, आपल्या वाटेन आपण जाव. इतकी वर्षानुवर्षे धुतल्या तांदुळासारखी तू राहिलीस, काय मिळालं तुला ? हे बघ, free sex वगैरे पाश्चात्य लोकाच्या कल्पना बरोबर आहेत की नाहीत हे मला माहीत नाही. मी त्याचा पुरस्कार करीत नाही किंवा त्याच्याप्रमाणे तू वाग, असही मला म्हणायच नाहीये. मला फक्त एकच वाटत की, स्त्रीला मुल असणं हे नैसर्गिक आहे. निसर्गानच तो हक्क नाकारला तर गोष्ट वेगळी. नाही तर, माणसाला तो हक्क बळजबरीनं नाकारायचा काहीच हक्क नाही. तू विचार कर नीता. नाही पटलं तर सोडून दे; पण स्वत:च्या डोक्याला माझ्या या विचाराचा त्रास करून घेऊ नकोस

तुझी मैत्रीण

—कविता गुपचुप

□



अधिकार

मूळ लेखक : फ्रेडरिक फोरसिथ । स्वैर अनुवाद : रघुवीर मुळे

रविवार म्हणजे सुटीचा दिवस. साडेआठ वाजून गेले तरी बिल चॅंडविक अजून अंथरूणातच होता. टेलिफोनची घंटा वाजते आहे हे बिलच्या लक्षात आले, पण तिकडे त्याने आळसानेच दुर्लक्ष केले. डोक्यावर शाल ओढून तो पुन्हा डाव्या कुशीवर वळला.

घंटी वाजायची थांबली. थोडया वेळाने पुनः टेलिफोन खणाणला. मोजून दहा वेळा घंटी वाजली तेव्हा बिल चडफडतच उठला.

'हॅलो ऽऽ'

'हॅलो, बिल ? मी हेन्री बोलतोय.'

हेन्री कारपेंटर हा त्या विभागात समाजसेवक म्हणून सगळयांनाच परिचित होता. निदान ऐकून तरी बिल चॅंडविकची त्याच्याशी घसट नव्हती, पण ओळख मात्र होती.

'गुड मॉर्निंग हेन्री, काय विशेष ?'

'विशेष ?'

'थंडीच्या दिवसातही तुम्ही लवकर उठता वाटतं ?'

'हं. हो. सकाळी फिरायला जातो रोज.'

'रविवार आहे आज. पेपर वाचलेत की नाही ?'

बिलचं लक्ष दरवाजाकडे गेले. दरवाजाच्या फटीतून टाकलेली दोन वृत्तपत्रे तिथं अद्यापि पडूनच होती.

'नाही बुवा. काही विशेष ? का बरं ?'

'संडे कुरिअर' येतो की नाही तुमच्याकडे ?'

'नाही.'

'आज घ्या तुमच्याबद्दल काही तरी छापलंय त्यात.'

'अं ? माझ्याबद्दल ? काय आहे ?' बिल.

'बघा तरी' म्हणत हेन्रीनं फोन बंद केला. ते ऐकून चॅंडविकची तर झोपच उडाली. शाल फेकून तो उठला. आपल्याबद्दल काय छापून आलंय ते वाचायची त्याला उत्सुकता लागून राहिली होती. 'एक्स्प्रेस' आणि 'टेलिग्राफ' पत्नीच्या हातात देऊन त्याने कपडे केले.

'एवढया सकाळी कुठं निघालास बिल ?' त्याची बायको अडवत म्हणाली.

'एक पेपर घेऊन येतो नाक्यावरून. माझ्याबद्दल काही तरी छापून आलंय म्हणे.'

'वा. छान. अखेरीस झालासच तर तू मोठा माणूस.'

कोपऱ्यावरच्या पेपरस्टॉलवर 'संडे कुरिअर'च्या दोनच प्रती शिल्लक होत्या. रविवार असल्याने विविध विषयांच्या पुरवण्यांमुळे अंकही भरगच्चच होता. थंडी आणि वाहते बोचरे वारे यामुळे पेपर रस्त्यातच चाळून आपल्याबद्दल काय आलंय छापून ते शोधून वाचणेही अवघड होते. घरी जाऊन निवांतपणे पाहू असा विचार करून बिल झपाझप पावलं टाकू लागला. सौ. बिलनं कॉफी आणि संत्री टेबलावर ठेवली होतीच.

हेन्रीनं काही तरी छापून आलंय एवढंच सांगितलं होतं. कोणत्या पानावर ते न सांगितल्यानं बिल लक्षपूर्वक एकेक पान चाळू लागला. 'उद्योग विश्व' या सदरात त्याला एक बातमी दिसली. बातमीच्या शीर्षकातच बिलच नाव दिसल्याने तो सुखावला. प्रचंड खपाच्या एका राष्ट्रीय दैनिकाने आपल्यासारख्या छोटया उद्योजकाची दखल घ्यावी याचं त्याला आधी आश्चर्य वाटलं. कॉफीचा कप ओठांना लावीत बिल वाचू लागला.

ब्रिटनमध्ये लोकप्रिय असलेल्या घरगुती उपयोगाच्या वस्तुची – उत्पादने–असलेल्या एका कंपनीचे नुकतेच दिवाळे निघाले होते. त्या संदर्भातले ते 'शोधकवृत्त' होते. या कपनीच्या दिवाळखोरीस कपनीचा एक संचालक बिल चॅडविक हाच जबाबदार आहे आता शोध त्या बातमीत लावण्यात आला होता. बिलने कंपनीची बनवाबनवीने आर्थिक फसवणूक केल्याने ती दिवाळखोरीत निघाली असा स्पष्ट दावा मांडला होता. हे वाचून बिल जागच्याजागी उडालाच. तो उसळून जवळजवळ ओरडलाच.

'खोटंय. साफ खोटंय, असं कसं लिहू शकतात हे शोधक पत्रकार? आणि छापणारेही छापतात कसे पण?' बिलच्या या अचानक ओरडघाने त्याची पत्नी जवळजवळ दचकलीच.

'काय झालं बिल? काय आहे त्यात? काहीही न बोलता बिल चॅडविकनं पेपर तिच्याकडे सरकावला. बातमीवर बोट ठेवल अन् त्यानं कॉफीचा दुसऱ्यांदा कप भरला.

'हे मात्र अति झालं. म्हणजे त्यांनी तुझ्यावर चक्क फसवणुकीचाच आरोप केलाय की.'

'आरोप? आरोप नाही. तसा त्यांचा स्पष्ट दावाच आहे. चागली कंपनी म्हणून भागीदार झालो. त्यांचा पूर्वेतिहास न पाहिल्याने पार गाळात गेलो. पैशापरी पैसेही गेले आणि आता अब्रूही. हरामखोर लेकाचे'

'बिल, या बातमीमुळं तुला काही त्रास होईल?'

'त्रास? ही बातमी मला आयुष्यातून उठवायला पुरेशी आहे. खोटी, अगदी निखालस खोटी असली तरी. अन् तो पत्रकार तरी कोण? काळा की गोरा कधी आयुष्यात पाहिलादेखील नाही.'

'गेलॉर्ड ब्रेंट!' बातमीच्या मथळ्याखालच नाव वाचन सौ. बिल म्हणाल्या.

'त्यानं मला भेटन शहानिशा नको करून घ्यायला?' असं म्हणून आपल्या कामाकडे बिल वळला तरी त्या बातमीचं आता पुढे काय करायचं हाच विचार त्याच्या डोक्यात दिवसभर घोळत होताच.

सोमवारी सकाळी सगळे उद्योग बाजूला सारून त्यानं पहिलं जे काम केलं ते म्हणजे वकिलाची भेट घेतली. बातमी वाचून वकील म्हणाले, 'तुम्ही म्हणता त्याप्रमाणे तुमची या बातमीनं बदनामी झाली ही गोष्ट खरी आहे.'

'मग साल्याना माझी क्षमा मागावी लागेल. खोटी बातमी छापल्याबद्दल'

'तत्वता तेही खरंच आहे म्हणा. पण...' वकील त्याचा पारा शात करीत म्हणाले, 'त्याला काही मार्ग आहेत. प्रथमता आपली बाजू स्पष्ट करणारे सविस्तर पत्र सपादकांना पाठवावं लागेल. चुकीच्या बातमीने बदनामी झाली म्हणून सडे कुरिअरच्याच उद्योगविश्वात आपला खुलासा व त्यांची दिलगिरी छापण्याची मागणीवजा विनतीही त्या पत्रात करावी लागेल.'

वकिलांच्या सल्ल्याने हे सारे सोपस्कार झाल्याला आता चागला पंधरवडा उलटून गेला होता. पण बिलच्या खुलाशाची सडे कुरिअरने काही दखल घेतल्याचे चिन्हही नव्हते. मग दिलगिरी आणि खुलाशाची प्रसिद्धी वगैरे तर दूरच राहिले. एवढेच नव्हे तर वकिलांच्या नोटिसीची साधी पोचही 'सडे कुरिअर' ने दिली नाही. खेरीज कारखान्यात पाऊल ठेवल की कामगाराच्या कुत्सित नजरेला त्याला सामोरं जावं लागे.

अखेरी एके दिवशी बिलच्या वकिलाला संडे कुरिअरकडून एक पत्र आलं. त्यातही त्याच पत्र किंवा खुलासा प्रसिद्ध करू असं निश्चितपणे काहीच सागितलेलं नव्हतं पत्रावर सपादकाच्या सहीऐवजी त्याच्या सचिवांची सही होती. पत्रावर सपादकीय सस्कार करून पुढेमागे 'पत्रव्यवहाराच्या' स्तभात ते प्रसिद्ध करू असे मोघम आश्वासन मात्र देण्यात आले होते.

'ह्यान काय होणार?' निराश होऊन बिलन वकिलांना सागितल,

बिल चॅडविकला वकील बऱ्याच वर्षापासून ओळखत होते. त्याच्यादृष्टीने हा विषय त्या पत्राबरोबरच सपला होता. अशीलाला विश्वासात घेऊन सगळ्या गोष्टी स्पष्टपणे सागितल्या पाहिजेत म्हणून ते म्हणाले,

'बरोबर आहे. तुमच्यादृष्टीने ते समाधानकारक नाही हेही खरं आहे. मागे एकदा अशाच प्रकरणात एका राष्ट्रीय दैनिकाशी माझा सबध आला होता. सडे कुरिअरनं आपल्याला किमान उत्तर तरी पाठवलं. त्यानी तर दखल देखील घेतली नाही. सामान्यपणे आपली बातमी चुकीची ठरवून तिचा खुलासा वा दिलगिरी प्रसिद्ध करण्याच्या मन स्थितीत ही मोठी वृत्तपत्रे असत नाहीत.

'आता आपण काय करायचं?'

'प्रेस कौन्सिलकडे तक्रार करायची.'

'कौन्सिल काय करणार?'

'तेही फारसं काही करू शकतील असं नाही. वृत्तपत्राच्या चालकाचा निष्काळजीपणा आणि सबधित वार्ताहराची बेदरकारी सिद्ध झाली तर एका निरपराध नागरिकाला झालेल्या मनस्तापाबद्दल कौन्सिल संबंधित दैनिकावर ठपका ठेवू शकतात. अर्थात त्यांना आपली बाजू पटली तर; पण बदनामी झाली म्हणून कौन्सिल काही भरपाईचे आदेश देऊ शकत नाही. ते कोर्टाचे काम. कौन्सिलचा निकाल हा फार तर कोर्टात पुरावा होऊ शकतो. एवढच. बाकी काय.'

'आपला खुलासा आणि दिलगिरी छापावी असे आदेश प्रेस कौन्सिल संडे कुरिअरला देईल की नाही?'

'अह. अजिबातच नाही,'

'मग सर्वसामान्य नागरिकाना अशा कौन्सिलचा काय उपयोग?'

प्रदीर्घ सुस्कारा सोडून वकील म्हणाले, 'उच्च न्यायालयात बदनामी आणि त्याबद्दल नुकसानभरपाई मागण्याचा दावा लावणे एव्हढेच आपल्या हातात आहे. निकाल जर आपल्या बाजूने लागला आणि न्यायालयाने तसे आदेश दिले तरच पेपरवाले दिलगिरी प्रदर्शित करून खुलासा प्रसिद्धच करू शकतील.'

'करू शकतील? म्हणजे नक्की काही नाही?'

'बरोबर आहे. तशी खात्री देता येत नाही.'

'पण त्यांना तसं करावच लागेल'. बिल ठाम विश्वासाने म्हणाला, 'आपल्या कागदपत्रावरून माझे हात स्वच्छ आहेत हे सूर्यप्रकाशाएवढे स्पष्ट नाही काय?'

'ते ठीक आहे. तुम्ही जरा शांतपणे माझं म्हणण ऐकून घ्या. स्वच्छ आणि स्पष्ट.' वकील.

'बदनामीच्या खटल्यात स्पष्ट व स्वच्छ

कागदपत्रे ही पुरावा म्हणून फारशी उपयोगी पडत नसतात. कागदपत्राचा या खटल्यात संबंध येतो. नाही असे नाही पण असा बदनामीचा खटला म्हणजेच फार मोठा गुता असतो. दुसर म्हणजे बातमी जेव्हा प्रसिद्ध झाली त्यावेळची परिस्थिती, वार्ताहराची माहिती.पत्रकार व वृत्तपत्राचे समाजमानसातील स्थान अशा कितीतरी बाबी निकाल देताना न्यायमूर्ती विचारात घेत असतात.'

'याचा अर्थ मी निरपराध आहे हे सिद्ध करायला मला कधी संधीच मिळणार नाही?' —बिल.

'खरं तर मलाही नेमकं तेच सांगायचंय' म्हणून वकील विश्वासात घेऊन म्हणाले, 'असं पहा तुम्ही फिर्यादी किंवा वादी. आरोपी आहेत सपादक आणि पत्रकार गेलॉर्ड ब्रेंट. आपण कसे निर्दोषी आहोत हे तुम्हालाच सिद्ध करावे लागेल. ती जबाबदारी त्यांची नाही'

'याचा अर्थ वृत्तपत्रांवर अब्रुनुकसानीचा खटला दाखल करून काही उपयोग नाही असाच ना? ह्या खोट्या गोष्टीच ओझं आयुष्यभर डोक्यावर घेऊन मी ओशाळं जीवन आता समाजात घालवायचं असच ना? कशाचीही शहानिशा न करता त्यांनी छापायचं आणि प्रामाणिक नागरिकानी मात्र कोणाकडेही न्यायाची याचना सुद्धा करायची नाही असंच ना?' बिल उद्वेगाने बोलत होता.

'मिस्टर चॅडविक. चिडू नका. सताप करून घेऊ नका. मी तुमच्याशी जरा मोकळं बोलतो. मी वकील आहे आणि वकिली हा तर माझा पोटापाण्याचा धंदाच आहे. तुमची बदनामी संडे कुरिअरनं केली. खेचा त्याना कोर्टात. करा दाखल अब्रुनुकसानीचा दावा असाच खरं तर मी तुम्हाला सल्ला द्यायला पाहिजे होता. कारण वकील फीच्या रूपान मला त्यातून चागली प्राप्तीच होणार आहे. नाही का? एक गोष्ट लक्षात घ्या, ज्याची अशी बदनामी होते ना त्याचे आप्तेष्टही असाच सल्ला देत असतात. पण फुकटचा सल्ला देण्यात त्याचे काय जाते? पैसे तर तुम्हालाच खर्च करावे लागतात. मी वकील म्हणून सागतो, अशा खटल्यात पैशाचं खोबरं तर होतंच पण मनस्तापाशिवाय पदरात काहीच पडत नाही. आपण हा नाद...'

वकिलांना अडवित हटवादीपणाने बिलनं विचारल, 'या खटल्यात मला किती खर्च येईल?'

'कदाचित, तुम्ही कर्जबाजारी होऊन तुमचं दिवाळं निघू शकेल एव्हढा' वकीलही ठामपणे म्हणाले.

'या देशात कायद्यासमोर गरीब आणि श्रीमंत दोघेही समान आहेत असा माझा आतापर्यंत समज होता...'

'तत्वता ते खरं आहे. वस्तुस्थिती मात्र वेगळीच आहे, मिस्टर बिल! तू स्वतःला श्रीमत समजतो?'

'मी? छे. एक छोटा कारखानदार. हा गाडा कसा काय रेटतो ते माझं मलाच माहीत घर, गाडी, अगावरचे कपडे आणि थोडीफार विम्याची बचत. आयुष्यभर प्रामाणिकपणे कष्ट करून मी काहीच मिळवू शकलो नाही. एक सामान्य माणूस आहे झाल.'

'मग असा दावा लावण्याच्या भानगडीत नका पडू. ती श्रीमतांची चैन आहे. असले शौक आपल्याला परवडणारे नाहीत. ऐकून घ्या. आपण कदाचित अब्रुनुकसानभरपाईचा दावा जिंकूही. तथापि प्रतिवादीचा कोर्टखर्च द्यावा असाही कोर्टाचा हुकुम होऊ शकतोच आणि ती रक्कम मिळणाऱ्या भरपाईपेक्षा बरीच मोठी असली तर?' त्याच्या चेहऱ्यावरच्या प्रतिक्रिया अजमावित वकील म्हणाले, 'ही जी मोठमोठी वृत्तपत्रे असतात ना, त्याचा तेव्हढचाच मोठघा रकमेचा विमाही उतरविलेला असतो. त्यांचे तसे आर्थिक नुकसानही मग नगण्यच असते. एकादा सामान्य वकील देऊनही त्यांचे काम भागते. आणि कोर्टातल्या कामकाजाची तुम्हाला कल्पना नाही. केस बोर्डावर चार-चार पाच-पाच वर्षे येवू नये याची खालच्या खाली ते 'व्यवस्था' करू शकतात. मारा दर तारखेला आपण चकरा, जातो वेळ आणि पैसा आपला.'

'तरी पण जास्तीत जास्त किती खर्च होईल, वकीलसाहेब' बिल अगदी तटुनच बसला.

'ते तर मी तुम्हाला आधीच सागितलंय. आता आकडयात सागतो. जवळजवळ पंधरा हजार पौंड. अगदी अपिलात जायचं नाही असं ठरवूनही.'

'बाऽऽप रे! आत्ता मी काय करू.' बिल हताश होऊन म्हणाला.

'जरी या दाव्यात तुम्ही जिंकले. वादी-प्रतिवादीचा खर्च आपायला सोसावा असा कोर्टाने निकाल दिला तर एव्हढा होईल. पण प्रतिवादी अपिलात गेला तर पुनः आणखी खर्च आहेच. असं पहा, दोन पाच वर्षांपूर्वी तुमच्याबद्दल कुठं काय छापून आलं हे निकालाच्या वेळेपर्यंत का लोकांच्या लक्षात असतं? पण खटला सुरू झाला की बातम्या सुरू. चिखलफेक चालू. तुम्ही कितीही प्रामाणिक कारखानदार असा. तुम्ही कशी बनवाबनवी करता. कामगारांना आणि सरकारला फसवता याचे पुराव्ये पेपरवाले कोर्टाला देणार. ते भले पुढे खोटे ठरो पण कोर्टाचे कामकाज म्हणून त्याला ठळक प्रसिद्धी मिळणारच ना? म्हणजे बदनामीचा पाठलाग बदनामीनेच होतो. न्यायमूर्तीही अशा प्रसिद्धीला अटकाव करू शकत नाहीत.'

'विनामूल्य कायदेशीर सहाय्य मला मिळू शकेल की नाही? तशी काही सरकारी योजना असल्याचं मी ऐकलंय' बिल.

'मिळेल ना. पण त्यासाठी तुम्ही गरीब असायला हवं. कारखाना, घर, गाडी त्या व्याख्येत बसत नाही.'

'याचा अर्थ प्रामाणिक मध्यमवर्गीयांचा चारी बाजूनी कोडमाराच की'

'खरं आहे, पण मी तरी काय करू शकणार! अब्रुनुकसानभरपाईचा दावा लावा असं मी सांगू शकतो, पण त्यात काय अडचणी, अडथळे असू शकतात याची कल्पना मी तुम्हाला दिलीय. रागारागानं माणूस खटला दाखल करतो अन् नंतर पस्तावतो. तेव्हा जरा थंड डोक्यानंच विचार करायला हवा.'

'वकीलसाहेब, तुम्ही व्यवसायानं वकील आहात हे खरं. पण माझा अनुभव म्हणून सागतो, तुम्ही अशीलाचे मित्रच आहात. तुम्ही जे सागितलं ते मला कळतं पण वळत नाही. मी आपला आभारी आहे.' म्हणून बिलनं आपल्या वकिलांचा निरोप घेतला.

कारखान्यात आल्या आल्या बिल चॅडविकनं 'संडे कुरिअर'च्या कार्यालयात फोन लावला. फोनवर सपादकांचा सचिवच होता. बिलला उत्तर मिळालं.

'हॅलोऽऽ संपादक मिस्टर बक्स्टनशीच

तुम्हाला बोलायचंय का ? एवढं महत्त्वाचं आहे ?'

'हो. हो. केवळ बोलायचंच नाही तर मला त्यांची भेटदेखील हवी आहे.' –बिल

सचिव अतर्गत फोनवरून कोणाशी तरी बोलले व परत बिलकडे त्यांनी चौकशी केली,

'कशासाठी भेटायचंय् मि. बक्स्टनला ?' बिलने सडे कुरिअरमध्ये आलेल्या शोधक पत्रकार गेलॉर्ड ब्रेंटने जे वृत्त दिले त्याची माहिती दिली.

'अशा प्रकरणात कोणाला भेटण्याची सपादकाची प्रथा नाही. तुम्ही याबाबतीत पत्राने कळवा की,' असे म्हणून सचिवाने रिसिव्हर बंद केला.

दुसऱ्या दिवशी सकाळी बिल चॅंडविक स्वतःच 'सडे कुरिअर' च्या कार्यालयात दाखल झाला. आपल्या नावाचे पत्र त्याने आत पाठवले. जवळजवळ अर्ध्या पाऊण तासाने एक तरुण त्याच्याजवळ आला.

'नमस्कार, मी ऑड्रियन क्लेअर. सपादक बक्स्टन यांचा सचिव. काय काम आहे ?'

बिलने सगळा पाढा वाचला. त्या वृत्ताने आपली बदनामी तर झालीच पण धद्यातून उठायची पाळी आली असेही तो काकुळतीला येऊन सागत होता. वरवर सहानुभूती दाखवित सचिव म्हणाला, 'बरोबर आहे, तुमचे दुःख मी समजू शकतो मि. बिल; पण तुमची आणि संपादकाची भेट घडवणं मला तरी अवघडच आहे. त्यांना क्षणाचीही उसंत नसते.' मग काही तरी आठवल्यासारखं करून तो म्हणाला, 'मला वाटतं तुम्ही तुमच्या वकिलामार्फत पत्रही पाठवल होत नाही का ?'

'हो. शक्य झालं तर ते प्रसिद्ध करू असं तुमचं उत्तर आलं. तेही पत्रव्यवहाराच्या स्तभात. म्हणून माझी बाजू संपादकांसमोर मला मांडायची आहे.'

'माफ करा. ते नाही भेटू शकणार.'

'मग निदान पत्रकार गेलॉर्ड ब्रेंट तरी.'

'त्यांना भेटून काय करणार ? एक आहे बुवा तुमच्या वकिलाना संपादकांच्या नावावर पुनः स्मरणपत्र टाकायला सांगा. मग मी प्रयत्न करतो. आणखी काहीच करणं मला शक्य नाही.' एवढं बोलून 'सॉरी' म्हणून सचिव निघूनही गेला.

हॉटेलात कॉफीचे घोट घेत घेत बिल चॅंडविक विचार करू लागला, पुढे काय ? वाचनालयात जाऊन त्यानं अशाच प्रकारच्या खटल्याची कात्रणं आणि अहवाल मिळविले होते. त्याचे काळजीपूर्वक वाचन केल्यावर बिल आपल्या वकिलावर भलताच खूष झाला होता. त्यांनी दिलेल्या प्रामाणिक सल्ल्याबद्दल त्याला आपल्या वकिलाचा अभिमानही वाटू लागला. एक खटला मात्र त्याला मोठाच मार्गदर्शक वाटला. त्याने त्या दाव्याचे प्रकरण पुनः वाचून घेतले.

'एका मध्यमवर्गीय छोट्या कारखानदाराची एका लेखक–पत्रकाराने अशीच बदनामी केली. कारखानदाराने नुकसानभरपाईचा त्यावर दावा गुदरला. तो सिद्धही झाला. कारखानदाराची बदनामी झाल्याने पत्रकार व वृत्तपत्रचालकांनी त्याला तीस हजार डॉलर्स भरपाई द्यावी असा निकाल खालच्या कोर्टाने दिला प्रकाशकाने वरिष्ठ न्यायालयात अपील केले. त्या न्यायालयाने बदनामी झाली हे मान्य केले पण वादी आणि प्रतिवादीने आपापला खर्च सोसावा व नुकसानभरपाईचा खालच्या कोर्टाचा आदेश रद्द समजावा असा निकाल दिला. यातच चार वर्षे निघून गेली. कारखानदाराने या निकालाच्या विरुद्ध पुनः सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली तेथे त्याल तीस हजार डॉलर्सची नुकसानभरपाई मान्य झाली खरी पण झालेला खर्च मात्र मिळाला नाही. त्याचा खर्च झाला होता पंचेचाळीस हजार डॉलर्स. प्रकाशकाचे या खटल्यात पंच्याहत्तर हजार डॉलर्स गेले खरे पण त्याने ते विमा कंपनीकडून वसूल केले. दरम्यान कारखानदाराचे केस पाढरे होऊन त्याला अकाली वार्धक्य तर आले होतेच पण खटला जिंकूनही धंद्यात दिवाळखोरी जाहीर करावी लागली होती.'

'आपल्याबाबतीत असं काही अजिबात घडू द्यायचं नाही' असा बिल चॅंडविकनं मनोमन निश्चय केला घरी जाताना त्यानं 'इंग्लंडचा कायदा' हा ग्रंथ नेला. अगदी रस्ता वाहतुकीचा कायदासुद्धा अनेक बदल होत होत अद्ययावत होता पण बदनामी आणि नुकसान भरपाई सबंधातला कायदा शे–पाऊणशे वर्षांनंतर अगदी जसाच्या तसा. १८८८ चा जुना. त्यातला एक परिच्छेद वाचून वकिलानी सांगितले त्याची आठवण झाली. 'न्यायासनासमोर एखाद्याच्या विरुद्ध केले जाणारे आरोप, आक्षेप वृत्तपत्रात छापून येणे म्हणजे काही बदनामी होत नाही.' १८८८ च्या ह्या कायद्यातही तसेच स्पष्टच होते. 'छान. म्हणजे अस्सं आहे तर' म्हणत बिल चॅंडविक चुटकी वाजवित व शीळ घालतच उठला.

हा शोधक पत्रकार गेलॉर्ड ब्रेंट कुठं राहातो याचा शोध घ्यायलाच चॅंडविकला चार दिवस लागले. हॅम्पस्टेड मार्गावरच्या त्याच्या फ्लॅटवर बिल रविवारी सकाळीच जाऊन धडकला दरवाजावरच्या घंटीचं बटन दाबलं. दोनच मिनिटानी साधारणता तिशीतली सुदर महिला आली, दारात ती उभी असताना बिलनं विचारल.

'मिस्टर ब्रेंट आहेत का घरात ? मला त्यांच्याशी सडे कुरिअरमधल्या एका लेखाबद्दल बोलायचय.'

ते काहीच खोटं नव्हत. बाईला वाटल फ्लीट स्ट्रीटवरच्या सडे कुरिअरच्या ऑफिसातूनच कुणी तरी आल असावं. तिनं हसूनच बिलच स्वागत केल आणि दिवाणखान्यात डोकावून 'गेलॉऽऽर्ड' अशी हाक मारली. 'थाबा ह. येईलच तो आता' म्हणत बाई आत गेल्या. आतून त्याचा आणि लहान मुलाचा बोलण्याचा आवाज येत होता. गेलॉर्ड ब्रेंट अजून रात्रीच्याच कपड्यात होता. सुटीच्या दिवशी सकाळी सकाळी ही काय कटकट अशा त्रासिक चेहऱ्याने त्याने बिलला विचारलं,

'कोण पाहिजे ?'

'आपण मि. गेलॉर्ड ब्रेंट ?'

'होय. मीच. का ?'

बिल चॅंडविकने सडे कुरिअरचा 'तो' अंक काढून गेलॉर्ड समोर धरत खडसावून विचारलं. 'हा लेख तुम्हीच लिहिला ?' त्या अंकाला हातही न लावता दुरूनच पाहात गेलॉर्ड म्हणाला, 'ते प्रसिद्ध होऊन तर जवळजवळ महिना होऊन गेलाय, त्याचं काय ?'

'रविवारी सकाळी सकाळी तुम्हाला त्रास द्यावा लागतो याबद्दल माफ करा पण नाइलाज आहे. हा धोका मला घ्यावाच लागणार आहे. हा खोटानाटा लेख लिहून तुम्ही माझी

निष्कारण बदनामी केली आहे. माझी सामाजिक प्रतिष्ठा तर धुळीला मिळालीच पण धंद्यातही खोट आली ती तुझ्यामुळं' गेलॉर्ड ब्रेंटनं ही काय वायफळ बडबड चाललीय अशा प्रकारे बिलकडे पाहून विचारलं, 'पण तू लेकाचा आहेस तरी कोण ?'

'माफ करा. मीच तो विल्यम चेंडविक बिल' हे नाव ऐकताच गेलॉर्ड चमकलाच. 'काय तक्रार करायची असेल तर ती तुझ्या वकिलामार्फत कार्यालयात लिहा अस न सागता सवरता कोणाच्याही घरी जाणं हे काही सभ्य माणसाचं लक्षण नाही, मिस्टर बिल ही काही पद्धत नाही.'

'मिस्टर गेलॉर्ड, ते सगळ करून झालय्. पण त्याचा काहीच उपयोग झालेला नाही. मी तुमच्या सपादकानाही भेटायचा प्रयत्न केला पण त्यानी तर भेटच नाकारली, आणि म्हणूनच मला इथ येण भाग पडल.'

'छचा ! हे काही चागल्या, सभ्य माणसाच लक्षण नाही' म्हणत दरवाजा बद करण्यासाठी गेलॉर्ड वळला तोच बिल चेंडविक म्हणाला, 'एक मिनिट मला काय म्हणायचय्'

'काय ?'

'हेच' म्हणत चेंडविकन आपली मूठ घट्ट आवळली आणि गेलॉर्डला काही उमगायच्या आतच त्यान त्याच्या नाकावर जबरदस्त ठोसा मारला. अर्थात गेलॉर्डच्या नाकाच हाड मोडायचा चेंडविकचा इरादा नव्हता; पण अचानक झालेल्या ह्या हल्ल्याने गेलॉर्ड कळवळला 'अुऽऽहं' करून त्याचे दोन्ही हात आपोआपच नाकाजवळ गेले. डोळेही पाण्यानं एकदम डबडबून आले, एका नाकपुडीतून रक्ताचे दोन-तीन थेंबही ओघळले. चेंडविक बाहेर पडला आणि त्यामागोमाग गेलॉर्डनं धाडकन् दरवाजा बद केला.

हीथस्ट्रीटच्या रस्त्यावरच्या नाक्यावरच पंचविसीतला एक तरतरीत पोलीस जमादार उभा होता. रविवार सुटीचा दिवस. काही काम नव्हते म्हणून तो उभा राहून अन् फेऱ्या मारून बहुधा कटाळला असावा.

'जमादार माझी एक विनंती आहे, तुम्ही माझ्याबरोबर येता का ? इथून जवळच राहात असलेल्या एका सभ्य नागरिकावर आताच हल्ला झालाय' बिल.

'हल्ला ? कुठे ?' जमादारानं विचारलं.

'मागच्याच गल्लीत. माझ्याबरोबर या, मी दाखवतो' बिल.

बाकी काहीच न विचारता पोलीस जमादार बिल चेंडविकबरोबर मुकाट्याने चालू लागला. खाद्यावर अडकविलेले बिनतारी सदेशाची गुडी दाबली. पोलिसी भाषेत काय घडल्याची सूचना त्याने ठाण्याला दिली. गाडी मागावून घेतली. तोपर्यंत दोघेही हेंम्पस्टनस्ट्रीटवर येऊन पोचले होते.

चेंडविकने गेलॉर्ड ब्रेंट राहात असलेल्या बत्तीस क्रमाकाच्या फ्लॅटकडे बोट दाखवून म्हटलं, 'इथच ह्या हल्ल्याचा प्रकार घडला.'

पोलीस जमादाराने दरवाजावरच्या घटीच बटन दाबलं. पुन. 'त्या' च बाईनी दार उघडल.

'मिसेस ब्रेंट, ह्या पोलीस जमादारसाहेबाना तुमच्या यजमानाशी काही तरी काम आहे. बोलावता का त्याना ?' बिल अगदी थंडपणे बोलला पण बाई मात्र चमकल्या. बिलला पाहून बाई तर अगदी गर्भगळीतच झाल्या होत्या. त्यात आणखी पोलीस जमादार बरोबर !

बाई आत गेल्या आणि यजमानांना म्हणाल्या, 'तोच तो, आणि सोबत पोलीसही.' हे अर्थातच बाहेर ऐकायला आले. लगेचच गेलॉर्ड ब्रेंट बाहेर आला. त्यानं नाकावर बर्फाची पिशवी ठेवली होती.

'यऽऽस्स ?' गेलॉर्ड.

'हेच ते गेलॉर्ड ब्रेंट' चेंडविक.

'का, हो, खर आहे का हे सागतायत् ते !' पोलीस जमादाराने मि. गेलॉर्डकडे पाहून विचारल.

'हो. मीच. गेलॉर्ड ब्रेंट'

'आता एवढ्यातच जाणूनबुजून याच्या नाकावर ठोसा मारला हो' चेंडविक पोलिसाला उद्देशून म्हणाला.

'का हो, खर आहे ?' पोलिसानं गेलॉर्डला विचारलं.

'होय. खरं आहे' नाकावरची बर्फाची पिशवी बाजूला सारीत गेलॉर्डनं उत्तर दिलं.

'पण कोणी मारला ? ओळखता त्याला ?' पोलीस.

'कोणी म्हणजे ? मीच ठोसा मारला' बिल.

'काय ?' आता आश्चर्यचकित व्हायची पाळी जमादारावर आली.

'तुमच्या भाषत या प्रकाराला आकस्मिक हल्ला म्हणतात ना जमादारसाहेब, तो मीच केला' बिलनं खुलासा केला.

'काय हो मि. ब्रेंट ?' पोलीस.

नाकावरची पिशवी आणि हातातली रूमाल न हलवताच गेलॉर्डनं होकारार्थी मान हलवली.

'पण काय, कारण काय ?' चेंडविककडे वळून जमादारानं विचारलं.

'ते मी पोलीसठाण्यात गेल्यावर सागेन.' या बिलच्या उत्तरावर जमादार तरी काय करणार ? दोघांनाही घेऊन मग पोलीस जमादार ठाण्यावर निघाले. खाद्यावरच्या वायरलेस सेटवरून त्यानं घडलेली घटना ठाण्याला कळवली होतीच. एव्हाना हीथस्ट्रीटच्या कोपऱ्यावर पोलिसांची गाडी आलीच होती. गाडीतल्या सहकाऱ्याना पोलिसानं काय ते थोडक्यात सांगितलं अन् तिघही मागे बसले. पाच मिनिटाच्या आतच ठाण्यात ही मंडळी आली.

साधारण पन्नाशीला पोचलेल्या ठाणे अंमलदाराला जमादारानं घटना सागितली. तोवर बिल चेंडविक आणि गेलॉर्ड ब्रेंट हे दोघेही बाहेरच बसून होते. नतर दोघांनाही घेऊन जमादार त्याच्या खोलीत गेला. ओळखदेख आटोपल्यावर ठाणे अमलदारानं बिलला विचारलं,

'तुमचा याच्याशी काही वाद-भांडण ?'

'तस काही विशेष नाही' बिल.

'मिस्टर ब्रेंट, या गृहस्थाला ओळखता तुम्ही ?'

'नाही, अजिबात नाही' ब्रेंट.

'कमाल आहे. तुमची ओळख नाही, काही विशेष वादही नाही, अन् काही मि. बिल चेंडविक, ठोसा मारूनच्या मारून परत वर साळसुदपणे आमच्या जमादाराला सागायला पण आलात ? आ ?'

'तसा आपला कायदाच आहे ना ? एकादा गुन्हा जर घडलेला आपण पाहिला तर त्याची खबर नागरिकान पोलिसांना द्यायला पाहिजे. खरं की नाही ?' चेंडविक.

'व्वा ! छाऽऽन'

दोघांनाही बसायला सांगून ठाणे अमलदार आतल्या खोलीत गेला. गेलॉर्ड ब्रेंट पत्रकार असल्यामुळे डिरेक्टरीत त्याचा फोन क्रमाक छापलेला नव्हता. तो त्यानं टेलिफोन एक्स्चेंजकडून घेतला. चौकशी केली.

आतल्या खोलीत गेलॉर्डला बोलावलं आणि झाल्या प्रकाराची माहिती घेतली. ठाणे अंमलदार पुनः बाहेर येऊन आपल्या खुर्चीत बसतच म्हणाला,

'मिस्टर चॅडविक, गेलॉर्ड ब्रेंटना तुमच्या विरुद्ध काही सागायचं नाही न् तक्रारही नोदवायची नाहीये, तेव्हा...'

'ब्रेंटना माझ्याबद्दल काही म्हणायचं की नाही हा मुद्दाच कुठे येतो साहेब? ही काही अमेरिका नाही. इंग्लड आहे. आपल्या कायद्याच्या चौकटीत गुन्हा घडलेला आहे आणि गुन्ह्याची कबुली पण गुन्हेगाराने दिलीय. तेव्हा गुन्हा दाखल करून घेण हे पोलिसांचं कर्तव्यच नाही काय?'

बिलचं हे ऐकून ठाणे अमलदार चमकला.

'तुम्ही वकील आहात?'

'नाही. पण कायदा थोडाफार जाणतो.'

'ठीक आहे. तुम्ही म्हणता ते खरं आहे. पण सार्वजनिक हिताच्या म्हणजे सरकारी पैसा व वेळेचा अपव्यय लक्षात घेऊन कोणावर गुन्हा दाखल करायचा की नाही हे ठरवण्याचा आमचा अधिकार पोलिसांना आहे तेव्हा ...'

'छान. हे तर मग फारच चागलं. मग मी असं करतो, आता पुनः मी गेलॉर्डच्या घरी जातो न् देतो ठेवून आणखी ठोसा. काय कसं काय?' चॅडविक.

काहीही न बोलता ठाणे अमलदारानं स्टेशनडायरी पुढे ओढली न् पेन सरसावून तो लिहू लागला.

'आपलं नाव?'

बिल चॅडविकन नाव, पत्ता वगैरे बाकीची सगळी माहिती दिली पण जे काय झाल त्याचा जबाब देण्याचं मात्र नाकारलं. काय सागायच ते आपण मॅजिस्ट्रेटपुढेच सागू एवढाच ठेका त्यानं धरला. दरम्यान आरोपपत्र टाईप होऊन आलं. बिल चॅडविकनं सही करून त्याची एक प्रत ताब्यात घेतली. शभर डॉलर्सच्या वैयक्तिक जामीनावर अंमलदारानं सुटका केली न् दुसऱ्या दिवशी उत्तर लंडनच्या मॅजिस्ट्रेटपुढे हजर व्हा सांगून दोघानाही निरोप दिला.

त्या दिवशी खटला अवघी दोनच मिनिटे चालला. चौकशीसाठी दोन आठवड्याचा कालावधी पोलिसानी मागून घेतला. पहिल्या दिवशी गेलॉर्ड ब्रेंटला कोर्टात यायची गरज नव्हतीच. सायदैनिकात अगदी छोटी बातमी त्याबद्दल आली होती; पण ती कोणाच्या लक्षातही येणं शक्य नव्हतं. विशेषतः बिल राहात असलेल्या विभागात तरी!

...पण नतरच्या आठवडाभर मात्र ह्या खटल्याबद्दल जवळ जवळ सगळ्याच वृत्तपत्रांना फोनवरून माहिती कळविण्यात आली. अगदी सडे कुरिअरलासुद्धा. नॉर्थ लडन कोर्टाचा रोजनामा पाहिला तर ती माहिती खोटी नव्हती हे सगळ्याच वृत्तपत्राच्या लक्षात आले होते. अवघ्या इग्लडमध्ये गाजलेला शोधक पत्रकार गेलॉर्ड ब्रेंट सोमवारी उत्तर लडनच्या कोर्टात हजर राहाणार. सरकार विरुद्ध चॅडविक या केसमध्ये सरकारच्या बाजूचा साक्षीदार म्हणून ही बातमी वेगवेगळ्या नियतकालिकात प्रकाशित झाली. नागरिकांचे औत्सुक्यही मग शिगेस पोचले. आता ही महत्त्वाची बातमी असल्याने जवळ जवळ सर्वच वृत्तपत्रानी खटल्याची बातमी घेण्यासाठी पाठविले होते 'सडे कुरिअर'ने देखील.

सोमवारी सकाळी बरोबर दहा वाजता बिल चॅडविक मॅजिस्ट्रेटच्या समोर हजर झाला. तुमचा खटला पुकारेपर्यंत बाहेर थांबा असं शिरस्तेदारानं त्याला सागितलं. पावणेबाराच्या दरम्यान चॅडविकचा पुकारा झाला. पिंजऱ्यात प्रवेश करताच त्यान पत्रकारकक्षाकडे नजर टाकली. तिथं दाटीवाटीनं पत्रकार बसले होते. मनोमनी तो खूष झाला. गेलॉर्ड ब्रेंटही होता; पण तो कोर्टाच्या दिवाणखान्याच्या बाहेर बसला होता. तो साक्षीदार असल्यानं कोर्टान बोलावल्याशिवाय त्याला आता येता येत नव्हत. साक्ष आटोपल्यावर तो आत बसू शकत होता. 'मी दोषी नाही' असं न्यायमूर्तींना सागायच बिलन ठरवलं होतं.

खटला उभा राहिला. सरकारी वकिलानं खटल्याची पार्श्वभूमी विषद केली. पत्रकार कक्षातल्या पेन–पेन्सिलीची टकटक सुरू झाली. आरोपी चॅडविकने पत्रकार गेलॉर्ड ब्रेंटवर हल्ला तर केलाच; पण त्याची सविस्तर माहिती पोलिसाना दिली हे स्पष्ट झाले होते. आता चॅडविक काय सांगतोय् याच्याकडे पत्रकारांचे लक्ष लागले होते.

सरकारी वकिलाचे निवेदन सपल्यावर ते चॅडविकला म्हणाले, 'तुमचे वकील कोण आहेत?'

'कोणीच नाही' तो शातपणे म्हणाला.

'तुम्ही वकील द्या. पुढची तारीख देतो' मॅजिस्ट्रेट म्हणाले.

'न्यायमूर्ती महोदय, मला वकील द्यायचा नाही. माझा बचाव मीच करणार आहे' असं चॅडविक म्हणताच पुन्हा पत्रकारकक्षात टकटक सुरू झाली. ती ऐकून बिल चॅडविक मनोमन सुखावला. मॅजिस्ट्रेटन मग पोलीसजमादाराला बोलावलं. त्याची साक्ष नोदवून घेतली. आपण हीथस्ट्रीटवर उभे असताना आरोपी कसा आपल्याकडे आला आणि त्यानेच जे घडले ते कसे सागितले. जमादाराची साक्ष सपल्यावर मला एक निवेदन करायचय् म्हणून कोर्टाची परवानगी बिल चॅडविकनं मागितली. तो पुनः पिंजऱ्यात उभा राहिला.

'न्यायमूर्ती महोदय, जमादारसाहेबाची साक्ष मी ऐकली. त्यामुळे मला माझ आधीच विधान बदलण्याची इच्छा आहे मी दोषी नाही असं मी याआधी सागितल खरं, पण जमादारानी जे निवेदन केल त्यात काडीचही असत्य नाही. मी दोषी आहे अस माझं निवेदन आपण नोदवून घ्याव' बिल.

मॅजिस्ट्रेटसह सगळेच आता त्याच्याकडे कुतुहलाने पाहू लागले. ते म्हणाले, 'ठीक आहे, पण ते तरी नक्की, की पुन. बदलणार?'

'नाही. अजिबात नाही.'

'मिस्टर कारगिल' सरकारी वकिलांना उद्देशून मॅजिस्ट्रेट म्हणाले, 'याला तुमची काही हरकत नाही ना?'

'काहीच कारण नाही, महोदय.'

'मिस्टर ब्रेंट' गेलॉर्डला उद्देशून मॅजिस्ट्रेट म्हणाले, 'तुम्ही आता बाहेर जा. आरोपीची तपासणी नव्याने घ्यावी लागणार आहे' गेलॉर्ड आदरपूर्वक मान हलवून बाहेर गेला. चॅडविक पुनः पिंजऱ्यात आला.

'मि. चॅडविक तुमच मन बदलल खरं ना! याचा अर्थ गेलॉर्ड ब्रेंटवर तुम्ही हल्ला केला आहे हे सिद्ध होतं. त्याला शिक्षा होऊ शकते. हे लक्षात घ्या. याशिवाय तुम्हाला

काही सागायचय्' मॅजिस्ट्रेट.

'होय साहेब, मला फक्त एक निवेदन करायचय.'

'तो तुमचा कायदेशीर हक्क आहे ते नोदवून घेतल जाईल.' मॅजिस्ट्रेट

पिंजऱ्यात उभा असतानाच त्यानं खिशातून सडे कुरिअरमध्ये छापून आलेल्या 'त्या' बातमीच कात्रण काढून ते मॅजिस्ट्रेटच्या हातात दिलं. त्यानी ते वाचून बाजूला ठेवीत म्हणाले,

'ठीक आहे, सागा.'

'न्यायमूर्ती महोदय, सुमारे तीन महिन्यापूर्वी सडे कुरिअरचा शोधक पत्रकार गेलॉर्ड ब्रेंट ह्याने माझ्यासबंधी ही बातमी प्रसिद्ध केली.'

'ह्या खटल्याचा आणि त्या बातमीचा काही सबध आहे का?'

'होय साहेब. निश्चितच.'

'ठीक आहे, पुढे?'

पत्रकार बिल चॅंडविकचे निवेदन लक्षपूर्वक ऐकत लिहीत होते. 'पत्रकार गेलॉर्ड ब्रेंट याने ही निखालस खोटी बातमी छापून माझी बदनामी केली आहे घरगुती वापराच्या वस्तुच्या उत्पादन करणाऱ्या एका कपनीचा मी भागीदार होतो. माझ्या अप्रामाणिक वर्तनाने त्या कपनीचे दिवाळे निघाले असा त्यात ब्रेंटने शोध लावला आहे. म्हणजेच हजारो सामान्य माणसाचे भाग भाडवल बुडित होण्यास मी कारणीभूत आहे असा माझ्यावर आरोप ब्रेट यानी अप्रत्यक्षपणे केला आहे. ह्यात काडीचेही तथ्य नाही. इतराप्रमाणेच मीही त्या कपनीचा दुर्दैवाने एक भागीदार व वितरक होतो. कपनीचा आर्थिक पाया भक्कम आहे अशा विश्वासाने मी माझ्याजवळची पुजी त्यात टाकली. कपनीचा आर्थिक ताळेबद तत्पूर्वी मी पाहिला नाही, ही माझी चूक झाली आणि त्या चुकीचे प्रायश्चित माझी रक्कम बुडाल्याने मी भोगतोच आहे. पण या लेखात माझ्यावर अकार्यक्षमता, फसवणूक वगैरे बाणेरडे आरोप करून कपनीच्या दिवाळखोरीला मी एकटाच जणू कारणीभूत आहे असे चित्र रगविले. त्या खोट्या गोष्टीनी माझी समाजातली प्रतिमा डागाळली आहे, हा लेख लिहिण्यापूर्वी शोधक पत्रकार गेलॉर्ड ब्रेंट ह्यानी माझ्याकडे एका शब्दानेही चौकशी केली नाही. माझ्याकडे हिशेबाचे सगळे कागदपत्र आजही आहेत. मी ते सर्वांसमक्ष उघड करायला तयार आहे'

कोर्टाच्या हॉलमध्ये निस्तब्ध शातता पसरली. पत्रकाराच्या पेन वा पेन्सिलीचा व कागद फडफडल्याचाच काय तो आवाज येत होता. तेवढ्यात सरकारी वकील उठून म्हणाले,

'न्यायमूर्ती महोदय, हे पाल्हाळ इथ लावून आपला व आमचाही वेळ आरोपी निष्कारण घेत आहे त्याचा सबंध कसा काय येतो खटल्याशी?'

'आहे, न्यायमूर्ती महोदय. आहे सबध. ज्या घटनेवर हा खटला आधारित आहे, त्याची पार्श्वभूमी आपल्याला सागणं माझं कर्तव्यच आहे तो माझा कायदेशीर हक्क देखील आहे. जर पार्श्वभूमी मी स्पष्ट केली नाही तर मी एक सराईत ठोसेबाज-गुन्हेगार आहे असाच न्यायमूर्तींचा गैरसमज होण्याची शक्यता आहे.'

'बरोबर आहे, बोला तुम्ही' मॅजिस्ट्रेट

'आभारी आहे' म्हणून चॅंडविकनं आपलं निवेदन पुढे सुरू केलं. 'असलं घाणेरड खरडून तथाकथित शोधक पत्रकाराला प्रामाणिक करदाता नागरिकाची बदनामी करण्याचा अधिकार कसा काय पोचतो, न्यायमूर्ती महोदय? तो जर माझ्याकडे आला असता तर आर्थिक व्यवहाराची सगळी कागदपत्रे मी दाखविली असती. मला निदान फोन केला असता तर मीच गेलो असतो. फोनही केला नाही. माझ्याकडे फोन आहे आणि डिरेक्टरीत माझ्या नावावर तो रितसर नोदविलेला देखील आहे त्यासाठी फारसा शोध घेण्याचीही गरज नव्हती. शिवाय मी एक छोटा कारखानदार आहे. कारखानदारांच्या डिरेक्टरीतही माझा फोन, पत्ता असा सगळा तपशील आहे; पण बाजारगप्पाचे भाडवल करणाऱ्या आणि चार अक्षरानी अफवाचं पीक पसरविणाऱ्या थर्डक्लास पीत पत्रकाराला याची गरज भासू नये हा सच्च्या पत्रकारित्वाला कलक आहे महोदय...'

एवढ्यात दरवाजातूनच गेलॉर्ड ब्रेंट रागाने ओरडला 'ए ऽऽ मिस्टर जरा तोंड साभाळून बोल.'

न्यायमूर्तीसह सगळ्याचे लक्ष त्याच्याकडे गेले. तो रागाने थरथरत तिथं उभा होता.

'शांतता! कोर्ट चालू आहे. तुम्हाला अस मध्ये काही बोलता येणार नाही. गप्प राहा.' न्यायमूर्ती त्याला इशारा देऊन त्यानी चॅंडविकला विचारल, 'मि. चॅंडविक, तुमच्या बदनामीबद्दल तुमचा राग समजू शकतो. पण हा खटला अब्रुनुकसानभरपाईचा नाहीये. तुम्ही गेलॉर्ड ब्रेंटच्या नाकावर ठोसा मारल्याचा तुमच्यावर आरोप आहे. तो तुम्हाला मान्य देखील आहे तेव्हा थोडक्यात काय ते सागा.'

'महोदय, आपण म्हणता ते बरोबर आहे. मी फक्त आपल्या न्यायबुद्धीला आवाहन करणार आहे. कायद्याच्या चाकोरीत राहून जीवन जगणारा कोणीही माणूस अनोळखी माणसावर असा अचानक गुडासारखा हल्ला कसा करील. त्याच्यामागे काही तरी उद्देश असेलच ना. तोच मला स्पष्ट करायचाय.'

'ठीक आहे. सागा. पण भाषा जरा सौम्य वापरा बरं.'

'ठीक आहे. महोदय. तर अशा या शोधक पत्रकारित्वाच्या गभीर बुरख्याखालच्या पाचकळ लेखामुळे माझे धंद्यात अपरिमित नुकसान झाले आहे 'एक भामटा' अशा नजरेन समाजात माझ्याकडे लोक निष्कारण पाहू लागले आहेत. शोधक पत्रकार म्हणजे एकाद्या प्रकरणाचा तळापासून शोध घेणारा, सर्व बाबीचा अपक्षपणे विचार करून माडणारा असा सर्वांचाच समज आहे आणि म्हणूनच त्याच्या लेखावर, बातम्यावर वाचकाचा सहजी विश्वास बसतो माझे मित्र देखील आता मला दुरावले आहेत. हा तथाकथित शोधक पत्रकार म्हणजे व्हिस्कीच्या बाटलीचा तळ गाठून बाजार गप्पाना शोधाचा रग देतो हे कुठे त्याना ठाऊक आहे...'

'ही काय फालतु बडबड आहे. जमादार साहेब वकिलाना सागा मला बोलायचय म्हणून' गेलॉर्ड ब्रेंट. पोलिसाने तोडावर बोट ठेवून त्याला 'श्यूऽऽ' असा इशारा केला.

'मला सधी हवी आहे, महोदय' गेलॉर्ड.

'शातता. पुन जर असा कामात तुम्ही अडथळा आणला तर त्याचो मी गभीर दखल घेईन' न्यायमूर्ती.

'महोदय अस पहा. प्रामाणिक माणसाला

राष्ट्रीय दैनिकाच्या सुरक्षित कवचात राहून आयुष्यातून उठविण्याचा या विदुषकाना कोणी अधिकार दिला ?'

'पण त्याच्यावर तुम्ही वेगळा अब्रुनुकसानीचा खटला करू शकता. पत्र चालकांकडे सविस्तर निवेदन देऊ शकता. ह्या ठोसेबाजीचा प्रकार का केला ते सागा' मेजिस्ट्रेट.

'महोदय. तुम्ही जर स्वताच न्यायपडित आहात. प्रचड खर्चाचा असा खटला सामान्य कसा काय परवडेल ? तोही राष्ट्रीय, प्रचड खपाच्या दैनिकाविरुद्ध ? आणि म्हणूनच मी संपादकांची भेट घेऊन त्याना माझी बाजू समजावून सागण्याचा प्रयत्न केला. सडे कुरिअरच्या कचेरीतही गेलो. त्यानी माझी भेट तर नाकारलीच; पण ब्रेंटचीही भेट घेऊ दिली नाही. मी पोस्टाने सविस्तर निवेदन पाठवलं, त्याचीही त्यानी दखल घेतली नाही. अशा परिस्थितीत ब्रेंटला घरीच गाठून सांगाव या हेतूने मी त्याच्या घरी गेलो.'

'ठीक आहे, पुढे. दिली की तुमची बाजू समजावून ?'

'मी प्रयत्न केला, पण कोणीतरी फालतू माणूस घरी आला अशीच त्यानी माझी संभावना केली. सडे कुरिअरच्या कचेरीतून आणि ब्रेंटच्या घरातून मेलेला उदिर बाहेर फेकावा अशी वागणूक मला मिळाली. कोणीही ऐकून घ्यायलाच तयार नाही. मी सामान्य आर्थिक कुवतीचा माणूस आहे. तो राष्ट्रीय दैनिकाचे काय वाकडे करू शकणार ह्याची त्याना घमेंड होती व आहे.'

'पुढे...'

'माझ्या आयुष्यात मी मग या मनस्तापाने खरोखरच पहिल्यादा संतापलो. माझ्या मनावरचा ताबा सुटला आणि जे करायलो नको ते करून बसलो.

एव्हढं सागून चॅडविक पत्रकारकक्षेकडे नजर टाकून खाली बसला न्यायमूर्तीनी हॉलवर कटाक्ष टाकला. पत्रकाराची टकटक चालूच होती. न्यायमूर्ती गंभीरपणे मनातल्या मनात विचार करू लागले. 'अशा परिस्थितीत मनावरचा ताबा सुटणे शक्य आहे. मागे एकदा आपल्याही बाबतीत असेच घडले होते. एका खटल्यात दिलेल्या निकालावर वृत्तपत्रानी काहूर उठविले होते तेव्हा. तो निकाल वरच्या न्यायालयाने कायम केला तेव्हा वृत्तपत्रे परस्परच गप्प झाली होती.'

न्यायमूर्ती म्हणाले, 'मि. चॅडविक, तुम्ही गुन्हा केला आहे आणि त्याची कबुलीपण दिली आहे. तुमचे वागणे गैर होते ते कोर्टाने ग्राह्य ठरविले आहे. अर्थात घरून निघाल्यापासून हॅम्पस्टेड मार्गावरील ब्रेंटच्या घरी येईपर्यंत त्याना ठोसा मारण्याचा हेतू तुमच्या मनात नव्हता अस कोर्टाचं मत झाल आहे. तरीही तुम्ही ब्रेंटच्या घराच्या दाराशी त्याच्यावर हल्ला केला ही गोष्ट निर्विवादपणे सिद्ध झाली आहे. देशात गाजलेल्या एका शोधक पत्रकाराच्या घरी जाऊन असे नागरिकाने मारणे हे चागले नाही. समाजात असे प्रकार पुन: घडू नये म्हणूनही तुम्ही शिक्षेस पात्र आहात. तुम्हाला मी दीडशे पौंड दंडाची शिक्षा सुनावतो.'

चॅडविकने बॅगेतून चेकबुक काढले दीडशे पौडाचा चेक लिहून त्याने तो शिरस्तेदाराला दिला. पत्रकार आपापले कागदपत्र घेऊन लगबगीने टॅक्सी पकडण्यासाठी केव्हाच बाहेर पडले होते. त्यांना एक अनोखी बातमी मिळाली होती.

कोर्टाच्या आवारात गेलॉर्ड ब्रेंट चेहेरा पडलेल्या अवस्थेत उभा होता. त्याच्या चेहऱ्यावर संताप तर स्पष्टच दिसत होता. चॅडविकला पाहताच एक सणसणीत शिवी त्यानं हासडली न् म्हणाला, 'तुला तसा सोडणार नाही पाहून घेईन. अस दुसऱ्या कोणाला कसा कोर्टात बोलावतो ते.'

'कसा म्हणजे ? तुझ्यासारखाच.' म्हणून चॅडविकने टॅक्सी पकडली. □

लंडन येथील नाट्यशिक्षण शिबिर

पृष्ठ ५ वरून

समोरच्या माणसाच्या चेहऱ्याचा मुखवटा कसा तयार करावा याचे प्रात्यक्षिकासह शिक्षण दिले गेले. कोणत्या शिबिरात व्याख्यानापेक्षा प्रात्यक्षिकावर भर दिला गेला तर प्रशिक्षणार्थी त्यामध्ये अधिक रमतो, रस घेतो असा नेहमीचाच अनुभव असतो तसा याही ठिकाणी अनुभव आला. आलेल्या प्रत्येकाने एकेक मुखवटा तयार करून घरी नेला. यामध्ये एखादी गोष्ट आपल्याला शिकून त्वरित आली आणि घरी गेल्यावर पुन्हा ती आपण स्वत: करू शकतो असा आत्मविश्वास अनेकांना वाटत असलेला दिसला.

तीन दिवस शिबिर झाल्यावर चौथ्या दिवशी (२१ डिसेंबर) वृद्धाश्रमाच्या सभागृहात डेव्हिड आणि मडळीनी एक प्रयोग पेश केला. अर्थात हा प्रयोग मूकाभिनय आणि नृत्य यावर केंद्रित केलेला होता. हेलेन हिने आधुनिक नृत्याची झलक, ध्वनिमुद्रित सगीतावरचे नृत्य सादर करून आपले शरीर किती लवचिकपणाने वापरता येते ते दाखवले. तर डेव्हिड आणि सदीप यानी मूकाभिनयाच्या सदर्भात शाळेतील परीक्षा, सर्कशीतील गमती इत्यादी गोष्टी प्रसंगरूपाने पेश केल्या. मूकाभिनयाचा हा प्रयोग आरभी आकर्षित करणारा ठरला पण फार मोठी उची गाठू शकला नाही. याचे मुख्य कारण त्यामध्ये अनेक गोष्टीची असलेली पुनरोक्ती आणि काहीशी अतिशयोक्ती.

अशा प्रकारची शिबिरे नित्य घडतात आणि त्यातली अनेक शिबिरे आश्वासनाची आमिषे दाखवून सपतही असतात. त्यातल्या फारच थोड्या शिबिरांचा पाठपुरावा केला जातो. डेव्हिड याचे शिबिर हे अपवादात्मक ठरेल असे दिसते. ते अशा अर्थाने की या चार दिवसाच्या शिबिर सहवासात पुढच्या शिबिराचे बेत सर्वांनी पक्के केलेत. फेब्रुवारीच्या अखेरच्या आठवड्यात आणि मार्चच्या पहिल्या आठवड्यात असे पंधरा दिवसाचे शिबिर पुन्हा पुण्यात होत आहे. हे शिबिर अर्थातच अधिक खोलवर जाऊन सविस्तरपणे होईल. विशेष म्हणजे शिबिरात जे शिक्षण घेतले जाईल त्यावर आधारित विद्यार्थ्यांकडून दोन प्रयोगही केले जातील.

या शिबिराला केवळ पुण्यातीलच नव्हे तर पिंपरी-चिचवड, वाई, तळेगाव इत्यादी ठिकाणच्या नाट्य संस्थातील काही प्रतिनिधी आले होते. विशेष म्हणजे हौशी रंगभूमीवर आज विविध स्पर्धेतून महत्त्वाच्या नाटकामधून भूमिका करणारे अनेक लक्षवेधी कलाकार यामध्ये स्वेच्छेने सामील झाले होते. असे निरनिराळ्या संस्थातील कलाकार एकत्रित येऊन काही निमित्ताने काम करतात ही एक सुखद घटना आहे.

डेव्हिड यानी मुख्य शिबिराबरोबरच अघशाळा, एस्. एन्. डी. टी. महाविद्यालय या ठिकाणी जाऊन काही वेळाची प्रात्यक्षिके केली. व्याख्याने दिली. ही एक वेगळ्या प्रकारच्या शिबिराची सधी मुबईच्या आविष्कार या नाट्यसंस्थेने पुणेकराना उपलब्ध करून दिली. अरविंद देशपाडे आणि अरूण काकडे यांनी यासाठी विशेष प्रयत्न केले. गेली दोन वर्षे डेव्हिड मुबईत शिबिरासाठी येत आहेत; पण इतके दिवस पुण्याचा योग येत नव्हता तो या वर्षी आला. पुण्यातला कलाकारानी त्याला उत्तम प्रतिसाद दिला. शिबिरात ५५ विद्यार्थी सहभागी होते. त्याचा आणि डेव्हिडचा एकूणच उत्साह अनुभवण्यासारखा होता. एक सयोजक आणि अभ्यासक या नात्याने मी निरीक्षक म्हणून हा उत्साह अनुभवित होतो. तो दीर्घकाळ स्मरणात राहील. □

॥ प्रकाशित झाले ॥

पहा आणि घ्या.

काँग्रेस : ह्यूम - नवरोजी - टिळक - गांधींची.

काँग्रेस : स्वातंत्र्य लढ्यातली आणि सत्तासंघर्षातली.

काँग्रेस : जहाल - मवाळांची, सिंडिकेट - इंडिकेटची.
अन् डाव्या - उजव्यांची.

काँग्रेस : नेहरू घराण्याच्या चार पिढ्यांची
अन् फोर्थ जनरेशन कॉम्प्यूटरची.

शतकाचा उंबरठा ओलांडलेल्या काँग्रेसचा प्रवास

॥ बखर काँग्रेसची ॥

॥ बखर काँग्रेसची ॥

शिरीष सहस्रबुद्धे

पृष्ठे : ३७५ । आकार : डेमी । भरपूर छायाचित्रे

किंमत : ९० रुपये

शताब्दीनिमित्त खास सवलत : ६० रुपये

सवलत २६ जानेवारी १९८६ पर्यंत

राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव, नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०. फोन : ४४ ३४ ५९

वा. र. गोडे, ४१ भवानी शंकर रोड
जोशी वाडी, चितळे पथ कॉर्नर, दादर
मुंबई : ४०० ०२८ * फोन : ४२२ ५४५५